|| मराठी तितुका मेळवावा ||

वर्ष ४३

अंक ११, १२

नोव्हेंबर व डिसेंबर २०२३

आश्विन/कार्तिक/मार्गशीर्ष शके १९४५

# बृहन्महाराष्ट्र वृत्त



समस्त मराठीप्रेमींसाठी उत्तर अमेरिकेतील एकमेव मराठी मासिक | www.bmmonline.org



# #EMPOWER A GIRL, EMPOWER A COMMUNITY

## SHE

## Sanitation, Menstrual Hygiene, and Empowerment of the Girl Child



### Sanitation

APPROXIMATELY 39% OF SCHOOLCHILDREN ACROSS INDIA ARE DEPRIVED OF PROPER SCHOOL TOILET FACILITIES



### Menstrual Hygiene

DUE TO INADEQUATE ACCESS TO TOILETS AND MENSTRUAL PRODUCTS, A SIGNIFICANT NUMBER OF TEENAGE GIRLS DISCONTINUE THEIR SCHOOL EDUCATION UPON ENTERING PUBERTY



### Self defense

EMPOWERING GIRLS THROUGH SELF-DEFENSE AND YOGA TRAINING: EQUIPPING THEM WITH ESSENTIAL TECHNIQUES FOR SELF-PROTECTION



### SHE-CAF

CREATING LIVELIHOOD OPPORTUNITIES THROUGH SKILL DEVELOPMENT TRAINING FOR WOMEN FROM COVID AFFECTED FAMILIES

**$650**
BUILT ONE TOILET IN A SCHOOL

**$10**
SUPPORT AN ADOLESCENT GIRL WITH MENSTRUAL AWARENESS AND PROVIDE REUSABLE NAPKIN KIT

**$35**
SELF DEFENSE AND YOGA TRAINING FOR A GIRL CHILD

**$350**
SKILL DEVELOPMENT TRAINING FOR AN UNDERPRIVILEGED WOMAN

she@sewausa.org 510-304-7488 DONATE NOW

## Sewa International, USA

P.O. Box 820867, Houston, TX 77282-0867, Tax ID: 20-0638718
info@sewausa.org, 708-USA-SEWA, www.she.sewausa.org

## या अंकात


| | |
|---|---|
| **अध्यक्षीय** | २ |
| **बृ. म. मंडळ कार्यकारिणी व संपादकीय** | ३ |
| **बृ. म. मंडळ २०२४ अधिवेशन - अहवाल** | ४ |
| **दिवाळी** - विदुला कोल्हटकर | ५ |
| **कविता: मोरपीस** - कल्पना मापूसकर | ५ |
| **स्क्रीनप्ले** - अमित भावे | ६ |
| **वधू परीक्षा** - चित्रा मेहेंदळे | ८ |
| **स्टेशनरीचे जग** - शिल्पा कुलकर्णी | ९ |
| **'अन्न" अभिव्यक्तीचे उत्कृष्ट माध्यम** - अश्विनी तासगांवकर | १० |
| **65 Cromwell Avenue** - डॉ. प्रमोद जोशी | १२ |
| **चारोळी** - कल्पना मापूसकर | १३ |
| **पुस्तके काही सांगू इच्छितात** - प्रा. अर्चना कुलकर्णी | १३ |
| **काशी - एक सल** - सुमन जोशी | १४ |
| **कविता: महाराष्ट्रीयन अमेरिकन!** - अनिता कांत | १५ |
| **कविता: भ्रमन्ति** - संदीप दीक्षित | १६ |
| **रेक्यविक** - नीता नाबर | १६ |
| **इतिहास असा घडायला हवाय** - पल्लवी शिंदे माने | १८ |
| **मनाला बेचैन करणारा एक शब्द** - आनंद बर्वे | १८ |
| **कविता: एक दिवा प्रत्येकाला** - प्रिया गोडबोले | १९ |
| **आठवणींचे मोती** - शुभदा सावरगावकर | २० |
| **कविता: संसाराचा खेळ** - शुभदा गतारे-कोरे | २२ |
| **जाहिरात** | २३ |
| **हास्यचित्र** - विनीता वेल्हाळ, गौतम पंगू | २४ |
| **जाहिरात** | २५ |
| **जाहिरात** | २६ |
| **Lagu Bandhu Jewellers** | २७ |
| **जीव वाचवणारा 'पट्टा'** - डॉ. राजकुमार मोहनराव देशमुख | २८ |
| **श्री क्षेत्र आळंदी** - मिलिंद चिंधडे | २९ |
| **भावनिक भेट** - उत्तरा भालेराव | ३० |
| **विश्वासघात... विश्वासघाताचा !!!** - उमा जोशी | ३१ |
| **कृष्णस्तु भगवान स्वयम्** - शुभदा काणे | ३३ |
| **कविता: श्री नटराज स्तवन** - श्रीप्रकाश सप्रे | ३५ |
| **शाप का वर** - डॉ. शिरीष कीर्तने | ३५ |
| **कविता: फुलपाखरू....** - श्रद्धा भट | ३७ |
| **'काळ' आला होता पण 'वेळ' आली नव्हती** - अभिजित जोगदेव | ३८ |
| **पैठणी** - डॉ. अस्मिता देशपांडे | ४० |
| **कविता: युद्ध** - मीना दीक्षित | ४१ |
| **अखेरचा श्वास** - रसिका नेरकर | ४१ |
| **गोष्ट ब्लॅक फॉरेस्ट केकची ....** - अश्विनी चौथाई | ४२ |
| **कविता: एक प्रार्थना** - रेखा मुळे | ४३ |
| **कविता: आज वाऱ्याला लागलंय हो वेड!** - अनिला रागाडे | ४४ |
| **Inflation Reduction Act (IRA)?** - Darshana Gupte | ४४ |
| **Know the Notes: Saxophones** - Sargum Godbole | ४७ |
| **Painting** - Anjalika Khare | ४८ |

# अध्यक्षीय

नमस्कार मित्र मैत्रिणींनो,

दसरा-दिवाळीच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा! ही दिवाळी तुम्हा सर्वांना सुख, समृद्धी व आरोग्यदायी जावो हीच ईश्वर चरणी प्रार्थना.



ऑक्टोबर मध्ये प्रशांत दामले निर्मित एका लग्नाची पुढची गोष्ट व नियम व अटी लागू अशा दोन नाटकांचे ५ आठवड्यात २१ प्रयोगांचे विक्रमी दौरे; लहान मुले मोठ्यांबरोबर मजेदार अनुभव घेऊ शकतील असा सत्यजीत पाध्ये, legend रामदास पाध्ये व अपर्णा पाध्ये यांचा बोलक्या बाहुल्यांचा दौरा; नोव्हेंबर मध्ये अनिरुद्ध, रसिका व अवनी जोशी यांच्या संगीत मैफिलीचा दौरा; अशा दर्जेदार कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल सर्व आयोजक मंडळ कार्यकारिणींचे मन:पूर्वक धन्यवाद!!

बीएमएम मॅट्रिमोनीयल/रेशीमगाठी चा पहिला, मंडळ आयोजित meetup बे एरिया मध्ये झाला. माझ्या समितीच्या सदस्या मंजुषा नाईक व मंडळ अध्यक्ष भास्कर रानडे यांचे हार्दिक अभिनंदन. मंडळांनी, मंडळांसाठी व मंडळांची या बीएमएम २.० तत्वावर पुढील सर्व meetups मंडळांद्वारे आयोजित केले जातील. पुढील ९ महिन्यात युवा आणि बी-कनेक्ट या दोन प्रकल्प विस्तारावर मी भर देणार आहे. उत्तर अमेरिकेतील १०,००० मराठी युवांचे नेटवर्क, २०२४ मध्ये ५०० युवांसाठी internship ($१५०,०००) व सर्व व्यावसायिक/professionals चे नेटवर्क ही माझीच ध्येय आहेत असे नाही तर, आजची आपली सामाजिक गरज आहे.

मी व माझे सहकारी अधिवेशन आयोजक प्रकाश भालेराव, सह-आयोजक मंगेश जोशी, सह-आयोजक अजय पटवर्धन, अंजली गांधी, अनिता कांत, अजय आठवले, अभि घोलप, राजन पेडणेकर, विराज राऊत व मोहीत चिटणीस अधिवेशन planning साठी बे एरियात भेटलो. मला food, programming, registration, decorations, visa processing आणि facilities teams च्या स्वयंसेवकांबरोबर गप्पा गोष्टी करता आल्या याचा खूप आनंद वाटला.

बीएमएम अधिवेशनाची ४०% तिकीटे २०-२५ मंडळांच्या मार्फत विकली गेली आहेत! तिकीट/donation package साठी तुमच्या मंडळात संपर्क साधा. ७००० लोकांचे भव्यदिव्य असे हे 'काय-बे' अधिवेशन देखील, मंडळांनी मंडळांसाठी व मंडळांचे या बीएमएम २.० तत्वावर आपण करत आहोत.

बीएमएम व सर्व मंडळ कार्यकारिणीच्या २००० हून अधिक कार्यरत असलेल्या स्वयंसेवकांव्यतिरिक्त आपल्या उत्तर अमेरिकेतील मराठी समाजात कुठल्याही पदाशिवाय निस्वार्थीपणाने काम करणारे देखील अनेक स्वयंसेवक आहेत. यापुढील प्रत्येक वृत्तात अशा ३-४ जणांचा उल्लेख व्हावा अशी माझी इच्छा आहे. तुमच्या गावातील अशा व्यक्तींची नावे मला नक्की पाठवत रहा. ह्या वृत्तात मी विलास सावरगावकर, शैला कांबळी, अनघा बर्वे व हेमा रचमाले, यांचे उल्लेखनीय समाजसेवेसाठी मन:पूर्वक अभिनंदन करतो!!

तुम्ही सर्वांनी bmm2.org/app install केले आहेत का? या app मध्ये तुम्हाला सर्व प्रकल्पामध्ये नावनोंदणी करता येईल, सर्व कार्यक्रमांची माहिती मिळेल, बृहन्महाराष्ट्र मंडळाचे आधीचे अहवाल, जुनी वृत्ते वाचता येतील. BMM 2.0 App ची link तुम्ही तुमचे नातेवाईक व मित्र मैत्रिणींबरोबर नक्की share करा. आज दिवाळीच्या निमित्ताने सर्वपरिचित दीप ज्योति मंत्राने थांबतो:

शुभं करोति कल्याणमारोग्यं धनसंपदा ।
शत्रुबुद्धिविनाशाय दीपज्योतिर्नमोऽस्तुते ॥

दीपज्योतिः परब्रह्म दीपज्योतिर्जनार्दनः ।
दीपो हरतु मे पापं संध्यादीप नमोऽस्तुते ॥



संदीप दीक्षित
*अध्यक्ष, बृहन्महाराष्ट्र मंडळ २०२२-२४ / President, Bruhan Maharashtra Mandal (BMM) 2022-24*

+1 216-926-6696
sandeep.dixit@bmmonline.org
twitter.com/sandeepsdixit
www.bmmonline.org
bmm2.org/app
#bmm2 # #communityCentricBMM
#mandalMemberbmm2024 #vruttaSubscriber

# बृहन्महाराष्ट्र वृत्त

बृहन्महाराष्ट्र मंडळ उत्तर अमेरिका या संस्थेचे मुखपत्र
स्थापना १९८१ (शिकागो)
संस्थापक:- कै . विष्णु वैद्य, कै . शरद गोडबोले, जयश्री हुपरीकर
अंकासाठी साहित्य/मजकूर पाठविण्याचा पत्ता:
ईमेल: vrutta@bmmonline.org
बृहन्महाराष्ट्र वृत्त कार्यालय संपर्क :-
BMM Treasurer - Rajan S Pednekar
20611 Whitebud CT. Tampa FL 33647
Ph- 813-546-1330
Email: Rajan.Pednekar@bmmonline.org
**वर्गणीचे दर:**- $25/ year
Subscription payment is accepted online by Paypal:
https://www.bmmonline.org/vrutta/subscription
**जाहिरातींचे दर:** पूर्ण पान: $175 अर्धे पान: $ 100
पाव पान: $ 70 अष्टमांश पान: $ 50


वृत्त दर महिन्याला प्रसिद्ध होते. आदल्या महिन्याच्या १५ तारखेपर्यंत आलेल्या मजकुरातून निवडक मजकूर नजीकच्या अंकात प्रसिद्ध करण्याचे सर्व प्रयत्न केले जातील. लेखासाठी जास्तीत जास्त १ ते २ पानांचा मजकूर मराठीत लिहून MS word मध्ये पाठवावा. प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतातच असे नाही. लिखाणाच्या निवडीचे, प्रकाशन योग्य किरकोळ बदलाचे आणि व्याकरणीय दुरुस्तीचे अंतिम अधिकार संपादकांकडे राहतील.


**बृहन्महाराष्ट्र मंडळाची कार्यकारिणी (२०२२ - २०२४)**

**मताधिकार असलेले सदस्य**

| | |
|---|---|
| अध्यक्ष: | संदीप दीक्षित, क्लिव्हलँड, ओहायो |
| सचिव: | अजित नातू, सॅक्रामेंटो, कॅलिफोर्निया |
| कोषाध्यक्ष: | राजन पेडणेकर, टॅम्पा बे, फ्लोरिडा |
| सदस्य: | अमर उन्हेकर, लिविंगस्टन, न्यु जर्सी |
| | सविता मोरे, वॉशिंग्टन |
| | मंजुषा नाईक, वेस्ट पाम बीच, फ्लोरिडा |
| | प्रसाद पानवळकर ऑस्टिन, टेक्सस |
| | विराज राऊत, सॅन होजे, कॅलिफोर्निया |

**नियुक्त सदस्य**

| | |
|---|---|
| माजी अध्यक्ष: | विद्या जोशी, शिकागो, इलिनॉय |

**विश्वस्त समिती**

| | |
|---|---|
| अध्यक्ष : | मोहित चिटणीस, सिऍटल, वॉशिंग्टन |
| सदस्य: | नितीन जोशी, शिकागो, इलिनॉय |
| सदस्य: | सुनील सूर्यवंशी, रिजफील्ड, कनेटिकट |
| प्रकाशक: | बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका |



**Disclaimer:** The advertised business is a wholly independent entity from Bruhan Maharashtra Mandal (BMM). BMM is neither liable nor responsible for any actions or communications between third parties and the advertised businesses, including parents and subsidiaries of the advertised businesses.


## संपादकीय

बृहन्महाराष्ट्र वृत्ताचा लेखांनी नटलेला आणि कवितांनी सजलेला ४३ वा दिवाळी अंक दीपावलीच्या शुभमुहूर्तावर वाचकांच्या हाती सुपूर्द करताना आम्हास अतिशय आनंद होत आहे.

आमच्या समितीच्या सदस्या **नीता धोपेश्वरकर** यांनी शब्दबद्ध केल्यानुसार

खुसखुशीत चकल्या आणि चविष्ट लाडू
खमंग कडबोळी बरोबर लोणी वाढू
नका विसरू चिवडा व शंकरपाळी
नैवेद्य दाखवून, नमन तुला दिवाळी.

धन्यवाद आमुचे संपूर्ण वृत्त परिवारास
जिथे लेखनाला मिळतो वाचनाचा सहवास
होते दर महिन्याला ही संपादकीय वारी
नववर्षाचे स्वागत करूया बीएमएमच्या द्वारी.


ह्या वर्षी, जून २०२३ पासून वृत्ताची धुरा नवीन संपादकीय समितीने यशस्वीपणे आपल्या हाती घेतली आहे. आपण सर्वांनी वेळोवेळी आमच्या संपादकीय समितीस वृत्ताच्या बदललेल्या, चांगल्या स्वरूपाबाबत, तसेच कोठे सुधारणेस वाव आहे ह्याबद्दल आपल्या प्रतिक्रिया देऊन आम्हाला चांगले काम करण्यास उत्तेजन, प्रोत्साहन आणि पाठिंबा दिलेला आहे. त्याबद्दल आम्ही - संपादकीय समिती, वाचकांचे मनःपूर्वक आभारी आहोत. तसेच बृहन्महाराष्ट्र मंडळ अध्यक्ष संदीप दीक्षित, खजिनदार राजन पेडणेकर, सचिव अजित नातू आणि कार्यकारिणीचे सदस्य विराज राऊत ह्यांचे देखील, त्यांनी वृत्तासाठी केलेल्या सहकार्याबद्दल आम्ही खूप आभारी आहोत.

वृत्तासाठी उत्तमोत्तम लेख, कविता आणि इतर अपडेट्स दर महिन्यास वेळेवर पाठवल्याबद्दल सर्व लेखक, लेखिका, कवी, कवयित्री, बी एम एम लीड्स, ज्योतिष लेखक आणि सर्व जाहिरातदारांना मनापासून धन्यवाद! असाच लोभ असावा, आणि आपण आपले दर्जेदार साहित्य दर महिन्यास वृत्तासाठी पाठवावे, अशी अपेक्षा आणि विनंती आहे.

वृत्त संपादकीय समितीतर्फे आपणास आणि आपल्या परिवारास दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!!!


राजन पेडणेकर



शुभदा सावरगावकर


नीता धोपेश्वरकर


अनिता कांत


अपर्णा कोळेकर


कोमल कुलकर्णी


विदुला कोल्हटकर


शीतल रांगणेकर

मुखपृष्ठ निर्मिती : शीतल रांगणेकर

## BMM2024 Convention Report

**BMM Bay Yuva:**

BMM Bay Yuva is actively engaging with Mandals across the U.S. to promote the BMM2024 Convention and establish a national network of Marathi youth. We've also finalized our Convention events, featuring fireside chats with prominent industry leaders, pitch competition, single's event, fashion show and more! Our dedicated members are tirelessly working to strengthen the community and are always on the lookout for more volunteers. Volunteering together and having fun activities and meetups along the way is making this journey even sweeter!

Become a part of BayYuva through volunteering or attending: [https://linktr.ee/bmm2024youth](https://linktr.ee/bmm2024youth)

**Get Noticed! Convention Expo, Advertisements in Smaranika and Food sponsorship: Reach 6000+ of Marathi American Diaspora spread across North America and the globe.**

**Smaranika - "One of a kind" Marathi Souvenir Magazine** invites you to reserve ad space. It will be distributed to all attendees of the convention in Print format; additionally, E-book and Audio format will be available on the Internet, for targeted global outreach.

Take advantage of the 50% Diwali discount and reserve your ad space ASAP.

For more information about Pricing, [https://bmm2024.org/reserve-ad-space-in-smaranika/](https://bmm2024.org/reserve-ad-space-in-smaranika/)

**Food Sponsorship -**

**Be a part of an unforgettable culinary experience at BMM2024!**

- Cherish the memories of your loved ones or celebrate a special occasion in your life by sponsoring food items and giveaways.
- Advertise in dining halls by sponsoring TV ads and centerpieces

[https://bmm2024.org/food-sponsorship-registration-page/](https://bmm2024.org/food-sponsorship-registration-page/)

**Expo -**

**Secure your booth at the BMM Expo today by visiting**

[https://bmm2024.org/bmm2024-expo/](https://bmm2024.org/bmm2024-expo/)

Booth prices start at just $1,999, providing you with a prime spot to showcase your products and services. This year, we're introducing an exciting innovation: the Virtual Booth, available for only $499. And the best part? It's free when you book a physical booth. With the Virtual Booth, you can extend your business's reach, connect with attendees on the BMM App and website, and maximize your exposure.

Act now to take advantage of our early bird discount, which won't last long. We're eagerly anticipating your presence at BMM 2024, where endless opportunities await.

## दिवाळी

डोळे उघडल्यावर सवयीने शिल्पाचा हात फोनपाशी गेला आणि तिने व्हाट्सॲप उघडून आलेले मेसेजेस बघायला सुरुवात केली. सगळ्यांचे दिवाळीचे फोटो बघत बघत ती 'घरच्या गप्पा' ग्रुपवर आली. जानेवारीत लग्न झाल्यावर ती, तिचा नवरा समीर, आई वडील आणि सासू-सासरे असा तिनेच तयार केलेला हा ग्रुप होता. शिल्पा आणि समीर जरी इथे बफेलोमध्ये असले तरी तिच्या आईवडिलांनी आणि सासू सासऱ्यांनी तिकडे पुण्यात भेटून जोरदार दिवाळी सण साजरा केला होता. फक्त ते चौघंच नाही तर आत्या, समीरचे मामा, काका सगळेच आले होते आणि भरपूर फोटो काढून त्यांनी पाठवले होते. 'मस्त मज्जा केली आहे सगळ्यांनी' तिच्या मनात आले. फोटो बघून तिला ३-४ वर्षांपूर्वी तिच्या बहिणीच्या दिवाळसणाला असेच सगळे जमले होते आणि आनंदात, थट्टामस्करीत सगळ्यांनी त्या दिवाळीला खूप मजा केली होती त्याची आठवण झाली. तशी अमेरिका, इथली त्यामानाने शांततेत पार पडणारी आणि शनिवार रविवारी साजरी होणारी दिवाळी तिला नवीन नसली तरी या दिवाळीला आपण लांब असल्याचं तिला जरा जास्तच वाईट वाटत होत.

उठून पहिलं आवरून ती बाहेरच्या खोलीत आली. बाहेर ढगाळ वातावरण असल्याने सगळीकडे एक उदास करडेपणा भरून राहिला होता. ती आणखीनच उदास झाली. इथल्या हवामानाला साजेसं, थंडीच्या सुरुवातीपासूनच होणाऱ्या स्नोचं रात्रीच आगमन झालेले दिसत होते. गुलाबी थंडी, फराळ, रांगोळी काहीच नाही आणि त्यात या करड्या सकाळी स्नो बघून ती अगदी खट्टू झाली. काल दिवसभर ती आणि समीर दोघेही कामात बुडून गेले होते पण संध्याकाळी आवर्जून त्यांनी लक्ष्मीपूजन केले होते. लक्ष्मीपूजनाच्या वेळेस लावलेल्या पणत्या विझल्याची खात्री करून ती झोपायला गेली होती पण पणत्या तशाच बाहेर राहिल्या होत्या. स्नो झाल्याने त्या बाहेर राहिलेल्या पणत्या बऱ्याचशा स्नोमध्ये लपून गेल्या होत्या. त्या गारठलेल्या पणत्या बघून तिचे डोळे भरून आले.

इतक्यात, समीर उठून स्वयंपाक घरात आल्याचं तिच्या लक्षात आलं. "वा! सगळ्यांनी घरी मस्त मजा केली आहे. फोटो बघितलेस ना?" त्यानी आतूनच विचारलं. त्याच्या आवाजातल्या उत्साहानी नाही म्हणलं तरी तिला बरं वाटलं. त्या इंचभर जमा झालेल्या पांढऱ्याशुभ्र स्नो मध्ये मातीच्या पणत्यांच्या गडद लाल-तपकिरी कडा अगदी उठून दिसत होत्या. तिला आठवलं की लहानपणी गेरूने रंगवलेल्या फरशीवर आईने काढलेली पांढरी रांगोळी रंग भरायच्या आधी अशीच उठून दिसायची. डोळे पुसून शाल घेऊन बाहेर जाऊन तिने पटकन त्या पणत्या उचलून आणल्या. उजाडलं असलं तरी या ढगांमुळे अजून अंधारलेलंच तर आहे, म्हणजे, म्हटलं तर पहाटच आहे. तिने यु-ट्यूबवर दिवाळी पहाटचा, पुण्यात तिकडच्या पहाटे झालेला कार्यक्रम लावला. पणत्या पुसून त्यात परत तेल घालून लावल्या. त्या ओळखीच्या छोट्याशा पण तेजस्वी प्रकाशाने तिला बरं वाटलं. तोपर्यंत समीर चहाचे कप घेऊन आला. गाण्याचे स्वर, पणत्यांचे प्रकाश आणि त्याच्या हसऱ्या चेहऱ्याकडे बघून तिला दिवाळीचा आनंद झाला. तिने हसून त्याच्याकडे बघत विचारलं "काय रे, पाडव्याला मला द्यायला काही आणलंस का नाही? पहिलाच पाडवा आहे आपला". 'आपण पण मस्त साडी नेसून फोटो काढून पाठवू' ती मनातच म्हणाली 'कारण दिवाळी बाहेर कुठे असो नसो, मनात असावी लागते' आणि नव्या उत्साहाने ती दिवाळीच्या तयारीला लागली.



**विदुला कोल्हटकर - बाल्टीमोर, मेरीलँड**

## मोरपीस

तव जन्माच्या आठवणीने मनामनात तरल गुदगुल्या
तळहातावर ठेऊन गेले माझे बालपण तु सानुल्या

स्पर्श रेशमी, मऊ, मुलायम  थरथरणारे तू मऊ मोरपीस
गहन काड्या उसवत आल्या भरून माझी रिती कूस

पडण्या धडपडण्याच्या घटना हसता रडता तुझ्या ओठी
नजर माझी भिरभिरणारी मोरपिसासम अवती भवती

चुंबनाचे हळवे मोरपीस तुझ्या अंगावरून सरसरते
काल कोवळ्या आठवांचे आज मोरपीस गालावर फिरते

**कल्पना मापूसकर - ठाणे**

## स्क्रीनप्ले

प्रो. शशांक - University of California, Los Angeles येथील Physics and Astronomy विभागात Astroparticle Physics चे एक विद्वान प्रोफेसर. १४ एप्रिल, २०२२ चे दुपारचे ३:४५ वाजत होते. प्रो. शशांक ह्यांचे लेक्चर चालू असताना सारखे घड्याळाकडे लक्ष लागले होते. कधी एकदा ४ वाजत आहेत ह्याची ते वाट बघत होते.

शेवटी त्यांनी त्यांचे बोलणे थांबवले. कुणाला काही महत्त्वाचे काम असल्यास ई-मेल करायला सांगितले आणि त्या दिवशीचा क्लास तिथेच संपवला. ते घाईघाईने क्लास बाहेर पडले आणि ऑफिस बंद करून ते जायला निघाले.

बाहेर कॉरिडॉरमध्ये समोरून प्रो. भारद्वाज येताना दिसले. शशांक आणि भारद्वाज हे गेल्या कित्येक वर्षांपासून खूप चांगले सहकारी व मित्र होते.

"अरे, शशांक, तू अजून इथेच? तुला अर्जुनच्या प्रीमियरला जायचंय ना?" भारद्वाज ह्यांनी विचारले.

"अरे, निघतोच आहे. वेस्टवूडला रिजन्सीला ४:३० चा शो आहे. पोहोचेन आरामात" शशांक कौतुकाने म्हणाले.

"आमच्यातर्फे अर्जुनला अभिनंदन सांग" भारद्वाज आनंदाने म्हणाले व त्यांच्या ऑफिसकडे निघून गेले.

४:१५ च्या सुमारास शशांक रिजन्सीला पोहोचले. त्यांची बायको आणि मुलगा अर्जुन तिथे आधीच आले होते. अर्जुनच्या भोवती लोकांचा घोळका होता. बरेच लोक येऊन त्याच्याशी शेक-हॅन्ड करत होते, त्याची चौकशी करत होते. शशांक थोडं दूर उभं राहून कौतुकाने ते दृश्य डोळ्यांत साठवत राहिले. काही क्षणांत कोणीतरी अर्जुनला बोलवायला आले. तेव्हा समोरच उभे असलेले त्याचे बाबा दिसले. त्याला कळलेच नव्हते त्याचे बाबा कधी आले ते.

त्याने पटकन पुढे होऊन त्यांना हाक मारली, "डॅड, तुमचीच वाट बघत होतो. चला आत जाऊ या. प्रीमियर सुरु होतोय."

थोड्याच वेळात 'San Diego Diaries' ह्या सिनेमाचा प्रीमियर शो सुरु झाला. त्याची कथा एका कॉलेजमध्ये शिकणाऱ्या युवकाच्या आयुष्यावर आधारित होती. सिनेमाला प्रेक्षकांची छान दाद मिळत होती. काही सीन्स खूप हसवून गेले तर काही गहिवरून टाकणारे होते. सिनेमाचा आशय युवा पिढीला कॉलेज शिक्षणापासूनच करावी लागणारी चढाओढ असा होता. साधारण दीड तासाने सिनेमा संपला. प्रेक्षकांनी टाळ्या वाजवून सर्व टीमचे अभिनंदन केले. स्क्रीनवर क्रेडिट्स दाखवले जाऊ लागले. त्यात "Screenplay" म्हणून अर्जुनचे नाव आले. शशांक आणि त्यांच्या बायकोने अर्जुनचे मिठी मारून कौतुक केले. त्यांच्या मुलाचा त्यांना खूप अभिमान वाटला. दोघांच्याही डोळ्यांतून आनंदाश्रू झिरपू लागले. त्यानंतर बरेच लोक अर्जुनशी बोलायला आले. तेव्हा शशांक आणि त्यांची बायको पुढे घरी गेले.

गाडीतून घरी परत जाताना काही वर्षांपूर्वीचे दिवस शशांकना आठवले. त्या वेळी अर्जुन 'University of California, San Diego' इथे 'Department of Physics' मध्ये Bachelor's च्या दुसऱ्या वर्षाला होता. त्याचे वडीलच Physics चे प्रोफेसर असल्यामुळे घरात पहिल्यापासूनच शैक्षणिक वातावरण होते. शशांकनाही वाटायचे की आपल्या मुलाने आपल्याप्रमाणे विज्ञान विषयात उच्च शिक्षण घ्यावे.

एक दिवस शशांक त्यांच्या ऑफिसमध्ये नेहमीप्रमाणे काही विद्यार्थ्यांशी चर्चा करत होते. अचानक त्यांच्या मोबाईलवर त्यांच्या बायकोचा मेसेज आलेला त्यांनी बघितला. पटकन पहिले काही शब्द वाचले - 'Need to talk to you..'. न राहवून त्यांनी समोरच्या विद्यार्थ्यांना थांबायला सांगितले आणि तो मेसेज वाचला.

तो मेसेज वाचून त्यांच्या पायाखालची जमीनच सरकली. मन एकदम सुन्न झाले आणि चेहरा खाडकन पडला. हात थरथरतोय असे वाटून त्यांनी मोबाईल टेबलवर ठेवला आणि समोर बघितले. समोर बसलेल्या विद्यार्थ्याच्या लक्षात आले आणि त्याने झटकन विचारले, "Professor, are you okay? Do you need anything?"

तोपर्यंत ते जरा सावरले होते. त्यांनी त्या विद्यार्थ्यांना सॉरी म्हटले व आपण नंतर पुन्हा भेटू असे सांगितले. सर्व विद्यार्थी उठून गेल्यावर त्यांनी बायकोचा मेसेज पुन्हा पुन्हा वाचला. त्यांनी पुढचे लेक्चर कॅन्सल केले आणि ते लगोलग घरी गेले.

त्यांची गाडी गॅरेजमध्ये शिरते ना शिरते तोच बायकोने दार उघडले. तिचा रडवेला चेहरा बघूनही त्यांनी काही रिॲक्शन देण्याचे टाळले. शशांकनी त्यांच्या भावनांना आवर घालत तिला खुणेने शांत व्हायला सांगितले. समोर सोफ्यावर बसून अर्जुन फोनवर कोणाशी तरी चॅटिंग करत होता.

"अर्जुन, तू हे काय केलंस? इतका मोठा डिसिजन तू एकट्याने कसा काय घेतलास? काही प्रॉब्लेम्स असतील तर आपण त्यावर काहीतरी उपाय शोधला असता. ह्या वागण्याला काय अर्थ आहे?" शशांकनी अर्जुनला तावातावाने विचारलं.

शशांकच्या मनात इतका वेळ दाबून धरलेलं एकदम उफाळून आलं.

"डॅड, तुम्ही जरा शांत व्हा. मी सांगतो सगळं" अर्जुन फोन बाजूला ठेवत म्हणाला.

"सगळं करून झाल्यावर आता कसलं स्पष्टीकरण देणार आहेस?"

"डॅड, तुम्ही Physics चे खूप मोठे प्रोफेसर आहात मला माहित्ये. मी सॅन दिएगोला २ वर्षं अगदी मनापासून अभ्यास करायचा प्रयत्न केला. मला माहित होतं की तुमच्या माझ्याकडून खूप अपेक्षा आहेत आणि मी तुमच्यासारखंच सायन्समध्ये काहीतरी स्पेशल शिकावं असं तुम्हाला वाटतं. पहिलं वर्ष ठीक गेलं. दुसऱ्या वर्षापासून मला क्लासमध्ये काय चाललंय ते कळेना. माझ्या क्विझेस आणि टेस्ट्समध्ये मला कमी मार्क्स मिळायला लागले."

"अरे, मला विचारायचंस ना? कधी एका शब्दानेही बोलला नाहीस तू" अर्जुनला थांबवत शशांक म्हणाले.

"तुला सायन्स आवडायचं म्हणूनच तू ॲडमिशन घेतलीस ना? केवढे परिश्रम घेतलेस तू, UC मध्ये ॲडमिशन मिळावी म्हणून. एवढ्या चांगल्या युनिव्हर्सिटीत कोणालाही सहजासहजी ॲडमिशन मिळत नाही ह्याची कल्पना आहे तुला. सगळं सोडून तू अचानक निघून आलास? आणि आता सांगतोयस की तुला सायन्स करायचंच नाही म्हणून?" त्याच्या आईने पण प्रश्नांची सरबत्ती सुरु केली.

"आम्ही तुझ्यावर काही जबरदस्ती केली होती का, की सायन्सलाच जा म्हणून?" शशांकनी विचारलं.

"डॅड, तुम्ही स्वतः इथे फेलोशिपवर आला होतात. आपल्या फॅमिलीमधले तुम्ही पहिले Ph. D. असं तुम्ही मला नेहमी सांगता."

"म्हणजे निव्वळ आमचं मन राखायचं म्हणून तू Physics निवडलंस?" त्याच्या आईने खातरजमा करायला विचारलं.

"मला Physics आवडायचं जोपर्यंत ते खूप क्लिष्ट नव्हतं. आजकाल मला काही समजेनासंच झालंय."

"मी मदत केली असती ना. मी इतक्या मुलांना शिकवतो तर माझ्या मुलाला शिकवू शकत नाही? लोक काय म्हणतील आता? माझ्यासारख्या प्रोफेसर चा मुलगा ड्रॉप आऊट? आपल्याला एखादी डिसेंट नोकरी मिळण्यासाठी काहीतरी डिग्री नको का हातात?"

"मी विचार केलाय त्याचा. मी नुसता घरी बसणार नाहीये."

"मग काय करायचं ठरवलंय तू?" आईने अधीर होऊन विचारलं.

"मला स्क्रिप्ट रायटर व्हायचंय. मला स्टुडिओजसाठी काम करायचंय."

"स्क्रिप्ट रायटर? तुला त्याबद्दल काही माहिती तरी आहे का? कशाच्या जोरावर सांगतोस की तुला ते जमेलच?"

"UCSD मध्ये असताना मी दोन शॉर्ट फिल्म्ससाठी स्क्रिप्ट्स लिहिल्या होत्या. सगळ्यांना त्या खूप आवडल्या होत्या."

"पण सायन्स सोडून एकदम रायटर आणि आर्टस् साईड?"

"हो, त्या nanoparticles मध्ये मला अजिबात रस नाही. तुम्ही खोल खोल मुळाशी जाता पण मला माणसांपासून अलिप्त राहिल्याचं फीलिंग येतं. काही जणांना ते जमतं आणि आवडतं पण मला स्वतःला एक्सप्रेस करायचंय. विज्ञानातील संशोधनातून आपल्याला अनुभव मिळतो पण अनुभूतीचे काय? तुम्हीच मला सांगायचात ना की विज्ञान म्हणजे स्वतःबद्दल, निसर्गाबद्दल आणि ह्या विश्वाबद्दलचं विशेष ज्ञान. कला म्हणजे निरनिराळ्या संवेदनातून माणसाच्या अस्तित्वाचा घेतलेला शोध. ज्या विश्वनिर्मितीचे कोडं तुम्ही उलगडत आहात ती एक कलात्मक सादरीकरण वाटावी इतकी सुंदर नाहीये का? कलेच्या माध्यमातून आपण आपल्या जीवनातल्या वेगवेगळ्या शक्यता उलगडून पाहात असतो. आपल्या विचारांना वाट करून देतो आणि मला तेच हवंय. मला जगाशी संवाद साधायचाय."

"पण म्हणजे नक्की काय करणार आहेस तू?" आईचे प्रश्न संपत नव्हते.

"मी फिल्म-मेकिंगचा एखादा कोर्स करून त्याविषयीच्या बेसिक बाबी समजून घेणार आहे. पण मुख्य म्हणजे मला स्क्रिनप्ले रायटर व्हायचंय."

"म्हणजे पुन्हा नव्याने सुरुवात?" आईने धास्तावलेल्या सुरात विचारले.

"मी माहिती जमवायला सुरुवात केली आहे. थोडे दिवस दे मला."

त्यादिवशीची चर्चा त्यांनी तिथेच थांबवली. शशांकना स्वतःच अपराधी असल्याचे वाटत होते.

दुसऱ्या दिवशी लंच टाईमला शशांकचा मेसेज आला नाही म्हणून भारद्वाज त्यांच्या ऑफिसमध्ये आले. चेहऱ्यावरून शशांक उदास व काळजीत दिसत होते. भारद्वाज ह्यांनी विचारल्यावर शशांकनी आदल्या दिवशीची घटना त्यांना सांगितली.


"एक प्रोफेसर आणि एक वडील म्हणून तुझी तगमग मी समजू शकतो. पण ही गोष्ट जरा धीरानं घे. अर्जुन युनिव्हर्सिटी सोडून आला

ही गोष्ट रुचणारी नाही हे मला मान्य आहे. पण मला सांग त्याने बळजबरीने जरी शिक्षण पूर्ण केले असते तरी पुढच्या आयुष्याचे काय? त्याच्या प्रोफेशनल करिअरमध्ये तो यशस्वी झाला असता? आताची दोन वर्षे फुकट गेली हे बरोबर. पण पुढचं आयुष्य वाया जाण्यापेक्षा हे बरं नाही का? मी अर्जुनला लहानपणापासून ओळखतो. तो स्मार्ट आहे. मला आठवतंय की हायस्कूलमध्ये तो त्याच्या शाळेच्या मॅगेझीनचा संपादक होता. त्याने लिहिलेली आर्टिकल्स मी वाचली आहेत. त्याला लेखनाची आवड तेव्हापासूनच होती. कदाचित त्याबद्दलचाच संवाद तुमच्यात झाला नाही. त्याला ज्याची आवड आहे त्यात तो नक्की यश मिळवेल." भारद्वाजच्या त्या शब्दांनी शशांकना धीर आला होता.

त्या विचारांतून शशांक बाहेर आले तोपर्यंत त्यांचे घर आले होते. गेल्या काही क्षणांत त्यांच्या डोळ्यांसमोरून दोन चित्रपट गेले होते. त्यांच्या चेहेऱ्यावर ते मुलाला समजून घेऊ शकल्याचे समाधान होते.

थोड्या वेळाने सर्व सत्कार समारंभ संपवून अर्जुन घरी आला. शशांकनी त्याच्या फिल्मची प्रशंसा केली व म्हणाले, "सिनेमाचा स्क्रीनप्ले खूपच आवडला. एक गोष्ट नक्की आहे. आता तुझ्या आयुष्याचा स्क्रीनप्ले एक वेगळी उंची गाठणार यात काहीच शंका नाही. ऑल द बेस्ट माय सन!"
अर्जुनने 'थँक यू' म्हणत शशांकना एक कडकडून मिठी मारली.

**अमित भावे - गार्डन ग्रोव्ह, कॅलिफोर्निया**




## वधू परीक्षा

कधी कधी आपल्याला गमतीदार गोष्टी सुचतात, कधी आजूबाजूला घडतात, कधी तशा स्वप्नात घडल्या आहेत, असे आपल्याला वाटते. कल्पनाच त्या ! सत्यात आता तरी नाहीत. पण येणारच नाहीत, असं मात्र नाही हं. वाचल्यावर तुम्हालाही त्या पटतील, आणि कदाचित पुढे असे होईलही असं वाटेल.

......(एक १२० वर्षाच्या आजी, आणि त्यांच्या मैत्रिणी यांच्यामध्ये १०० वर्षांनंतर कसा संवाद असेल त्याची ही गोष्ट)

**समता:** काय नमे! हल्ली मुलांना मुली मिळणं कठीण झाले आहे तरी सुध्दा तुझ्या ७० वर्षाच्या मुलाला मुलगी मिळाली म्हणे! कशी आहे मुलगी? पाहिलीस का?
**नमा:** हो ना! मुली मिळणं किती कठीण झाले आहे! काही वर्षांपूर्वी मुलींची गर्भात किंवा बाहेर हत्या केल्यामुळे आता मुली झाल्या आहेत कमी! आणि मुलं जास्ती!.....त्यात ही नवीन आलेली लग्नाची पांडव पध्दती!
**रमा:** मुली कमी म्हणून ५ मित्रांत एक नवरी! आपण कितीही पुढारलेल्या असलो तरी आपल्याला हे काही पटत नाही!
**नमा:** हो ग! पण काय करायचं? आता आयुर्मर्यादा वाढली आहे. १६०/१७० सरासरी वय असते. आपण आता १२० वर्षाच्या वाटतो तरी का? मुलं पण ७०/७५ वर्षाची झाली तरी लग्नच करीत नाहीत. ही ४० वर्षाची आहे. म्हणजे झाला तर बालविवाहच म्हणायला लागेल हिचा! आली होती घरी म्हणून मुलासाठी बरी आहे का पहात होते!
**रमा:** मग. कशी होती मुलगी?
**नमा:** "कप्पाळ माझं!" आता ही मुलगी कशी होती सांगू? गुलाबी केस, लाल डोळे, गालावर लाल टॅटू, ड्रेस लाल. हिला म्हणे वेगळा लूक हवा रोज! रोज वेगळा कलर! आणि एक दिवस तर...विदाऊट ड्रेस...सर्व शरीरच कलरफुल रंगवायचं ...शी ..शी! काय ही फॅशन ! आम्ही काय केली नाही का फॅशन ? पण अशी नाही हो केली!"
**समता:** नाकी डोळी तरी बरी होती का?
**नमा:** अग तिने सर्व दात काढून, ऑपरेशन करुन इनप्लांट केले आहेत! आधुनिक कवळीच ग! ती ही या लहान वयात! नकटी होती म्हणे. सर्जरी करुन नाक मोठे केले आहे!

**रमा:** उंची?

**नमा:** ती बाहेरुन आली ना, तेव्हा १० फूट होती!! म्हणजे पूर्वी विदूषक नाही का दोन उंच काठ्यांवर  चालायचे? तशी आली चालत! घरात ती ७ फूट उंच वाटली! खरी केवढी आहे तीच जाणे!

फिगर म्हणाल तर झिरो फिगर. काही खाते की नाही कोणास ठाऊक! पण तेही बदलते पॅड्स  लावून!

**रमा:** सोडून द्या हो!

**नमा:** मधे म्हणे तिचा एक हात दुखत होता. तर तो काढून दुरुस्तीला दिला. टेंपररी दुसरा हात लावला. पण तो वेगळ्या रंगाचा आहे! २ वर्षापूर्वी हिमालयात हार्टअ‍ॅटॅक आला. आता कृत्रिम हृदय बसवले आहे.

अशी खोटी मुलगी नको बाई मला सून म्हणून!

खरंच होईल का असं? १०० वर्षानंतर?

वधू परीक्षा हा शब्द तरी तेव्हा असेल का?


कदाचित नसेल! म्हणजे वधू पण नाही आणि परीक्षा पण नाही! मग या भेटीला काय नाव द्यावे बरे?

शेवटी ही कल्पनाच आहे, नावांत काय आहे?..


**चित्रा मेहेंदळे - बेल व्ह्यू, वॉशिंग्टन**


BMM बृहन्महाराष्ट्र मंडळ

Reshimgathee



नाते जुळते मनाशी मनाचे



A BMM Matrimonial initiative for Maharashtrians in North America

https://reshimgathee.bmmonline.org/


## स्टेशनरीचे जग

स्टेशनरीचे जग .. विषय वाचताच अनेक वर्षे विस्मरणात गेलेला शब्द आठवला. आता स्टेशनरी म्हणण्याची सवयच तुटली आहे. इथे अमेरिकेत ऑफीस सप्लाईज, स्कूल सप्लाईज असा विभाग असतो. त्यामुळे पेन, पेन्सिल काही हवं असलं की आपसूक पावले या विभागाकडे वळतात.

किती रंगीत जग असतं नाही हे? अगदी सुंदर! हे जग आवडण्याचं एक महत्वाचं कारण म्हणजे ही सारी व्यक्त करण्याची, व्यक्त होण्याची माध्यमे आहेत. इथे फुलपाखरांचे पंख आहेत, रंगीबेरंगी खडूंमधून अनेक छटांचे रंग कागदावर उतरवण्याची ताकद आहे. लिहिताना व्यक्त होताना झालेल्या चुका खोडरबराने खोडून, झालं गेलं विसरून नव्याने लिहिण्याची, चितारण्याची ताकदही आहे. लिहिताना व्यक्त होणाऱ्या भावानुसार अनेक रंगाच्या शाईची पेनं आहेत. हवा तो रंग निवडण्याची मुभा आहे. मग तो निवडताना कुणाचही दडपण नाही. प्रत्यक्ष जगातही असच असतं तर किती छान झालं असतं ना?

इतकच काय एखाद्या गुलाबी रंगाच्या गोड अक्षरांबरोबर शुभेच्छांचा गोड गोड सुवास त्या व्यक्ती पर्यंत पोहोचवण्याची निराळीच मजा आहे. इथेच आपल्याला मिळतात नवे कोरे चित्रांचे कागद, जणू एक आत्मविश्वास देतात की, घे हा कागद आणि काढ चित्र तुला हव तसं! घे सुंदर रंग आणि भर त्या चित्रामधे! मनापासून काढलेलं काहीही सुबकच येणार तेव्हा काळजी करू नकोस ! प्रत्यक्ष जगात असा विश्वास कोण देतं सांगा ?

स्टेशनरीच्या या जगात निर्मितीची क्षमता इतकी ठासून भरली आहे ना की इथे आल्यावर मन बागडू लागतं. रंग बघू की कोऱ्या कागदाचा वास डोळे मिटून श्वासात भरून घेऊ ? की जीवनाचे क्षण सजवण्यासाठी साऱ्या रंगांची मार्कर्स (स्केचपेन आता पटकन येत नाही तोंडात) घेऊ? की मनातली गुपितं लिहायला, जिवापाड जपायला, स्वतःशीच संवाद साधायला एखादं जर्नल (डायरी) घेऊ? खरंच या जगात न माझं ‘ॲलिस इन द वंडरलँड’ सारखं होतं. काय घेऊ? काय पाहू? असं.

इथला आणखी एक आवडता भाग म्हणजे कोऱ्या वह्यांवरील चित्रं! ती निवडताना किती ते विचार? खरं तर आत काय लिहिलं जाणार ते महत्वाचं, पण जग रहाटीप्रमाणे आपलंही ‘काय भूललासी वरलिया रंगा?’ असंच काहीसं होतं. निर्णयाच्या निवडीची क्षमता इथेच

पक्की होत असावी. आपल्या मनाला भावेल अशी रंगसंगती आपण निवडतो. तिथेही आपण एकमेकांची आवड जपण्याचा प्रयत्न करतो. माझ्या मुलीसाठी चित्र निवडताना मी कुत्र्याच्या पिल्लांची किंवा मांजरीच्या गोंडस पिल्लांची चित्रे निवडते. ही सारी चित्रे, नवा कोरा वास भरताच अंगात उत्साहाचं वारं संचारतं. अरे, अजून खूप काही करण्यासारखं आहे हा विश्वास बळावतो आणि जगण्याला नवी दिशा मिळते.

शाळेच्या नव्या वर्षात ह्या वस्तू खरेदी करणं प्रचंड आवडायचं. एक गंमत आठवली. ठाण्यात गोखले बंधू म्हणून एक दुकान होतं. त्यांच्याकडेच फक्त हिरव्या ओळी असलेल्या गुळगुळीत वह्या मिळायच्या. माझ्या मैत्रिणीचं अक्षर फार सुरेख होतं. मला आपलं वाटे ती या वह्या वापरते म्हणून छान अक्षर येते. मग मी पण आईकडे हट्ट करायचे, मलाही त्याच वह्या हव्यात. साधनं महत्वाची नसतात, साध्य करणारा महत्वाचा असतो, त्याची मेहनत कारणी लागत असते ते त्या वयात कळत नव्हतं आणि आताही त्याची स्वतःला आठवण करून द्यावी लागते.

या सामानात मिळणारे तक्ते, विविध टेबल्स फार उपयोगाची. सतत सराव केल्याने सर्व काही साध्य होतं, याची आठवण करणारे. आणि भिंतीवर ते लावले की एक अभ्यासू वातावरण तयार होतं. ज्याचा प्रभाव अभ्यास करणाऱ्या व्यक्तीच्या मनावर खूप पडतो. इथे ना, असे हवामान सांगणारेही तक्ते असतात आणि मुलांना रोज त्यावरचे स्टीकर्स बदलायला सांगतात. आपल्याला ढीग लख्ख सूर्य हवा पण तसं असेलच असे नाही. एकाच कृतीतून रोजचं हवामान, मुलांनी स्वतः काही केल्याचं समाधान आणि परिस्थितीशी जुळवून घेता यायला हवं हा संदेश ! एका दगडात तीन पक्षी. आहे न कमाल?

अशाच असंख्य गोष्टी या विभागात येतात. स्टेपलर्स जणू जोडून ठेवण्याची शिकवण देत असावे तर युक्लिप तात्पुरती युती करत असावे. बाकी तात्पुरती युती आणि जोडून ठेवणे किती महत्वाचं आहे हे आजुबाजुच्या परिस्थितीवरून एव्हाना लक्षात आलंच असेल.

याच जगात एक विभाग या सर्व वस्तू नीट ठेवण्याचा, बुलेटीन बोर्डस्, छोट्या डायऱ्या, लिस्टपॅड, लहान मोठे फळे असे कितीतरी प्रकार येतात. हे सारं सामान पाहिलं तरी एक उर्जा मिळते. नव्याने सर्व सुरू करण्याची उभारी मिळते. आजवर झालं ते झालं, आता सर्व नीट मांडू असे आतून शब्द उमटतात आणि त्या जादूई दुनियेत आपण हरवून जातो. पण याची दुसरी बाजू मात्र खेदकारक आहे. ज्यांना या जगात यायला मिळत नाही ते मात्र फार वंचित राहतात. एखादा दाता काहींना मिळतो आणि त्यांचं जग बदलून जातं पण ज्यांना मिळत नाही ते या जगात असून स्वतःच्याच जगात राहतात जमिनीवर काठीने रेघोट्या मारत!

**शिल्पा कुलकर्णी - लुईव्हील, केंटकी**

## ‘अन्न’ - अभिव्यक्तीचे उत्कृष्ट माध्यम

'अन्नधान्य' ही सर्व प्राणिमात्रांना मिळालेली ‘निसर्गाची देणगी’. विविध प्रकारच्या भाज्या, फळे, धान्ये यांच्या रूपाने जणू ईश्वराचे ऐश्वर्यच प्रकट होत असते. जी जी जीवनसत्वे आपल्या शरीराला आवश्यक असतात ती सर्व देणारी पिके व झाडे या निसर्गात मुबलक प्रमाणात वाढतात. सर्व प्रकारच्या चवींचा आणि रसांचा लाभ या विविध रंगी फळे व भाज्यातून आपल्याला मिळतो. पृथ्वी माता जणू आपल्या बालकांवर या द्वारे ममतेची बरसात करत असते.

‘अन्न’ ही सर्व प्राणिमात्रांची ‘मूलभूत गरज’. ते शरीराचे भरण पोषण करते. शरीराला ऊर्जा देते. आपण कोणते अन्नपदार्थ खातो यावर आपले आरोग्य, शरीरक्षमता ठरत असते. आपल्या प्रत्येक पेशी न पेशीला योग्य ती जीवनसत्वे देऊन सुदृढ व कार्यक्षम करण्याचे काम अन्नातून होत असते. त्यामुळे आपल्या जीवनात अन्नाला महत्वाचे स्थान आहे. 'अन्न हे पूर्णब्रह्म' हे निर्विवाद सत्य आहे.

'अन्न' नवनवीन पाककृतींद्वारे, विविध रूपात आपल्या समोर येते. आपली कल्पकता, कला व कौशल्य व्यक्त करायला देणारे हे एक उत्कृष्ट माध्यम आहे. निसर्गातील अन्नसाठा अनेक माणसांना लाभावा म्हणून मानवाने शेतीचे तंत्रज्ञान निर्माण केले. विविध चवी एकत्र आणून अनेक चविष्ट पदार्थ बनविणारे पाकशास्त्र निर्माण केले. या सर्व चवींमध्ये एकसुरीपणा न राहता नावीन्य यावे यासाठी सतत प्रयत्न केले. अलीकडच्या काळात वेगवेगळ्या देशांमधील पदार्थ एकत्र करून नवनवीन fusion रेसिपी तयार झाल्या. हे पदार्थ लोकांना भावतील अशा तऱ्हेने मांडून ठेवणे आणि वाढणे याच्याही अनेक नवनवीन कल्पना तयार झाल्या.

पाकशास्त्राने कितीही चवदार पदार्थ निर्माण केले असले तरी ते खाताना कसे, कधी आणि किती खावे याचे देखील नियम निर्माण झाले. यातून व्यक्त होते माणसांची अभ्यासू व संशोधक वृत्ती. आपल्या प्रकृतीनुसार आणि ऋतूमानानुसार कोणते अन्न किती प्रमाणात खावे आणि कोणत्या वेळी खावे, चौरस आहार कसा घ्यावा

याचे शास्त्र म्हणजे 'आहारशास्त्र'. योग्य अन्न योग्य प्रमाणात खाल्ले तरच ते पूर्णब्रह्म. कितीतरी वेळा लहान-सहान आजारांवर उपचार करताना आपल्या स्वयंपाकघरातील पदार्थ प्रभावी ठरतात आणि 'आहार हेच औषध' हा अनुभव येतो.


'अन्न' हा आपल्या संस्कृतीचा महत्वपूर्ण भाग आहे. प्रत्येक प्रदेशातील 'अन्नपदार्थ' हे आपल्याला त्या प्रदेशातील संस्कृतीशी जोडत असतात. हे अन्नपदार्थ बनविण्यासाठी वापरलेले घटक हे बरेचदा त्या प्रदेशाच्या भौगोलिक परिस्थितीनुसार ठरत असले तरी हे पदार्थ बनविण्याची पद्धत, त्याची चव, ते इतरांना वाढण्याची पद्धत, ते खाण्याची पद्धत या सर्व गोष्टी त्या त्या प्रदेशातील संस्कृतीची ओळख करून देत असतात. वेगवेगळ्या सणाच्या वेळी करायचे ठराविक पदार्थ, त्यासंबधीची पिढ्या न पिढ्या चालत आलेली परंपरा हे सर्वच देशात व प्रदेशात आपल्याला दिसून येतात. आपल्या संस्कृतीचा, सणांचा, उत्सवाचा आनंद साजरा करायला देणारे 'अन्न' हे प्रभावी माध्यम आहे.

'अन्न' हे आपले प्रेम, उत्साह व आनंद व्यक्त करायला देणारे उत्कृष्ट माध्यम आहे. कुटुंबातील स्त्रीचे आपल्या कुटुंबियांवर असलेले प्रेम, जिव्हाळा, कर्तव्यभावना हे तिने केलेल्या अन्नपदार्थातून व्यक्त होत असते. कुटुंबातील लोकांनी केलेले पाहुण्यांचे आदरातिथ्य हे त्यांनी बनवलेल्या अन्नातून, त्यांच्या वाढण्यातून, आग्रहातून व्यक्त होत असते. गृहिणीने उत्तम जेवण केल्यावर तिची प्रशंसा करणारे पती, मुले, सासू सासरे, पाहुणे मंडळी तिला नवा उत्साह देऊन जातात. दूर प्रवासाला जाणाऱ्या आपल्या मुलाला अथवा मुलीला दिलेल्या आवडत्या पदार्थांच्या शिदोरीतून आईची ममता आणि काळजी व्यक्त होत असते. आईने किंवा आजीने प्रेमाने आपल्या दमलेल्या लहानग्याला भरविलेला लुसलुशित गरम गरम वरण भाताचा घास खाऊन तो जीव तृप्त होतो आणि शांतपणे झोपी जातो. कोणीतरी आवडीचा खाऊ आपल्यासाठी आणला आहे हे बघताच लहान मुलाच्या चेहऱ्यावर निरागस आनंद ओसंडून वाहू लागतो.

'अन्न' हा माणसा माणसांना एकत्र आणणारा आणि 'मैत्री'ची भावना व्यक्त करणारा सुंदर दुवा आहे. विविध अन्नपदार्थांची आवड असणारे, ठिकठिकाणी जाऊन तिथल्या खास पदार्थांचा आस्वाद घेण्यासाठी उत्सुक असलेले खवय्ये मित्र, सुट्टीच्या दिवशी किंवा सणाच्या दिवशी एकत्र येणारे, पंगतीवर बसून जेवण उरकल्यावरही हात वाळेपर्यंत तासन तास गप्पा मारत राहणारे आप्त स्वकीय, नवनवीन पदार्थ बनविण्याची आवड असणाऱ्या आणि एकमेकांकडून विविध पाकक्रिया शिकणाऱ्या मैत्रिणी लोणची, पापड, दिवाळी फराळ करण्याच्या निमित्ताने एकत्र येऊन गप्पा गोष्टी करणारा महिला वर्ग हे सर्व त्या अन्नाच्या धाग्याने एकमेकांना जोडले जातात.

'अन्न' हे पुण्यकर्माचे आणि आपली करुणा व्यक्त करण्याचे साधन आहे. भुकेने व्याकुळ झालेल्या गरीब माणसाला करुणेपोटी दिलेले अन्नाचे चार घास खूप मोलाचे वाटतात. तो देणाऱ्याला भरभरून आशीर्वाद देतो. दमून भागून आलेल्या व्यक्तीला अन्नाचे चार घास पोटात जातात तेव्हा ती व्यक्ती देणाऱ्याची मनापासून कृतज्ञता व्यक्त करते. सामाजिक भावनेतून चांगल्या प्रतीचे आणि योग्य भावातील धान्य, फळे, भाज्या उपलब्ध करून शेतकरी आणि विक्रेते समाजासाठी सत्कर्म करतात.

'अन्न' हे अनेक सुंदर आठवणींना उजाळा देते. जीवनातील सुखद आठवणींचा आनंद व्यक्त करण्याचे ते माध्यम आहे. आपल्या आवडत्या व्यक्तीच्या हातचा आपल्याला आवडणारा एखादा खास पदार्थ आपण बनविला किंवा इतर कोणी बनविला की त्या व्यक्तीची आठवण जागृत होते. आपण पहिल्यांदाच केलेला एखादा पदार्थ पहिल्याच प्रयत्नात यशस्वी झाल्याची सुंदर आठवण आपल्याला आत्मविश्वास देते तर कधी पहिल्यांदा केलेला एखादा पदार्थ सपशेल फसल्याची मजेशीर आठवण आपल्या चेहऱ्यावर हसू आणते. आप्तस्वकीयांनी एकत्र येऊन सणावारी गोडाधोडाच्या जेवणावर मारलेला ताव आणि त्याबरोबर रंगलेल्या गप्पा, पावसाळी हवेत बाहेर जाऊन मनसोक्त खाल्लेली गरमागरम भजी, वडापाव आणि त्याबरोबर वाफाळता चहा, एखादी नावडती भाजी केली असेल तर जेवणापासून शोधलेली पळवाट, घरी खास पाहुणे येणार म्हणून मनापासून केलेले त्यांच्या आवडीचे पदार्थ अशा एक ना अनेक सुखद आठवणी हे 'अन्न' जागृत करते.



अन्नाचे आपल्या जीवनातील महत्व वादातीत आहे. 'अन्न' हे विविध कला, कौशल्ये, सद्गुण, भावना यांना वाट करून देऊन इतरांपर्यंत पोचविण्यासाठी लाभलेले उत्तम माध्यम आहे. आपल्या ठिकाणी असणाऱ्या कला-गुणांद्वारे, आवडी द्वारे इतरांना आनंद देण्याचे, त्यांच्याशी जोडण्याचे ते उत्कृष्ट साधन आहे. आपल्या जीवनात अनेक भूमिका बजावणारे बहुगुणी 'अन्न' हे आपल्याला मिळालेले निसर्गाचे वरदानच आहे!

**अश्विनी तासगांवकर - सॅन होजे, कॅलिफोर्निया**

## 65 Cromwell Avenue




वरील शीर्षक वाचले तर असे वाटेल की एखादी रहस्यप्रधान गोष्ट असेल. पण तसे नसून ही एक खूप रोमांचक गाथा आहे. माझ्या लंडन प्रवासात ही जागा म्हणजे 65, क्रॉमवेल ऍव्हेन्यू, हायगेट, नॉर्थ लंडन, मला शोधून काढायचे होते. पिकॅडलीहून टॅक्सी घेतली. अर्ध्या तासात हायगेटला पोहोचलो. ६१ नंबर नंतर थोड्या अंतरावर ६५ नंबरचे घर दिसले. जी पाटी पाहण्याची आतुरता होती ती नाही दिसली पण एक निळी प्लॅक दिसली, त्यावर लिहिले होते "Vinayak Damodar Savarkar 1883-1966 Indian Patriot and Philosopher lived here". मी शोधत होतो ते "इंडिया हाऊस" हेच होते. १९८५ साली ग्रेटर लंडन काउन्सिलनी लावलेली प्लॅक.

१९०५ साली भारतीय क्रांतिकारी, वकील, देशभक्त आणि पत्रकार श्री श्यामजी कृष्ण वर्मा यांनी इंडिया हाऊस या वास्तूची उभारणी केली. त्यांनी इंडियन होमरूल सोसायटी, भारतीय समाजशास्त्र संस्था यांची पण लंडनला स्थापना केली. त्या काळी इंडिया हाऊस हे क्रांतिकारी युवा पिढीचे गढ होते. स्वातंत्र्यवीर सावरकर, लाला लाजपतराय, लाला हरदयाल, विपिनचन्द्र पाल, मदनलाल धिंग्रा, वीरेंद्र नाथ चट्टोपाध्याय, वी.वी.एस. अय्यर, तिरुमल आचार्य, हे सर्व तिथे राहात होते किंवा, त्यांचा तेथील हालचालीत सक्रिय सहभाग असायचा. त्यावेळी इंग्लंडला शिकायला येणाऱ्या भारतातील मुलांना तिथे राहण्याची सोय असायची, मात्र एक अट असायची की शिक्षण संपल्यावर कुणीही ब्रिटिश सरकारची नोकरी करायची नाही.

दक्षिण आफ्रिकेतून परतताना गांधीजींनी काही दिवस लंडनला मुक्काम केला तेव्हा दसऱ्याच्या एका कार्यक्रमात ते इंडिया हाऊसला आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष सावरकर होते. काही दिवसांपूर्वीच मदनलाल धिंग्रांनी कर्जन वायलीचा वध केला होता म्हणून गांधीनी येण्यापूर्वीच ही अट घातली की, धिंग्रा यांचा उल्लेख कुठल्याही भाषणात होता कामा नये. तसेच त्या वेळेस जवाहरलाल नेहरू पण लंडन येथे शिकायला होते पण ते इंडिया हाऊस पासून दूरच राहिले. याचा उल्लेख त्यांनी आपल्या आत्मचरित्रात केला आहे. बहुतेक ब्रिटिश सरकारच्या भीती किंवा आश्रयाने असे असावे.

तर असे हे इंडिया हाऊस, माझ्या डोळ्यासमोर होते. चार पायऱ्या चढून घराच्या दाराशी पोहोचलो. कॉलबेल दाबली. एक युरोपियन गृहस्थ डोकावले. त्याची प्रश्नवाचक मुद्रा पाहून आम्ही पहिल्यांदा अवेळी (दुपारचे तीन वाजले होते) येण्याबद्दल क्षमा मागितली आणि सावरकरांच्या प्लॅककडे बोट दाखवून येण्याचा हेतू सांगितला. त्यावर तो हसला आणि आम्हाला आत बोलावले. मग हसून म्हणाला मला याची सवय झाली आहे. आठवड्यातून दोन तीनदा तरी लोकं या कारणास्तव येत असतात. त्याने त्याचे घर/फ्लॅट दाखवले. तीन खोल्या होत्या, छान व्यवस्थित ठेवलेल्या. त्याच्याबद्दल विचारले तर तो म्हणाला माझे नाव मार्क आहे आणि मी जर्मन आहे. माझी बायको कॅनेडियन आहे. ती आजच सकाळी कॅनडाला गेली. तो एका कंपनीत (नाव लक्षात नाही) काम करतो आणि याची एक शाखा मुंबईत असल्याने त्याला भारताबद्दल थोडी माहिती आहे. ही जागा त्यांनी दहा वर्षापूर्वी विकत घेतली आणि याचे नूतनीकरण केले.




सर्व ऐकत असताना माझ्या डोक्यात विचारचक्र सुरू होते की हीच ती जागा जेथे सावरकर, धिंग्रा, अय्यर, आचार्य आणि इतर क्रांतिवीर रहात होते; शंभर वर्षापूर्वी ते इथे कसे वावरत असावेत आणि

भारताच्या स्वातंत्र्याकरिता त्यांनी कशा योजना आखल्या असतील. अगदी ट्रान्स मधे गेल्यासारखेच झाले. भानावर तेव्हां आलो, जेव्हां मार्कनी आपल्याकडील पुस्तकांचे कलेक्शन दाखवले. वेगवेगळ्या विषयांवर होती. मग त्यांनी मुद्दामून तीन पुस्तकं दाखवली – Ideas, Bombs and Bullets (लेट ॲडम यामी), Rationalism of Veer Savarkar (लेट वी.एस. गोडबोले) आणि Savarkar (लेट विक्रम संपत). त्याच्याकडे ही पुस्तके पाहून आम्हाला आश्चर्यच वाटले आणि त्याला या बद्दल विचारले. तो उत्तरला की इतकी लोकं येथे आली की त्याला पण सावरकरांच्या बाबत जाणून घेण्याची इच्छा झाली म्हणून ही पुस्तक विकत घेतली. काही पुस्तके येणाऱ्या लोकांनी भेट म्हणून दिली. पुढे बोलतांना तो हे म्हणाला की, सावरकर आणि गांधी यांच्यामधे मतैक्य नव्हते पण आताचे मोदी सरकार या बद्दल बरेच काही करत आहेत. ही जागा विकत घेण्याचा प्रयत्न भारत सरकार करत आहे पण त्याची विकायची इच्छा नाही. मी मनात देवाची प्रार्थना केली की याला ही जागा भारताला विकायची सद्बुद्धी होवो. मग त्याला विचारले की सावरकर ब्रिटिशांच्या विरोधात होते, क्रांतिकारक होते, तुम्हाला याचा राग येत नाही? तो लगेच उत्तरला, मी जर्मन आहे. ऐकून आम्हा सर्वांना हसू आले. मग त्याची परवानगी घेऊन तिथले बरेच फोटो काढले आणि अगदी भारावलेल्या मनाने बाहेर पडलो. एक विचार सारखा मनात घोळत होता की असंख्य ओळखी-अनोळखी क्रांतिवीर, शूरवीरांच्या बलिदानातून भारताला स्वातंत्र्य मिळाले!

**डॉ. प्रमोद जोशी - कानपुर**

## चारोळी

अंधारात लुकलुकणारा
निसर्गदत्त रेशीम दिवा
निबिड रानी प्रकाश जत्रा
भरवतो जिवंत काजवा

**कल्पना मापूसकर - ठाणे**

## पुस्तके काही सांगू इच्छितात

"चाळीत गाळीत, पडलो धुळीत
जगणे शिकविले, एकाच ओळीत.

सारखे तुम्ही असे, का होता तांत्रिक
उचला धुळीतून, जगवेन मार्मिक"

आज दिशाहीन होणारा मानवी समाज पुस्तकापासून दूर जात आहे. त्याला दिशावान बनविण्यासाठी पुस्तके काहीं सांगू इच्छितात.

पुस्तके म्हणतात... "झालो जरी झिरझिरित तरी हवे तेवढे शुध्दतेचे समाधानाचे ज्ञानामृत देण्याचे सामर्थ्य माझ्याकडे आहे. वषानुवर्षे लोटली तरि माझ्या कुशीत असलेला ज्ञानाचा निखळपणा नेहमी आपणास तेजोमय करेल. सुर्याच्या दैदिप्यमान प्रकाशात अंधाराचा भास घेऊन जगणारे तुम्ही लोक......! व्यस्ततेत धावता .... धावता..धावता सारखी पडण्याची भीती बाळगणारी तुम्ही माणसे...जरा माझ्या जवळ या.. नक्कीच... मी,आपणास अंधारातही तुमचं व्यक्तिमत्त्व झळकावं असं सामर्थ्य देऊ करेन.....! सामाजिक, आर्थिक, कौटुंबिक व शैक्षणिक परिस्थितीत खुंटलेले आपले विचार प्रवाहित करण्याची सक्षमता माझ्यात आहे. आजची युवा पिढी एकांताची अपेक्षा ठेऊन जगत आहे. एकटेपणाचा त्यांचा वावर समाजासाठी घातक आहे. आपल्या भावनांची अभिव्यक्ती कुठेही होऊ देत नाही. आतील घुसमट त्यांना व्यक्तीहीन बनवत आहे. सडलेल्या विचारांची बिजं घेऊन समाजात तसाच्या तसा पेरित चालली आहे. हीच युवा पिढी शारीरिक मानसिक व बौध्दिक दृष्ट्या यांत्रिक बनत चालली आहे. आजच्या पिढीतील युवकांनी नक्कीच मला जवळ केले तर भविष्यातील यांचा अनर्थ टळेल व एक विकसित समाजाची उभारणी होईल."

समाज आणि संस्कृती यांची सांगड घालायची असेल तर पुस्तकाची साथ महत्वाची असेल. सुदृढ समाजाची ओळख ही पुस्तकांमुळेच होत असते. आपुलकीची आणि संस्काराची कमतरता असलेली येणारी ही पुढील पिढी - त्यांच्यात असलेल्या शारीरिक सबलतेची उणीव आपल्याला प्रकर्षाने जाणवून देत आहे. वाचन आणि

लेखन हे मानवी समाजाची हितकारी शस्त्रे आहेत. याला घेऊन सामाजिक क्रांती ही मनाजोगी होऊ शकते.

"शांततेच्या ओझ्यामुळे, गोठला जन समाज
वाचन आणि लिखाणातून, दिव्यत्वाची घडो क्रांती आज."

आज युवा पिढीस सांगायचे झाले तर 'कोणत्या पुस्तकाचे वाचन करावे' हा एक अंकुरित प्रश्न मुलांच्या मनात येऊ पाहतो. त्याचे उत्तर असे असेल की, अश्या पुस्तकांचे वाचन करुयात की, ज्यामुळे आपल्यात आलेली पठारावस्था जाईल व आपल्यात एक क्रियाशील क्षमता येईल. जशी कठोर परिश्रम करून मोठी झालेली असामान्य श्रेष्ठ मंडळी किंवा आपल्याला योग्य दिशा दाखविणारी प्रेरणात्मक पुस्तके, आपल्या दिशाहीन होणाऱ्या विचार मथंनास स्थिरता देणारी, समाधान देणारी वैचारिक पुस्तके... अशी अनेक पुस्तकांची खाण आपल्या समोर आहे. त्याचा कश्या प्रकारे उपयोग करुन घ्यावा हे आपल्या हातात आहे. माणसातील क्रियाशीलता ही माणसाला प्रगतीच्या वाटेवर नेते. वाचनाने समाजातील प्रत्येक नागरिक व्यापक विचार करू शकतो, त्यात संकुचितपणा राहणार नाही. जिथे व्यापक विचार असतात तिथे यशाच्या अनेक वाटा समोर येऊन उभ्या असतात आणि आपल्या समोर आपल्या यशासाठी अनेक मार्ग खुले होतात. ते मार्ग आपले स्वागत करित असतात. भारताचा प्रत्येक नागरिक वाचनाने सुधारू शकतो. देशाचा प्रत्येक नागरिक विचाराने सक्षम झाला तर आपला देश प्रगत होईल यात शंका नाही!

विचारसंस्कृती ही मानवी समाजाचा अमुल्य ठेवा आहे. माणसाने नेहमी आपण कसा विचार करतो याचाही विचार केला पाहिजे आणि असे विवेकी विचार फक्त वाचनातुन मिळत असतात. विचारांची प्रगल्भता फक्त आणि फक्त पुस्तकांच्या वाचनामुळे वाढत असते.

**प्रा. अर्चना कुलकर्णी - अंबाजोगाई**



## काशी - एक सल

संत वाङ्मय हा महाराष्ट्राचा मोठा वारसा. दासबोध वाचून बरीच वर्ष झाली होती. पुन: वाचायला सुरवात करताना एक विचार मनात आला. नारायण (रामदास) याची बोहल्यावर उभी असलेली वधू काशी डोळ्यासमोर आली. केवळ ९ वर्षांची मुलगी, मुंडावळ्या बांधिलेली, मोठ कुंकू, दागिन्याने मढलेली, नऊ वारी पातळ सावरत, हातात हार घेतलेली मध्ये अंतर्पाट पलिकडे नारायण. तोही लहानच १२ वर्षांचा. आईला दिलेले वचन पाळण्याकरिता, या विश्वाचा विचार मनात ठसलेला, नाईलाजाने बोहल्यावर उभा. यातून कसं बाहेर पडायचं याचा विचार करत असेल का? मामेभाऊ तिचा नवरा होणार होता. त्यांच नवीन आयुष्य सुरु होणार होत. पण घडलं सगळं अघटितच.

मंगलाष्टक सुरू झाली आणि "सावधान" हा शब्द कानावर पडला नारायणाच्या. त्याने धूम ठोकली. मंडपात कल्लोळ माजला. नवरा मुलगा पळाला. सगळे पुरुष त्याच्या मागे धावत सुटले. नारायणाचा भाऊ पण त्यात अग्रभागी होता. पण नारायण काही हाती लागला नाही. परतला तो रामदास म्हणूनच! कित्येक वर्षांनी साधना पूर्ण करूनच. मंडपात त्या लहान वधूला काय वाटले असेल? ती इतकी लहान होती की सगळी परिस्थिती तिच्या लक्षात आली असेल का? का नारायण धूम पळाला म्हणून गम्मत वाटली असेल?

नारायण सापडेना तेव्हा त्याचा मोठा भाऊ गंगाधर याने नवीन वर शोधला. ब्राम्हण वर तयार होईना. एक तरूण मराठा तिच्या बरोबर विवाह करायला तयार झाला आणि ते लग्न लागलं. वधू काशीच्या वडिलांनी खूप प्रयासाने विवाहाला परवानगी दिली. १७ व शतक, मराठा तरूण - नवीन वर, मंडपातून पळून गेलेला वर, एक लहान ब्राह्मण वधू, कन्यादान केलं नारायणाचा भाऊ गंगाधर याने. हा पहिला आंतरजातीय विवाह होता, मराठा आणि ब्राम्हण यांचा. पण रूढींचा पगडा जबरदस्त असतो.

काशीचे शव एका जवळच्या विहिरीत सापडले. थोड्याच आठवड्यांत लग्नानंतर. तिने जीव दिला का तिला विहिरीत कुणी ढकलल ते तो काळच जाणे. तो काळ, मराठा ब्राम्हण विवाह, आजूबाजूच्या लोकांचा जाच, घरात कुचंबणा! कोणास ठाऊक, कसं हे घडलं? अनेक कारणे एकत्र येतात. घटना घडतात.

१२ वर्षाच्या नारायणाचा मार्ग ठरलेलाच होता. तो तर जगाला मार्ग दाखवण्याकरिताच जन्मला आला होता. आईला लग्नाचं वचन दिल होत. हे सर्वच रूढींचे बळी होते. तत्कालीन परिस्थिती रुढींच्या बंधनात जखडलेली. पण या घटनेत पण रुढीला टक्कर देणारे होतेच. नारायणाचे बंधू गंगाधरपंतानी वर शोधला तो मराठा म्हणून. ब्राह्मण कुटुंबातून संपूर्ण विरोध. काशीचे वडील तयार झाले. मुश्किलीने गंगाधरपंत, काशीचे वडील, मराठा वर साखाजी मिंधर, अंबड गावात सोमवाडीचा देशमुख. या तिघांनी समाजाच्या तीव्र विरोधाशी सामना दिला.

रामदास आणि त्यांचे अप्रतिम दासबोधासारखे ग्रंथ, शिवाजीमहाराजांना गुरु या नात्याने दिलेला सक्रीय पाठिंबा हे तर सगळ्या महाराष्ट्रात प्रसिद्ध आहेतच. रामदासांच नाव माहिती नसलेला महाराष्ट्रात तर विरळाच!


बळी पडली ती अल्पवयीन काशी. जालना येथे अंबड गावात तिने जीव दिला का तिची हत्या झाली ते सांगायलाच आता कोणी नाही. पण ती बारव अजून सती काशीची बारव म्हणून ओळखली जाते.

या घटनेत खलनायक नाही. येथे धैर्य आहे. संयम आहे. रुढीशी झगडा तर आहेच रामदास पण आहेत.

काशी, एक कोवळी निष्पाप पोर समाजाच्या अंध रुढीचा बळी ठरली.

या सगळ्या रामदासी पंथात काशीच अस्तित्व आहेच. ही तिची आठवण आणि आपल्या मनांत अशा अंधश्रद्धा किती दडल्या आहेत हे पहाण्याची एक संधी!

**सुमन जोशी - वॉलनट क्रीक, कॅलिफोर्निया**




## महाराष्ट्रीयन अमेरिकन!

मायभूमी अन् कर्मभूमीची सांगड सहजी येते जुळूनी
अमेरिकेच्या वळचणीस अन् भीमथडीचे वळते पाणी

विटीदांडू अन् श्लोक मनाचे
चिंचा बोरे, अन् पाढ्यांचे
बालपणीचे दिवस मजेचे
खट्टया-मिठ्या आठवणींचे
संध्याकाळी तुळशीपाशी दिवा लावते चित्त अजुनी
अमेरिकेच्या वळचणीस अन् भीमथडीचे वळते पाणी

स्वप्ने घेऊन आलो येथे
रमलो येथे, रुजलो येथे
घाम गाळला, हसलो-रडलो
उभारली नव-दुनिया येथे
शिक्षण आणि संस्कारांची सदा शिदोरी हाती धरूनी
अमेरिकेच्या वळचणीस अन् भीमथडीचे वळते पाणी

कर्मभूमीचे ऋण खरोखर
दिधली संधी, डोई छप्पर
नवीन क्षितिजे वेधुनिया मग
कवेत आले अवघे अंबर
तारांकित पटलाच्या संगे तिरंग्यासही वंदन करूनी
अमेरिकेच्या वळचणीस अन् भीमथडीचे वळते पाणी

**अनिता कांत - सॅन रमोन, कॅलिफोर्निया**

## भ्रमन्ति

प्रत्येकाच्या मनी ठाकला प्रश्नांचा हा गुंता
कुठला मी अन् इथे कशाला अर्थ न याचा कळता

चालत जातो एकच मार्गी कुठे कधी ना वळता
पुन्हा पुन्हा मी तिथेच असतो जगात फिरता फिरता

ऋतू बदलतो काळ सरकतो कुणास नाही चुकता
तारुण्य ते वार्धक्य हा प्रवास इथला करता

या जन्मातुन पुढल्या जन्मी फिरतो न अडखळता
अखेर मलाच स्तब्ध पहातो विश्व हे भवति फिरता

प्रत्येकाच्या मनी ठाकला, प्रश्नांचा हा गुंता
कुठला मी अन् इथे कशाला, अर्थ न याचा कळता

**संदीप दीक्षित - क्लिव्हलंड, ओहायो**



## रेक्यविक



रेक्यविक ह्या आईसलंडच्या राजधानीचं नाव गेली ८-१० वर्ष कानावर येत होतं. विचित्र स्पेलिंग आणि उच्चार यामुळे या शहराबद्दल कुतुहल वाटायचं. तिथल्या हिवाळ्यातल्या नॉर्दर्न लाईट्सबद्दल आणि उन्हाळी प्रेक्षणीय स्थळांबद्दल कळल्यावर ते कुतुहल आणखी वाढलं होतं. जून-जुलै २०२३ मध्ये घेतलेल्या उत्तर युरोपच्या एका क्रूझमध्ये हे शेवटचं ठिकाण होतं. त्या दिवशी आम्ही रात्रीदेखील क्रूझशिपवर राहून शिवाय आणखी दोन दिवस रेक्यविकमध्ये हॉटेलमध्ये राहिलो.

रेक्यविक मधल्या पहिल्या दिवशी ते शहर फिरून बघायचं ठरवलं. एखादे शहर बघायचं असेल तर आम्ही बहुतेक वेळा तिथली हॉप ऑन हॉप ऑफ बस टूर घेतो. पण इथली हॉप ऑन हॉप ऑफ बस प्रत्येक थांब्यावर दर ४५ मिनिटांनी येते असं त्यांच्याच वेबसाईटवर वाचल्यामुळे आमचे आम्हीच फिरायचं ठरवलं. बस टूरच्या दोन तिकिटांच्या किंमतीत ३-४ वेळा टॅक्सी करता येत होती.

सर्वात आधी आम्ही क्रूझच्या बंदरापासून जवळच्या पर्लान म्युझिअमला गेलो. तिथे आईसलंडचा समग्र इतिहास, भूरचना, वनस्पती, प्राणी, पक्षी, जलचर या सर्वां संबंधित अतिशय तपशीलवार माहितीपूर्ण प्रदर्शनं पाहिली. आईसलंडमध्ये माणसांच्याही आधीपासून मेंढ्या होत्या. त्यामुळे इथले लोक इथल्या जमिनीवर मेंढ्यांचा हक्क आधी आहे असं मानतात. मोटर अपघातात एखादी मेंढी मारली गेली किंवा जखमी झाली तर तिच्या मालकाला भरमसाठ मोबदला द्यावा लागतो म्हणे.

आईसलंडची लोकसंख्या अतिशय कमी (पावणेचार लाख) आहे. रेक्यविकची सर्वात जास्त म्हणजे सव्वा ते दीड लाख आहे. आम्ही रेक्यविकहून नंतर घेतलेल्या एका टूरच्या गाईडने विनोद केला होता की आईसलंडमध्ये दरडोई सर्वात जास्त नोबेल प्राईझ विजेते

आहेत. खरंतर आईसलंडमध्ये एकच नोबेल प्राईझ विजेता आहे, पण लोकसंख्या कमी असल्यामुळे इतर देशांपेक्षा दरडोई जास्त! लोकसंख्या कमी असल्याने बरेच जण एकमेकांचे नातेवाईक असू शकतात. तिथल्या लोकांची आडनावं 'अमक्याचा मुलगा', 'तमक्याची मुलगी' अशी आहेत व सर्व जनतेचा एक डेटाबेस केला आहे. डेटिंग करायच्या आधी म्हणे ते ह्या डेटाबेसमध्ये शोधतात की आपण डेट करणार ती व्यक्ती आपली नातेवाईक तर नाही ना.



पर्लान म्युझिअमच्या घुमटाकार थिएटरमध्ये नॉर्दर्न लाईट्सबद्दलचा शो आणि ज्वालामुखी, भूकंपांबद्दलचा शो पाहिला. म्युझिअममध्ये एक बर्फाची सुंदर गुहा केलेली आहे, त्यात एक बर्फाची खुर्ची देखील आहे. म्युझिअमच्या सर्वात वरच्या मजल्यावरच्या निरीक्षण कक्षातून रेक्यविक शहराचं ३६० अंशांमध्ये समग्र दर्शन घडलं. म्युझिअममधल्या फिरत्या कॅफेमध्ये बसून खाताना देखील रेक्यविक शहराचं चौफेर दर्शन घडतं.

पर्लान म्युझिअमहून आम्ही हॉल्ग्रिम्स्किर्क्यं नावाच्या चर्चला गेलो. अतिशय सुंदर आणि अनोखी वास्तू आहे. आतून सुध्दा छान आहे. चर्चच्या मनोऱ्याच्या वर जाता येतं पण तिथून शहराचं मर्यादितच दर्शन घडतं हे कळल्यावर आम्ही तिथे गेलो नाही. चर्चच्या आवारात एरिकसन नावाच्या धाडसी खलाशाचा पुतळा आहे. दहाव्या शतकात म्हणजे क्रिस्टोफर कोलंबसच्या अर्धसहस्रक आधी तो नॉर्थ अमेरिकेला (बहुदा न्यू फाउंडलंडच्या आसपास) पोहोचला होता. खरंतर युरोपहून नॉर्थ अमेरिकेला जाणारा तोच पहिला प्रवासी असावा. त्याचा हा पुतळा अमेरिकेने १९३० साली, आईसलंडच्या लोकशाहीच्या हजाराव्या वर्षानिमित्त भेट म्हणून दिला आहे.

आम्ही नुकताच नेटफ्लिक्सवर 'हार्ट ऑफ स्टोन' हा अमेरिकन चित्रपट पाहिला ज्यात आलिया भट देखील आहे. त्या चित्रपटाच्या शेवटच्या भागात आईसलंड आणि रेक्यविक आहे. त्यात हे चर्च आणि पर्लानच्या निरीक्षण कक्षातून आम्ही पाहिलेला रेक्यविक शहराचा भाग दिसतो.

चर्चकडून आम्ही शोधत शोधत, चालत चालत, चालण्याच्या अंतरावर असलेल्या लॉगाव्हेगर रस्त्यावर गेलो. हा रेक्यविकमधील दुकानांचा आणि रेस्टरॉंट्स, कॅफेज् असलेला मुख्य रस्ता. इथे आम्ही स्मरणवस्तूंची थोडी खरेदी केली. इथे आणखी थोडा वेळ रमतगमत फिरायला आवडलं असतं, पण (उन्हाळ्याची सुरुवात असूनही) तपमान वसंत ऋतूतल्यासारखं होतं आणि कमालीचा वारा होता आणि त्यामुळे जास्तच थंड वाटत होतं. आम्ही सकाळी क्रूझशिपवरून बाहेर आलो तेव्हा तर म्हणे एक वृध्द स्त्री सोसाट्याच्या वाऱ्यामुळे ढकलली गेली आणि (जमिनीवरच) खाली पडली. म्हणून थंडी-वाऱ्यात अधिक न फिरता आम्ही क्रूझशिपवर परतलो.

रेक्यविकहून इतर दोन दिवशी घेतलेल्या टूर्समध्ये जाता-येताना शहराचे इतरही काही भाग म्हणजे सिटी हॉल, कॉन्सर्ट हॉल, मुख्य बस स्टेशन, क्रिन्ग्लन मॉल, हॉफ्डी हाऊस इ. दिसले. १९८६ मध्ये ह्या हॉफ्डी हाऊसमध्येच अमेरिकन राष्ट्राध्यक्ष रेगन आणि रशियन राष्ट्राध्यक्ष गोर्बाचेव्ह शीतयुध्दाच्या समाप्तीची बोलणी करण्यासाठी भेटले होते. अमेरिकेशी वितुष्ट आल्यावर विख्यात बुध्दीबळ ग्रँडमास्टर बॉबी फिशर त्याच्या शेवटच्या वर्षांत रेक्यविकजवळच राहत होता. नंतरच्या एका टूरमध्ये आम्ही बॉबी फिशर सेंटर म्हणजे त्याच्याबद्दलच्या म्युझिअमवरून गेलो होतो.

जमल्यास नॉर्दर्न लाईट्स बघण्यासाठी परत रेक्यविकमध्ये यायची इच्छा बाळगूनच आम्ही या आकर्षक शहराचा निरोप घेतला.

**नीता नाबर - एंगलवूड, न्यू जर्सी**

**राशिभविष्य : नोव्हेंबर, डिसेंबर २०२३**

**दादा दामले (न्यू जर्सी)**

https://bmmonline.org/rashi-bhavishya/

## इतिहास असा घडायला हवाय

इतिहास असा घडायला हवाय... एखादं झाड बहरावं, तसं बहरत जाणं... त्यात अनंत वेदनांना प्राशूनही तटस्थपणे आपल्याच उगमाकडे आणि शेवटाकडे पाहत राहणं... एखाद्या जैविक घटनेला सायंटिफिक कारणंही पुरेशी असतात पण सायन्सच्या पल्याडचं जग भलतंच अवघड असतं. कारण त्यात ना लॉजिक असतं ना परिमाण. त्यात असतो फक्त ओघवतेपणा.

इतिहास साक्षीला आहे. सगळीच युद्धे फक्त शस्त्रांच्या जोरावर नाही खेळली गेली. तर त्यात होता प्रचंड आशावाद, असंख्य मानवी मनांची गुंतवणूक आणि जिंकण्याची इर्षा. हिटलर हे त्याचेच मूर्तिमंत उदाहरण. दुसऱ्या विश्वयुद्धाला कारणीभूत ठरलेला एक प्रकारचा मानवी बॉम्ब. 'यहुद्यां' विषयीचा कट्टर द्वेष हा त्याच्या ओजस्वी भाषणात आग ओकत राहिला. नाझी दलाची स्थापना हा त्याचाच परिपाक. हिटलरकडे भाषणाची असीम कला असूनही त्याचा उपयोग विध्वंसासाठी झाला. “खोट्या गोष्टी इतक्या वेळेला सांगत राहा की, खोट्याचं रुपांतर सत्यात होईल.” साठ लाख निष्पाप यहुद्यांचे त्याने द्वेषापायी, फक्त आणि फक्त द्वेषापायी हकनाक बळी घेतले. आत्मदहनाच्या वाटेवर निघालेल्या माणसांची ही जमात. यात डोळ्यांसमोर दिसत राहते, आपल्याच माणसांची झालेली राख. त्या राखेत नसते कुठलीही जमात. मिसळलेला असतो फक्त प्रचंड आक्रोश अनादी काळाचा. कुठल्या धर्माच्या पुस्तकात लिहिलंय एकमेकांची डोकी फोडा म्हणून? कुठल्या मंदिरातल्या देवाला लागतो रक्ताचा अभिषेक?

ज्ञानेश्वरांचा ‘हे विश्वची माझे घर' हा विचार फोल ठरतो. खोल दरीतून कडेलोट व्हावा इतकं मूल्यांचं अध:पतन होताना आपण स्वत:ला माणूस म्हणवून घेतो का? या युगानुयुगांच्या लढाईत मायेच्या विसाव्यासाठी आतुर होऊन, बापाची कूस वळवण्यासाठी आसुसलेलं बालक रडत राहतं.

चंद्र तारे मावळतात उषःकाल होण्यासाठी... तरीही त्यांची धडपड नगण्य होते. कारण सूर्याला नमस्कार केला जातो आणि चंद्राला मामा बनवले जाते ! परंपरेच्या वाटा जपताना चौकटीच्या काचा रुततात खोलवर आणि जखमा होतात कधीही न भरून निघणाऱ्या....

स्वप्नं! स्वप्नं ही अशीच उनाड मुलांसारखी धावत असतात. त्यांना नसतात बंधने... नसते संपण्याची भीती... फक्त ती झुरत राहतात. घडायला हवा इतिहास असाच - 'न भूतो न भविष्यति' झोपाळ्यावर हिंदोळे घेत, तोल सावरत, रंगीबेरंगी फुले हातात घेऊन सुगंधाच्या प्रवासाकडे! त्या निष्पाप, मंगल श्वास भर सुगंधासाठी धडपडणारा, माणूसपण जपणारा इतिहास असा घडायला हवाय.

**पल्लवी शिंदे माने - डेनव्हर, कोलोरॅडो**

## मनाला बेचैन करणारा एक शब्द

बहुतेक वेळा हा शब्द प्रथमपुरुषी एकवचनी असा बोलण्यात किंवा लिखाणात येतो. त्या शब्दाचा अर्थ आणि जाणीव अगदी लहानपणी बोलता यायला लागले की येते आणि त्याचा सर्रास वापर तेंव्हापासून अखेरचा श्वास घेईपर्यंत होत असतो. चांगली गोष्ट घडली आणि त्याच्याशी अगदी पुसटसा संबंध जरी असला तरी त्याच श्रेय घेण्याकरता आपण तो वापरतो. हेतुपुरस्सर किंवा अजाणता. एखादी गोष्ट चुकली, चांगली झाली नाही किंवा अपघातानं झाली तरीही आपण त्या शब्दाचा वापर ती जबाबदारी टाळण्याकरता करतो.

पुष्कळदा त्या शब्दाचा वापर अगदी बुद्धिपुरसर स्वतःची किंचित आत्मप्रौढी व्यक्त करण्यात होतो. त्याची काही उदाहरणे :

- प्रसिद्ध व्यक्तीची भेट कांही क्षणाकरता झाली तरीही
- व्यवसायाव्यतिरिक्त दुसऱ्या देशात किंवा शहरात राहणे किंवा भेट
- मातृभाषेव्यतिरिक्त दुसऱ्या भाषेत थोडेसे प्राविण्य मिळाल्यावर
- व्यवसायाव्यतिरिक्त एखादा/दुसरा मार्ग निवडल्यावर
- चाकोरीबाहेर, वेगळा किंवा अगदी सामान्य अनुभव आल्यावर

ही यादी तशी खूप लांब होईल. पण माझ्या सांगण्याचा रोख आपल्या लक्षात आला असेल अशी आशा आहे.

चूक झाल्यावर ती माझ्याकडून घडली हे प्रांजळपणे कबुल करण्याला, जरूर ती परिपक्वता यायला वयाची बरीच वर्ष निघून जातात. त्यात प्रांजळपणा असलाच तरी तो अगदी कमीच. बहुदा आत्मप्रौढीच वाटते किंवा तसा भास तरी होतोच.

बा. भ. बोरकरांची एक प्रसिद्ध कविता एका कविसंमेलनात त्यांनी आपल्या अनुनासिक पण सुरेल स्वरात गायली. ती कविता: "जीवन त्यांना कळले हो". त्यातली महत्वाची ओळ: "मीपण माझे पक्व फळापरी गळुनी त्यांचे गेले हो". तेंव्हापासून मनात रुतून

बसलेला आणि बेचैन करणारा शब्द माझा पिच्छा सोडत नाही.तो शब्द: "मी"/"मीपण".

मानसशात्राचा अभ्यास मी कधीच केला नाही. पण थोडीशी पुसट कल्पना मात्र मला आहे असे वाटते. वाचनात आलेली माहिती, ऐकलेली भाषणे/चर्चा, काही विचारवंताचे प्रगट झालेले विचार हे मात्र मी काळजीपूर्वक मनात साठवत गेलो. त्यातले एक भाषण मी कधीच विसरू शकत नाही. जवळ जवळ ३०/३२ वर्षांपूर्वी स्वामी चिन्मयानंद ह्यांचं व्याख्यान संपल्यावर एका श्रोत्याने त्यांना प्रश्न केला की "माणूस आपलं "मीपण" विसरू शकतो का?" त्यांचं उत्तर: "कधीच नाही". त्यावेळेपासून माझं विचारचक्र सुरु झालं आणि ते अजून चालूच आहे.

काहीवेळा आपल्या किंवा लोकांच्या बोलण्यात आत्मप्रौढी येणार हे समजून सुद्धा त्याबद्दल आपण अगतिक असतो. अर्थात आपण ते स्वतः टाळतो का? हा विचार जास्तच बेचैन करणारा असतो.

अध्यात्माचा अभ्यास आणि त्यावर विचार केलेल्या व्यक्तींमध्ये हा "मीपणा" खूप कमी असावा अशी माझी समजूत होती. पण संपर्कात आलेल्या बहुतेक व्यक्तींची बोलताना सुरवात "मी अध्यात्माचा खूप अभ्यास केला आहे आणि त्या आधारे---" वगैरे सांगायला ते विसरत नाहीत. प्रमाण कमी/जास्त एवढेच. बहुतांशी अध्यात्माचा आणि त्या विषयांचा सुतराम संबंध सुद्धा नसतो.

तरीसुद्धा मी आशावादी आहे आणि त्याच कारण बघितलेली खूप मोठी माणसं. त्यांच्या क्षेत्रात- उद्योग, साहित्य, संगीत, वक्तृत्व, शिक्षण, इतर कला अशा अनेक क्षेत्रात दीर्घ काळ काम करूनसुद्धा प्रसिद्ध झालेल्या व्यक्ती स्वतःबद्दल फारस बोलत नाहीत. इतकंच काय पण "मी" हे मिळवलं असा भाव त्यांच्या बोलण्यात कधीच नसतो. "मंझिल तो अभी बहोत दूर है " अशी त्यांची वागणूक असते. जाहीरपणे आणि अगदी खासगीत सुद्धा. मग विचार येतो की नाटककार/लेखक विजय तेंडुलकर ह्यांच्या एका पुस्तकाच्या शीर्षकाप्रमाणे चालत असलेला शोध: "हे सर्व येते कोठून?" लहानपणी आई-वडील, शाळा, समाज, गावातल वातावरण ह्यांचा आपल्या वृत्तीवर खूप परिणाम होत असावा. त्यामुळे "मीपण" आणि "नम्रता" ह्या दोन्ही भावना वेगवेगळ्या पातळीवर बदलत जात असाव्यात. पुढे व्यवसाय, सहकारी, राजकीय आणि सांस्कृतिक जीवन ह्या सगळ्यांचा कळत नकळत परिणाम होत असणारच.

एक गोष्ट लक्षात आली की बहुतेक व्यक्तींचं वागणं मोठेपण आल्यावरसुद्धा फारसं बदलत नाही. वय वाढतं तरीही बहुतांशी लोकांच्या अंगवळणी पडलेल्या सवयी सुटत नाहीत. ह्या पार्श्वभूमीवर विचार करताना मला एका प्रश्न भेडसावतो. तो असा की हा "मीपणा" माझ्या बोलण्या/वागण्यात कितपत येतो? मी स्वतःच ते ठरवू शकत नाही, प्रयत्न मात्र करतो आणि काही अंशी तो यशस्वी झाला असं वाटतं. पण त्याबद्दलचं मत माझं बोलणं ऐकणाऱ्या किंवा संपर्कात आलेल्या व्यक्तींनी प्रांजळपणे द्यावे, असं वाटतं. त्या व्यक्तीची मी वाट बघतो आहे.

**आनंद बर्वे - चेवी चेस, मेरीलँड**

## एक दिवा प्रत्येकाला

एक दिवाळी अशी करूया
जिथे उजेडा अंत नसे
काळोखाचा जिथे सापळा
तिथे घुसाया भय नसे

कित्येकांच्या झोपडीतला
दिवा जळूदे सारी रात
भिजलेल्या भिंतीतून येवो
प्रकाश शाश्वत होऊन आत

दिव्याखालच्या माय लेकरा
अभय कवच दे क्षेमाचे
डोळ्यातील दाहक ज्वाळांनी
नष्ट होउदे मलिन मुखे

खिसे रिकामे कधी कुणाचे
कधी आर्ताश्रयाची हाक
आशेचा नवदीप उजळुदे
प्रकाशमान होउदे वात

पणती पणती निर्धनपाशी
नेऊन देऊ आज घरात
द्विगुणित आनंदाचे क्षण क्षण
वाटून दे रे प्रत्येकात

**प्रिया गोडबोले - एडिसन, न्यू जर्सी**

## आठवणींचे मोती

आठवणींचे मोती एकदा ओघळू लागले की त्यांच्या सरी कशा बरसत राहतात, आपण त्यात चिंब भिजून जातो..!

आमच्या दोन्हीहि आजी-आजोबांची आल्या-गेल्याचे मनापासून स्वागत करायला सतत घराची दारे आणि मनाची कवाडे उघडी असायची. जसे समजायला लागले तसे आठवते, एस. टी. च्या नोकरीमुळे पप्पांची बदली महाराष्ट्रात कुठेही असली तरी शाळेची प्रत्येक सुट्टी ही नाशिकला आणि अकोल्याला दोन्ही आजी आजोबांसोबत जायची. दोन्ही ठिकाणे वेगळी; एक शहर, तर दुसरे छोटे गाव. (अकोला पूर्वी नगर जिल्ह्यातील संगमनेर तालुक्यात होते, आता तालुका आहे.) पण निर्भेळ प्रेम आणि जिव्हाळा दोन्हीकडेही सारखेच. आम्ही दोघे बहीण-भाऊ उन्हाळ्यातील सुट्टीची आतुरतेने वाट बघायचो. केव्हां एकदा शाळा संपते आणि आम्ही एस. टी. बसने एकमेकांच्या संगतीने नाशिकला जातो, असे व्हायचे. आजी-आजोबा, मावशी-काका (त्यांना दादा म्हणायचो), मावस भावंडे आमची वाटच बघत असायची. मग सुरू व्हायचा सुट्टीतील धांगडधिंगा, धमाल मज्जा आणि गमती जमती..!

तेव्हाचे नाशिक खूप वेगळे होते. गोळे कॉलनीतील आजोबांचा बंगला खूप छान, प्रशस्त होता. आजोबा रिटायर्ड मामलेदार, त्यांना नाशिक मध्ये मान होता. त्यांचे व्यक्तिमत्व अत्यंत प्रसन्न होते. दादांची बदली पण नंतर नाशिकला झाली आणि मावशी देखील आजोबांच्या बंगल्यात वरच्या मजल्यावर रहायला लागली. दिवसाची सुरुवात खूप छान, प्रसन्न व्हायची. बाहेर अंगणात प्राजक्ताचा सडा पडलेला असायचा. जाई-जुई, मोगरा-चांदणी, अबोली-कुंदाच्या फुलांची रेलचेल असायची. त्यांचा मंद सुवास आसमंतात दरवळत असायचा. आजोबांना देवपूजेसाठी फुले तोडून, पूजेची तयारी करून द्यायची, दारात आणि देवासमोर रोज रांगोळी काढायची; हि महत्वाची कामे असायची. ती मनापासून केली कि आजी-आजोबा दोघांकडूनही शाबासकी मिळायची! आजोबांच्या चेहऱ्यावर पूजा करताना कायमच एक वेगळे तेज भासायचे. मोठ्या शिसवी देव्हाऱ्यातील सर्व देव आधी दुधाने, मग पाण्याने छानशी अंघोळ करून नंतर कोरडे होऊन त्यांच्या ठरलेल्या जागी विराजमान व्हायचे. मग गंध-पुष्प वाहिल्यानंतर छानशी आरती, हा रोजचा एक सोहळाच असायचा. छोट्याशा चांदीच्या वाटीतील दूध-साखरेच्या नैवेद्याचा गोडवा अधिकच जाणवायचा. ते वाट्याला यावे म्हणून मी पूजा होईस्तोवर तेथून हलायचे देखील नाही..

आजीला घरकामात थोडी मदत करून खेळायला सुटायचे ते जेवणाच्या वेळेपर्यंत. कधी पुस्तकांचे वाचन - वेड लागल्याप्रमाणे ५००-६०० पानी कादंबऱ्यांचा फडशा १-२ दिवसात पडायचा; कधी मामे-मावस भावंडांबरोबर वेगवेगळे खेळ - कॅरम, विटीदांडू, आबाधोबी, क्रिकेट तर कधी आजोबांबरोबर रमी, एकट्याचा डाव. कधी मावस बहिणींच्या मैत्रिणींबरोबर भातुकली. दुपारी सर्वांबरोबर मांडलेला पत्त्यांचा डाव - 'Not at home', बदाम सात, लॅडीज.. कधीच न संपावा वाटणारा.. चहा बरोबर कधी भेळ-भत्ता, कधी सर्कल सिनेमा समोरील बेकरीतले पॅटिस. कधी भाड्याने २-३ तास सायकल घेऊन सायकल चालवायला शिकायचं. संध्याकाळी जॅक्सन गार्डन किंवा नेहरू गार्डन येथे मोठ्यांपैकी कोणीतरी आम्हाला घेऊन जायचे. तेथे मनसोक्त खारे शेंगदाणे, तिखट मीठ घातलेली काकडी, भेळ, आणि नंतर माझदाचे मस्त आइस्क्रीम. कधी कधी आइस्क्रीम पॉट आणून घरी देखील आइस्क्रीम बनवायचो, त्याची मजाही औरच असायची. कधी बाल-नाटके बघायला जायचो, तर कधी सर्वांनी मिळून लिहिलेले आणि बसवलेले नाटक, घरीच करायचो. धान्याच्या मोठ्या पिंपावर चढून कोणीतरी दोघेजण लिंबू-टिंबू (बऱ्याचदा छोटी मावसबहीण आणि अस्मादिक..) आजीची साडी पडदा म्हणून लावून धरत, नाटकाची - त्यातील पात्रांची नावे घोषित केली की पडदा बाजूला होऊन नाटकाला सुरवात होई. एकदा तर उत्साहाच्या भरात मावस बहीण खाली पडली ती थेट खाली ठेवलेल्या परातीवर.. तिला कपाळावर खोक पडली होती, तिच्या पडण्याबरोबरच आमच्या नाटकाचाही कपाळमोक्ष झालेला आठवतो. ती मात्र त्या प्रसंगाची खूण अजून भुवईच्या वर बाळगून आहे. आमचे सर्वांचे नशीब बलवत्तर म्हणून तिच्या डोळ्यास काही झाले नाही. भावंडासोबत भांडणे व्हायची ती तेवढ्यापुरतीच. मग लगेच आम्ही सर्वजण एक तह-करारनामा करायचो आणि तो जमिनीत खड्डा करून त्यात पुरायचो. पुढे कधी भांडणे झालीच तर त्या तहातल्या अटींनुसार ती लगेच मिटायचीही. माझ्या मोठ्या भावाने सुट्टीत घरी प्रोजेक्टर बनवला होता. खिडक्यांना आणि दारांना चादरी लावून संपूर्ण खोलीत अंधार करून तो स्लाइड शो करायचा, इतके भारी वाटायचे.. तो पाहायला घरातली मोठी माणसंही बसायची. अगदी थिएटर मध्ये जाऊन सिनेमा बघितल्यासारखाच, किंबहुना त्याहीपेक्षा जास्त आनंद मिळायचा.

कधी दुपारी, मोठी माणसे झोपलेली असताना गुपचुपपणे त्यांना ताकास तूर लागू न देता; प्लँचेट करायचो. आमच्या मोठ्या मावस भावास चांगले करता यायचे, मी पण नंतर करायला लागले! पाटावर अक्षरे/अंक लिहून त्यावर मध्यभागी उपडे ठेवलेले फुलपात्र किंवा पेला; गेलेल्या प्रसिद्ध व्यक्तीच्या आत्म्यास आवाहन करून बोलावल्यावर ते फुलपात्र भराभर पाटावरील शब्दांवरून अगदी वेगात फिरून प्रश्नांची उत्तरे द्यायला लागल्यावर खरंच खात्री पटायची की आमची कोणाचीच बोटे तो ढकलत नाहीयेत! बोलावलेल्या सर्वांना अगदी आठवणीने परत जायला 'पुन्हा पुन्हा' सांगायचो. रात्री भीतीने डोक्यावरून मुद्दाम घेतलेले पांघरूण थोडेसे बाजूला करून किलकिल्या डोळ्यांनी बघायचो, कोणी दिसतंय का... मनात कायम भीती असायची. एका कधीतरी ऐकलेल्या त्या गोष्टीमुळे की एकदा प्लँचेट करताना कोणीतरी बोलावलेल्या आत्म्यांना परत जायला सांगायला विसरले. आणि.. ते सगळे रात्री त्यांना एका रांगेत बसलेले दिसले.. प्लॅन्चेट मधून मिळालेली उत्तरे पुढचे कित्येक वर्ष लक्षात राहिली आणि आयुष्यातल्या मुख्य घडामोडी, कधी कधी त्या उत्तरांप्रमाणेच खऱ्या ठरल्या. माझ्या करिअर संबंधी प्रश्नाला नेहमी "इंजिनियर" असेच उत्तर यायचे, पण मला "डॉक्टर" हे उत्तर अपेक्षित असायचे. मी जेव्हा इंजिनीरिंगला ऍडमिशन घेतली, तेव्हा आठवण आली - अरे, प्लँचेटचे उत्तर खरे ठरले की..

शाळेचा रिझल्ट लागला की तो घेऊन पप्पा येत. रिझल्ट नंतर दर वर्षी आजी-आजोबांकडून सर्व नातवंडांना बक्षीस मिळायचे. त्या बक्षिसाचे अप्रूप इतर कोणत्याही मिळालेल्या पारितोषिक पेक्षा खूप मोठे वाटायचे आणि पुढच्या वर्षी पुन्हा चांगला अभ्यास करायला उत्तेजनही मिळायचे. गंगेवरील वसंत व्याख्यानमालेला आजोबा आम्हाला घेऊन जायचे. अनेक मोठ्या व्यक्त्यांची भाषणे ऐकण्याची संधी तेथे लहानपणीच मिळाली. गंगेवरील चविष्ट भेळ किंवा पुरचुंडीतला "मकाजी-कोंडाजीचा नाशिक का बढिया चिवडा" खाणे ही पण एक पर्वणीच असायची.

आजी-आजोबा आम्हा सर्व नातवंडांना घेऊन संध्याकाळी दिवे लागणीच्या वेळेस शुभंकरोती, भीमरूपी, रामरक्षा, मनाचे श्लोक आमच्या सोबत म्हणायचे. लहानपणीचे ते संस्कार अजूनही कायम आहेत. पुढील आयुष्यात जीवनातील चढ-उतारांना सामोरे जाताना ह्या रोजच्या उपासनेने खूप बळ दिले. कधी आजीचा सुरकुतलेला हात डोक्यावरून फिरताना इतके छान वाटायचे, त्या मायेच्या स्पर्शाची सर तर कशालाच नाही.. तिच्या कुशीत झोपताना एक वेगळेच समाधान लाभायचे. आजीच्या बंगल्याच्या जवळच गजानन महाराजांचे छोटेसे देऊळ होते. तेथे आजीबरोबर जाणे व्हायचे. आजी नेहमी 'गजानन विजय' पोथी वाचायची, ती ऐकायची गोडी लागली. पुढे इंजिनिअरिंग कॉलेजला हॉस्टेलवर, घरापासून पहिल्यांदाच लांब राहायला जाताना आजीने तिची पोथी मला दिली आणि माझी गजानन महाराजांच्या पोथीची पारायणे तेथून सुरू झाली, ती आजतागायत चालू आहेत.. आजीने दिलेली तिची पोथी मी अजूनही जपून ठेवलेली आहे.



अकोल्याला आजी-नानांकडे आणखीनच वेगळी मजा असायची. आमच्या घरी विठ्ठल-रखुमाईचे देऊळ होते. पहाट व्हायची तीच आजोबांच्या सुरेल आवाजातील एकतारी वरील भजनाने व सकाळच्या काकड आरतीने. माझी आई संगीत विशारद होती, तिला आजी कौतुकाने भजने-भक्तिगीते देवासमोर म्हणायला सांगायची. नाना आणि काकांबरोबर रोज शेतात, प्रवरा नदीच्या घाटावर महादेवाच्या मंदिरात जायला, बुचाची फुले वेचायला खूप छान, प्रसन्न वाटायचे. झुंजू-मुंजु होणे हा प्रत्यक्ष अनुभवायचा वाक्प्रचार आहे. सकाळचा अरुणोदय, सकाळी शेतात जाणाऱ्या बैलांच्या घुंगुरमाळा - त्यांचा लयीतील खळ-खळ आवाज, सकाळी दारी येणारा वासुदेव यांनी पहाट व्हायची. कधी मस्तपैकी शेतातील कोवळा हरबरा, शेंगा, चिंचा, बोरे, पेरू, आवळे यांचा मेवा मिळायचा. आजीच्या हातची चुलीवरची भाकरी-पिठले, अंबाडीच्या भाजीची चव अजून आठवते. कधी बैलगाडीने अगस्ती ऋषींच्या आश्रमाला भेट द्यायला जायचो. बैलगाडीने प्रवास करण्यात एक वेगळीच मजा वाटायची..

अशी ही उन्हाळ्यातील सुट्टी..! दरवर्षी - 'किती लवकर संपली?' असेच वाटायचे. नवीन ऊर्जा आणि खूप छान आठवणी सोबत घेऊन पुढच्या सुट्टीची वाट बघत आम्ही मार्गस्थ व्हायचो. 'गेले ते

दिन गेले'... लहानपण मागे सरले. दोन्ही आजी-आजोबा,आई-पप्पा, मावशी-दादा - सगळेच काळाच्या पडद्याआड जाऊनही बरीच वर्षे उलटली.. पुढे अमेरिकेत सगळ्यांपासून खूप दूर, आयुष्याला वेगळेच वळण लागले. परंतु मागे वळून बघताना, जे आठवणींचे मोती अलगद सरीतून कधी कधी ओघळतात ना, त्यांना वेचून पुन्हा गुंफणे ही एक वेगळीच अनुभूती असते.

**शुभदा सावरगावकर - हिल्सबोरो, न्यू जर्सी**




BMM मराठी शाळा

Five-level "Marathi Language Learning" progressive curriculum, study guidelines and supporting materials.

The BMM-Bharti Vidyapeeth's joint certificates for "Marathi Bhasha" examinations after successful completion of each level and passing criteria.

For BMM Marathi Shala inquiries
Email : Shala@bmmonline.org
https://bmmshala.net/


## संसाराचा खेळ

दोन ग्रहांची दोन माणसे, कसा बसावा मेळ?
अजब हा संसाराचा खेळ, अजब हा संसाराचा खेळ

जीवनाच्या सारीपाटावर मांडला दोन जीवांचा खेळ
कधी तो जिंके, कधी ती वरचढ, समांतर या रेखांचा
होईल का कधी मेळ?

तरल हळवी ती सुकुमार, खुलवी लज्जेचा अलंकार
कर्तृत्वाचा शिरपेच मिरवितो, रांगडा गडी तो पिळदार

बाहुबली तो शक्तीशाली जरी, हवी मनोबलाची जोड
सुखदु:खातही हसते गाली, सहनशक्तीला नाही तिच्या हो तोड


शब्दावाचून उमजे सारे, आठवणींचा सोस तिला
बोलही गेले व्यर्थ सारे, विस्मरणाचा जणू शाप त्याला


देऊन स्व-स्वप्नांची आहुती, खंबीर उभी सदा पाठीशी
घरकुलच बनते विश्व तिचे, त्याची उंच भरारी जरी नभाशी

असेल त्याची साथ सदा तर पंख तिचेही भरतील उडाण
तनामनाचे होता समर्पण, सुखालाही येई उधाण

दोन मनांच्या जुळतील तारा, आदर विश्वासाने अढळ
अहंकाराला तर नकोच थारा, मग बसेल ना हो मेळ!
अजब हा संसाराचा खेळ.....

**शुभदा गतारे-कोरे - ऑस्टिन, टेक्सस**




Best Compliments
Avinash, Hema, Ruchi, Akash and Adarsh Rachmale
The N. Rachmale Foundation
Prosperity Through Service
SKY GROUP GRAND, LLC
REAL ESTATE GROUP
LAKESHORE GLOBAL
INFRASTRUCTURE CONTRACTORS
www.therachmalefoundation.org | www.Lgccorp.com


## हास्यचित्र - काही चांद्रीय विनोद




**चित्र: विनीता वेल्हाळ; कल्पना: गौतम पंगू**






" पतन्जलि योगसूत्रे आणि आधुनिक वैद्यकीय शास्त्र यांचा समन्वय साधणारे अभिनव प्रकाशन"

Amazon वर उपलब्ध.





• Insured Door Delivery: **FedEx | UPS | DHL** • Item selection: **call +91 84240 60760**

For more details regarding payment option: +91 98201 11741 (Dilip Lagu) | +91 95940 31181 (Dhiraj)

www.lagubandhu.in |

Yadnya

## *Lagu Bandhu Jewellers:*

## *A Legacy of Timeless Elegance & Beauty*

In the magical world of jewelry, where elegance and beauty are immortalized, we, Lagu Bandhu, emerge as a beacon of excellence. With a rich legacy spanning over eight decades, our founders, all proficient Gemologists, have perfected the art of crafting jewelry that tells your unique story. But our mastery isn't just mere words; among our many achievements, we also proudly pioneered the introduction of Japanese Mikimoto Pearls in India.



**Crafting Timeless Pieces:**
Creating a timeless piece of jewelry is an art, and at Lagu Bandhu, we understand that preserving and caring for these treasures is equally vital. Our masterful creations are not mere accessories; they become an integral part of your personal narrative. Each piece carries a unique story, reflecting the craftsmanship and passion that defines Lagu Bandhu.

**Expertise in Authentic Gemstones:**
Lagu Bandhu is celebrated as the master of jewels. Our unparalleled expertise in authentic gemstones ensures that you receive nothing but the finest. These precious gems, available at your convenience, aren't just ornaments; they are heirlooms that carry a legacy of trust and excellence.

**Preservation and Care:**
Proper care of the jewelry ensures it maintains its luster, creating a lasting impression, and LaguBandhu is here to guarantee just that. We believe in guiding you on how to care for your jewelry. The secret to preserving the allure of diamonds, emeralds, sapphires, rubies, and pearls lies in meticulous maintenance. With a gentle touch, using a mild soap solution or a damp cloth, you can ensure that your gemstones continue to shine. Whether it's the crystalline diamonds or the delicate pearls, our care practices enhance their natural beauty, allowing your jewelry to etch your story for years to come.

In a world where craftsmanship and care intertwine, Lagu Bandhu stands as a symbol of trust and artistry. Our timeless creations become cherished chapters of your journey, each piece narrating your unique story. We are not just jewelry craftsmen; we are your companions in preserving the radiance of your jewelry. Let your jewelry be more than just adornments; let them be symbols of your individual narrative, meticulously crafted and preserved by Lagu Bandhu, the custodians of timeless elegance and beauty.

## जीव वाचवणारा 'पट्टा'

'सुट्टीवर आलेल्या सैनिकाचा रस्ते अपघातात मृत्यू' अशी बातमी जेंव्हा वाचनात आली तेव्हा अत्यंत जड अंतःकरणाने मनात विचार आला की जिथं शत्रू राष्ट्राच्या गोळ्या सुद्धा माझ्या सैनिकाचा जीव घेऊ शकत नाहीत, त्याचा जीव रस्त्यातील एक अपघात घेतो. देशाच्या सीमेपेक्षा वाहतुकीच्या रहदारीचे रस्ते जास्त धोकादायक ठिकाणं बनली आहेत का? रस्ते सुरक्षित ठेवणे ही फक्त एकट्या प्रशासनाची जबाबदारी नसून रस्त्याचा वापर करणाऱ्या प्रत्येक नागरिकाची सुद्धा आहे. मानवी जीवन अनमोल आहे आणि ते क्षणभंगूर देखील आहे. प्रत्येकाला या वस्तुस्थितीची जाणीव असून देखील रोजच रस्ते अपघातात जीव गमावणाऱ्यांची संख्या मोठी आहे. असा एक दिवस जात नाही की वर्तमानपत्रात अपघाताची बातमी येत नाही. पण जेव्हा एखाद्या क्षेत्रात मोठे कर्तृत्व गाजवलेल्या व्यक्तीचा अपघातामुळे जीव जातो, तेव्हा प्रत्येक जण हळहळ व्यक्त करतो. तर अपघात झाला नसता या वाक्याने अपघाताची चर्चा थांबते तोच नवीन अपघात झाल्याची बातमी कानावर येते. यातील बहुतांश अपघात हे वाहतुकीचे नियम न पाळल्यामुळे झालेले असतात.

सप्टेंबर २०२२ मध्ये 'टाटा सन्स'चे माजी अध्यक्ष आणि भारतातील प्रसिद्ध उद्योगपती सायरस मिस्त्री यांचा झालेला अपघात अजूनही लक्षातून गेलेला नसेल. वाहतूक नियमांच्या अंलबजावणीची केलेली टाळाटाळ जीवावर कशी बेतू शकते याचे दुर्भाग्यपूर्ण असे हे सायरस मिस्त्रींचे उदाहरण आहे. ते अब्जावधी संपत्तीचे मालक होते, देशातील आघाडीच्या धनाढ्य व्यक्तींमध्ये त्यांची गणना होत असे. अपघातसमयी ते ज्या कारमधून प्रवास करीत होते ती कार जगभरात प्रसिद्ध असलेल्या मर्सेडिज कंपनीची महागडी कार होती. सामान्य माणसं ज्या गाड्या वापरतात त्या पेक्षा कितीतरी सुरक्षेच्या उपाययोजना त्या कारमध्ये होत्या. मग नेमकं असं काय घडलं की सायरस मिस्त्रींना आपला जीव गमवावा लागला ?

अपघातावेळी सायरस मिस्त्री व त्यांचे मित्र जहांगीर पंडोल हे कारच्या मागील सीटवर बसलेले होते. त्या दोघांनीही सीटबेल्ट लावलेला नव्हता. अपघातात मागील सीटवर बसलेल्या दोघांचाही मृत्यू झाला. अनाहिता पंडोल या कार चालवत होत्या आणि त्यांच्या शेजारी त्यांचे पती डेरियस पंडोल बसले होते. या दोघांनी मात्र सीट बेल्ट लावलेला होता. त्यांचा जीव वाचला. मर्सेडिज गाडी कंपनीच्या अहवालानुसार अपघात होण्याच्या आगोदर पाच सेकंद आधी कारचे ब्रेक दाबले गेले त्यावेळी कारचा वेग हा १०० किमी प्रती तास एवढा होता. ब्रेक दाबल्यानंतर तो वेग ८९ किमी प्रति तास एवढा कमी झाला होता. पालघर येथील सूर्या नदीवरील पुलावर यांची कार डाव्या बाजूने दुसऱ्या कारला ओव्हरटेक करत होती. याचवेळी चालकाचे नियंत्रण सुटून दुभाजकावर त्यांची कार जोरात आदळली. ही धडक इतकी जोरदार होती की कारचे इंजिन हे थेट चालक आणि त्याच्या शेजारी बसलेल्या व्यक्तीच्या पायापर्यंत आले होते. यावरून ही धडक किती जोरदार असेल याचा अंदाज येऊ शकतो. या भीषण अपघातात सायरस मिस्त्री यांच्या डोक्याला आणि पायाला गंभीर इजा झाली होती. यामुळे त्यांचा जागीच मृत्यू झाला.

वेगात असलेले एखादे वाहन जेव्हा धडक बसल्याने अचानक थांबते तेव्हा प्रवासी प्रचंड वेगाने पुढे फेकले जातात. हे टाळण्यासाठीच सीटबेल्टची रचना केलेली असते. मिस्त्री यांच्या अपघातात आरटीओ अधिकाऱ्यांनी दिलेल्या अहवालानुसार अपघात झाला त्याक्षणी एकूण चार एअर बॅग कार्यान्वित झाल्या होत्या. त्या चारही एअर बॅग समोरील बाजूच्या ड्रायव्हर सीट आणि को-ड्रायव्हर सीट यांच्या जवळच्या होत्या. चार पैकी एक ड्रायव्हरच्या डोक्यासमोरील, दुसरी पायासमोरील, तिसरी डोक्याच्या वरच्या बाजूची आणि चौथी उघडलेली एअर बॅग ही को-ड्रायव्हर सीटच्या समोर होती. समोरील दोघांनी सीट बेल्ट लावल्याने त्याठिकाणच्या एअर बॅग कार्यान्वित होऊन गंभीर इजा न झाल्याने दोघांचेही जीव वाचले. मागील बाजूस बसलेले मिस्त्री व त्यांचे सहकारी यांनी सीट बेल्ट न लावण्याने त्यांच्या जवळच्या एअर बॅग्स कार्यान्वित झाल्या नाहीत त्यामुळे डोक्याला व इतर अवयवांना गंभीर इजा झाल्याने त्यांना जीव गमवावा लागला.

एअर बॅग आणि सीटबेल्ट यांचे कनेक्शन : सुरक्षेच्या दृष्टीने एक महत्वाची गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, सीट बेल्ट आणि एअर बॅग एकत्रित काम करतात. सीटबेल्ट लावलेला नसला तरी एअर बॅग्स काम करतात. मात्र अपघातावेळी एअर बॅग उघडण्यापूर्वीच तुम्हाला इजा झाली तर एअर बॅगचा काहीही फायदा होत नाही. अनेक वाहनांमधील एअर बॅग्स वर SRS असे लिहलेलं असतं. याचा अर्थ होतो सप्लिमेंटरी रेस्ट्रेनिंग सिस्टीम. म्हणजेच एअर बॅग या तुमचे संरक्षण करण्याचे एकमेव साधन नाहीत. त्यामुळे तुम्हाला पूर्णपणे एअर बॅग वर अवलंबून राहून चालणार नाही. सीट बेल्ट लावलेला असेल तर डोकं समोर आदळण्याआधी एअर बॅग्स कार्यान्वित होतील. ज्यामुळे तुमचा जीव वाचू शकतो. बहुतांश वाहन चालक आणि

चालकाशेजारी बसणारे प्रवासी सीटबेल्ट लावतात. परंतु कारच्या मागच्या सीटवर बसून सीट बेल्ट वापरण्याचे प्रमाण नगण्य आहे. सायरस मिस्त्रींच्या अपघातावरून कारमधील प्रत्येकाने सीटबेल्ट वापरणे किती महत्वाचे आहे हे सर्वांनाच उमगले असेल. सीट बेल्ट हा खऱ्या अर्थाने जीव वाचवणारा 'पट्टा' आहे. चला तर मग सीट बेल्टचा वापर करूया,आपला प्रवास सुरक्षित बनवूया!

**डॉ. राजकुमार मोहनराव देशमुख - सोलापूर**

## श्री क्षेत्र आळंदी

महाराष्ट्राचे सुखनिधान - आळंदी येथील श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या संजीवन समाधीचे दर्शन घ्यायला या वेळेला पुण्यातून मुद्दाम श्री क्षेत्र आळंदी येथे गेलो. सर्वप्रथम लागते ती श्री हैबत बाबांची पायरी. ही गोष्ट नजरेत भरते की मंदिरात जाणारे सर्वप्रथम या पायरीचे दर्शन घेतात. याचे कारण या पायरीच्या मध्यभागी हैबत बाबा या भक्ताचा देह विसर्जित केला आहे. पंढरपूरला श्री विठोबाच्या देवळाच्या प्रवेशद्वारी जशी नामदेवांची पायरी आहे तशीच आळंदीला ही श्री गुरु हैबत बाबांची पायरी आहे.

श्री ज्ञानेश्वर माऊलींचे भक्त देवळात जाताना या पायरीला वंदन करतात. श्री हैबत बाबा अनेक वर्ष आळंदीच्या सिद्ध बेटातच अंत काळापर्यंत राहिले. बाबांनीच पादुका पालखीत घालून मिरवणुकीतून थाटात नेण्याची प्रथा सुरू केली. पालखीच्या मुक्कामाच्या ठिकाणी नैवेद्याची व्यवस्था त्यांनी केली. ही सर्व व्यवस्था आजतागायत चालू आहे. वारकरी संप्रदायात नित्य भजनात अभंग म्हणण्याचा जो क्रम आहे तो बाबांनी घालून दिला आहे. अंत काळ जवळ आल्यावर त्यांनी आपल्या मृत्यूनंतर आपला देह माऊलींच्या देवळाच्या पहिल्या पायरी खाली विसर्जित करावा अशी उत्कट इच्छा प्रकट केली. श्री हैबत बाबांनी आपला देह इसवी सन १८३६ मध्ये ठेवला. उणीपुरी १८७ वर्ष झाली. श्री हैबत बाबांच्या पायरीला वंदन करून आम्ही आत गेलो.




ऐहिक जीवनात आलेल्या अडचणी माऊलींच्या दर्शनाने दूर व्हायला लागतात कारण माऊलींची समाधी ही फार मोठे प्रचंड ऊर्जा स्थळ आहे. त्यावेळी श्रीरामांचे नवरात्र बसलेले होते. एका अधिकारी व्यक्तीने असे सांगितले होते की त्या काळामध्ये सर्व नवनाथ, श्री ज्ञानदेव यांच्या समाधीस्थळी असतात.

**श्री क्षेत्र आळंदी येथील सोन्याचा पिंपळ** - श्री क्षेत्र आळंदी येथे ज्या अनेक गोष्टी आहेत त्यामध्ये सोन्याचा पिंपळ हा महत्त्वाचा. योगायोग असा की फोटो काढला तेव्हा तो खरोखरच सोन्याचा पिंपळ दिसत होता. (उतरती उन्हे त्यावर पडली होती.) मंदिर प्रदक्षिणा करत असताना आपण महाद्वारापाशी येतो, तेथे सोन्याचा पिंपळ म्हणून जो प्रसिद्ध वृक्ष आहे तो लागतो. श्री ज्ञानदेव महाराजांच्या आईचे महापुण्य या झाडापाशी उदयाला आले आणि जगाला सोन्यासारखी मुले मिळाली. हजारो लोकांचा संसार सोन्याचा म्हणजे सुखाचा झाला. श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या माऊलीचे हे तपश्चर्या करण्याचे स्थान आहे. भक्ती भावाने नमस्कार केला.

**मुक्ताबाईंचे आळंदी येथील मंदिर** - आळंदी येथील श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या समाधीचे दर्शन घेतल्यावर तिला प्रदक्षिणा घालून, श्री गजाननाचे दर्शन घेऊन पुढे गेलो की मुक्ताबाईंचा मंडप लागतो. तेथे मुक्ताबाईचे देऊळ आहे. हा मंडप १८८१ मध्ये आळंदीचे साक्षात्कारी साधू श्री नरसिंह सरस्वती स्वामी महाराजांनी बांधलेला आहे. दरवर्षी नवरात्रात या मंदिरात सप्तशतीचा पाठ व इतर अनेक कार्यक्रम होतात. श्री नामदेव महाराजांचे गुरुजी विसोबा खेचर, ह्यांच्या त्या गुरु होत्या. मुक्ताबाई आणि सर्वच भावंडांची चरित्रे विलक्षण होती. मुक्ताबाईंचे देखील एकाग्र होऊन दर्शन घेतले.

श्री ज्ञानेश्वर महाराजांची समाधी - पालखी जेव्हा ज्येष्ठ वद्य अष्टमीला दुपारी चार वाजता पंढरपूरला जायला निघते, तेव्हा मंदिराचा कळस हलताना दिसतो, असे एका अध्यात्मातील थोर व्यक्तीने सांगितले. त्याने आणि अनेकांनी देवळाचा कळस हलताना पाहिला आहे.

**श्री ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधीचे दर्शन** - समाधीचे दर्शन घेतल्यावर प्रदक्षिणा केली जाते. पूर्व दिशेकडून प्रदक्षिणेला प्रारंभ होतो. दारातून गेल्यावर लगेचच एक हेमाडपंती पद्धतीने बांधलेला मंडप लागतो त्यात १६ खांब आहेत. या मंडपात श्री गणेशाची फार जुनी मूर्ती आहे. आळंदी येथील श्री ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधीच्या जवळील श्री गणेशाचेही दर्शन घेतले. आळंदी येथे



अनेक गोष्टी पाहण्यासारख्या आहेत. केव्हा तरी मुक्कामाला जायचे मनात आहे, कसे आणि केव्हा जमेल ते पाहू.

चला आळंदीला जाऊ | ज्ञानेश्वरा डोळा पाहू ||१||
होतील संतांचिया भेटी | सांगू सुखाचिया गोष्टी ||२||
ज्ञानेश्वर ज्ञानेश्वर| मुखी म्हणता चुकती फेर ||३||
जन्म नाही रे आणिका | तुका म्हणे माझी भाक||४||

**मिलिंद चिंधडे - नाशिक**

## भावनिक भेट

वैशाली रियाला घेऊन इंडियन स्टोअरला आली होती. तिने आज शांतपणे खरेदी करायची ठरवलेली होती. नेहमीप्रमाणे रियाची कुल्फीसाठी मागणी झाली. पैसे देण्यासाठी वैशाली काउंटरच्या दिशेने चालत होती आणि मध्येच थबकली, त्याबरोबर समोरचा माणूस पण थांबला. दोघांची नजरानजर झाली. एक अनोखा अवघडपणा आला दोघांच्यात. ते काही सेकंदाचे क्षण अगदी दीर्घ काळाचे वाटत होते. दोघांच्या तोंडून हॅलो बरोबर हलकेसे स्मित हास्य. त्या स्मितहास्या बरोबर आलेला अवघडलेपणा थोडा कमी झाला. वैशालीच म्हणाली, अरे तू इथे कसा काय? श्रीकांतला अचानक पणे टॅम्पाच्या ग्रोसरी स्टोअर मध्ये पाहून वैशाली दचकलीच होती. काय बोलावे, कुठून सुरु करावे हेच तिला उमगेना. श्रीकांत वैशालीचा खास मित्र होता. दोघांनी जीवनभर एकमेकांची साथ द्यायचे ठरवले होते. दोघेही अभ्यासात निपुण होते. त्यामुळे घरातल्यांनीही या मैत्रीला काही आक्षेप घेतला नव्हता आणि अचानक श्रीकांत गावी निघून गेला, काही न सांगता. त्याच्या अचानक जाण्याने वैशाली तर हबकूनच गेली होती. त्याच्या मोबाईलवर संपर्क होत नव्हता. आता याला शोधू की परीक्षेची तयारी करु?

वैशालीचे ग्रॅड्युएशन झाले आणि लगेच नोकरी पण लागली. वैशालीला वाटायचे सरळ श्रीकांतच्या गावी जावे आणि त्याला शोधून विचारावे काय झाले असे, असा एकदम सोडून कां गेलास? याच सुमारास वैशालीचे आईवडील तिच्या लग्नाचे बघत होते. ओळखीतून त्यांना संदिपच्या स्थळाविषयी कळले. संदिप USA ला शिकला आणि त्यानंतर तिथेच काही वर्ष नोकरी करून, स्वत:चा व्यवसाय सुरू केला होता. संदिपचा स्वभाव लाघवी, समोरच्याला मान देवून वागणारा. त्याचे व्यवस्याय कौशल्य, ज्ञान हे सगळे त्याच्या वागणुकीतून दिसून येत होते. संदिपच्या एक महिन्याच्या व्यास्तव्यात तो ४-५ वेळेला वैशालीच्या घरी आला होता. पुढच्या ६ महिन्यांच्या ओळखीने संदिपने वैशालीला मागणी घातली. वैशालीने श्रीकांतच्या मैत्रीबद्दल सांगितले. संदीपने मग सरळच विचारले की मग तुझे आता काय म्हणणे आहे. वैशालीचा मानसिक गोंधळ झाला होता. तिने श्रीकांतला त्याच्या गावी जाऊन भेटावे मग ठरवावे असे ठरवले. कॉलेज मधून श्रीकांतच्या घराचा पत्ता शोधून काढला; पण गावी जाताच विचाराअंती कळले की तो बाहेरगावी आईच्या उपचारासाठी गेला आहे. वैशाली त्याच पावली परत यायला निघाली. बस स्टॅंडवर तिला श्रीकांतचा मित्र विजय दिसला. तिने घाई घाईनेच विजयला विचारले की, अरे हा श्रीकांत आहे तरी कुठे? त्यावर विजय एवढेच म्हणाला की श्रीकांतच्या आईला हार्ट अटॅक आला म्हणून तो धावतच आला. आता दोघांना घेऊन तो उपचारांसाठी गेला आहे; पण, तो जायच्या वेळी मी बाहेरगावी होतो. मला कळले की सांगतो तुला. परत घरी आल्यावर दुसऱ्या दिवशी ती संदिपला भेटली, सगळे सांगून मन हलके केले. संदिपने वैशालीवर सगळे सोडले होते. नंतरचे दोन-तीन दिवस वैशाली स्वत:च्याच विचारात होती. तिच्या आई-वडीलांनी तर तिच्यावरच सगळे सोपवले होते.

विजयने महत्प्रयासाने श्रीकांतचे ठावठिकाण शोधले, त्याला सगळे सांगितले, त्यावर श्रीकांतला काहीच सुचेना, आई वडीलांची तब्येत सुधारण्यासाठी त्याला तिथे राहणे क्रमप्राप्त होते. परत नोकरी, राहीलेले शिक्षण पूर्ण करणे, बरेच काही, त्यासाठी त्याला वैशालीला या सगळ्यात ओढायचे नव्हते. विजयचा काही फोन आला नाही तेव्हा वैशालीनेच त्याला फोन केला, विजयवर फारच जबाबदारी आली होती, तो म्हणाला की श्रीकांत त्याच्या आईवडीलांच्या ईलाजासाठी एका योगधामात गेला आहे, त्याला तुला या सगळ्यात ओढायचे नाहीये. तो कधी येईल त्याचे त्यालाच माहिती नाहीये. वैशाली म्हणाली, निदान त्याचा नंबर तरी दे.

वैशालीच्या मनात विचारांचे द्वंद्व चालले होते, सरतेशेवटी तिने श्रीकांतला फोन लावला. फोनवर दोन्ही बाजूने अगदी भयाण शांतता झाली होती. मग श्रीकांतच तिला समजावण्याच्या सुरात म्हणाला, आई-वडील दोघांचिही तब्येत खुपच नाजुक झाली आहे तर मला ती पूर्णपणे बरी होई पर्यंत त्यांच्या जवळ असणे भाग आहे, तुझी स्वप्ने मला माहिती आहेत, आता माझे कधी काय होईल माहिती नाही तर निदान तुझी स्वप्न तरी पूर्ण झाली तर मला बरे वाटेल. यावर वैशाली

पूर्णपणे निरूत्तर झाली. अगदी विचाराअंती ती संदिपला लग्नाला हो म्हणाली. टॅम्पाला मुलगी रीया आणि संदिप बरोबर ७-८ वर्षे सुखाचा संसार करताना वर्षे कशी निघून गेली त्यांनाच कळले नाही.

आणि तो दिवस उजाडला, वैशालीला त्यानंतर नेहमीच वाटले की हा दिवस कधीच माझ्या आयुष्यात यायला नको होता. त्या दिवशी संदिप रात्री कार ने घरी येत असताना कोणीतरी उलट्या डिरेकशनने आले आणि वैशाली-रीया ला पोरके करुन गेले. या गोष्टीला २ वर्ष झाली. आता वैशाली थोडी सावरली होती. व्यवसाय पण सांभाळायला लागली होती. असे असताना एक दिवस अचानक इंडियन स्टोअरमध्ये श्रीकांत तिच्या पुढे आला होता. गेली १०-१२ वर्षांच्या मनाच्या कोपऱ्यातल्या आठवणी वर यायला लागल्या होत्या. सुरवात कशी, कुठपासून करावी हे कळत नव्हते. श्रीकांतला पण वैशाली अशी अचानक समोर येईल हे वाटले नव्हते. तो पण टॅम्पाला येणे आणि असा वैशाली समोर येणे हा एक योगायोग होता. त्याच्या मनात अनेक विचारांचे थैमान चालू होते. रियाला पाहून तो समजून चुकला की रीया वैशालीची मुलगी, म्हणजे आता वैशालीचे आयुष्य सगळे सेट आहे तर आता परत पूर्वीचे कशाला उगाळायचे? कारण त्याला जाणवत होते की वैशालीच्या त्या प्रश्नामागे असंख्य प्रश्न होते.. शेवटी मनाचा हिय्या करून श्रीकांत म्हणाला की मी माझ्या कंपनीच्या कामासाठी एक आठवड्यासाठी आलो आहे. सगळ्या आठवणी कंठात दाटून आल्या. तिने एक आवंढा गिळला. तो श्रीकांतच्या नजरेतून सुटला नाही. त्याला काही कळेना, काय झाले आहे नक्की. सगळे ठीक आहे ना वैशालीचे? आता कसे विचारू? वैशालीच म्हणाली की शेजारीच कॅफे आहे, कॉफी घेऊ तिथे. Billing झाल्यावर ते शेजारच्या कॅफे मध्ये गेले.

श्रीकांतने तशीच पूर्वीसारखी कॉफीची ऑर्डर दिली ते पाहून वैशाली दचकली आणि सुखावली पण. श्रीकांतच्या डोक्यात तोच प्रश्न, वैशाली काहीच का बोलली नाही.. श्रीकांतच्या चेहऱ्यावरचा गोंधळ पाहून वैशालीने अगदी श्रीकांतच्या घरी भेटायला गेल्यापासून ते आतापर्यंतचे सगळे सांगितले.

त्यावर श्रीकांत एवढेच म्हणाला की आई वडीलांना घेऊन मी त्यांच्या उपचारासाठी हरीद्वारला एका योग केंद्रात गेलो होतो. त्यांच्या काळजीतच होतो. त्यामुळे मला काहीच सुचत नव्हते. आई वडील दोघेही बरे झाले होते; पण त्यांना नंतर हरीद्वारलाच राहायचे होते. मग मी पण तिथे त्यांच्या बरोबर राहिलो. तिथेच एका औषधी कंपनीच्या मालकाची ओळख झाली. गेल्या काही वर्षातच त्याच्या आणि US च्या कंपनीचे tie-up झाले आणि आता वर्षातून एक आठवडा मी इथे येत असतो. टॅम्पाला पहिल्यांदाच येत आहे.

तोवर दोघांची कॉफी आली. दोघांना एक क्षणभर कॉलेजचे क्षण आठवले आणि परत अनामिक टेंशन आल्यासारखे वाटले. श्रीकांत आणि वैशाली ला अजून बरेच काही विचारायचे आहे. कुठून सुरू करायचे, याच विचारात दोघांची कॉफी पिऊन झाली. दोघांनी फोन नंबर शेअर केले. दोघांनीही कॉन्टॅक्ट नंबर नकळत नीट ठेवला. वैशाली म्हणाली की भेटू परत. आता निघू, मला बाहेर जायचे आहे. वैशालीला संध्याकाळी फंक्शनला जायचे होते पण तिला कुठेही जायची इच्छा होत नव्हती. शांतपणे सोफ्यावर बसून पर्समधल्या त्या कागदावर तिचे सारखे लक्ष जात होते. श्रीकांत पण हॉटेलवर गेल्यावर सून्न होऊन बसला होता. वैशालीला परत तसे एकटे सोडून जाण्याचे मन करत नव्हते. पण आता कसे करायचे? फोन करायला दहा वेळेला तरी फ़ोन कडे हात गेला होता. तसाच थबकला होता. दोघेही याच विचारात, की आता काय, आता पुढे काय ?

**उत्तरा भालेराव - टँपा, फ्लोरिडा**

## विश्वासघात... विश्वासघाताचा !!!

मिलिंद, चाळिशीला आलेला, काहीसा गंभीर आणि जणू अलिप्त असा मध्यमवयीन माणूस. पण मिलिंद सुरुवातीपासून असा नव्हता. हसतमुख, सगळ्यांच्यात मिसळणारा, गप्पा, गाणी, मजा मस्ती आवडणारा असाच होता. पण वर्षभरापूर्वीच मिलिंदने त्याची बायको अस्मिता आणि छोटं बाळ अपघातात गमावलं! याचा त्याच्या मनावर इतका जबरदस्त आघात झाला की मिलिंद त्याचे हसणेच विसरला. त्याने स्वतःला आपल्याच कोशात गुरफटून घेतलं.
सत्तरीला आलेल्या शालिनीबाईंनी आपल्या मुलाच्या काळजीपोटी, त्याने दुसरं लग्न करावं म्हणून खूप प्रयत्न केले, पण काही उपयोग झाला नाही. "मला होत नाही बाबा आता घरातलं सगळं करा सवरायला! त्यासाठी तरी बायको कर", गुढघ्यावर हात ठेवत, उठत शालिनीबाई लेकाला म्हणाल्या. "त्यासाठी बायको कशाला हवी? सर्व घरकाम करायला आपण बाई ठेवू", इति मिलिंद आणि त्याप्रमाणे त्याने एक बाई नेमलीपण.

पण फक्त शालिनीबाई म्हणजे मिलिंदची आईच नाही तर, जवळजवळ सगळेच नातेवाईक मिलिंदला पुन्हा लग्न करण्याचा सल्ला

देत होते. कोणी कोणी अडून अडून स्थळं सुचवत होते. प्रत्येकाचा त्याच्या मागचा हेतू जरी चांगला असला, तरी मिलिंदचं मन आता या सगळ्या गोष्टीतून पार उडून गेलं होतं. या सगळ्याचा परिणाम म्हणून की काय मिलिंद हल्ली नातेवाईकांकडे जाण्याचे टाळू लागला होता. इतरांची लग्नं, वाढदिवस असल्या ठिकाणी तर त्याने जाणं बंदच केलं होतं.

मिलिंद एका बँकेत मॅनेजर होता. तो ज्या शाखेत मॅनेजर होता ती शाखा शहरातील औद्योगिक भागात असल्याने, नेहमी वर्दळ असे. शाखेत नव्यानेच रुजू झालेल्या मधूशी, मिलिंदचं बरं जमू लागलं होतं. मित्र त्याला तिच्या नावाने चिडवतही होते पण हा त्याबाबतीत मात्र स्थितप्रज्ञ.

मधू! हिचा आगा पिछा कोणालाच काही फारसा माहीत नाही. साधारण पस्तिशीची ही बाई अगदी सौंदर्यवतीच जणू! पुरुषांच्या गप्पात तिचा उल्लेख नेहमी असायचा. सडपातळ बांधा, साधारण स्त्रियांपेक्षा किंचित जास्त उंची, चांगले लांबसडक केस, त्यांची वेणी केतकीच्या वनातल्या नागिणीसारखी तिच्या पाठीवर सळसळ करायची. मोहक डोळे आणि तीक्ष्ण भेदक नजर. मादक का काय म्हणतात, ते तसलं सौंदर्य तिला जन्मतःच मिळलेलं होतं.

मधु खरंच खूप सुंदर होती. पण त्याचे तोटे पण होते. एक तर पुरुष सहकारी फारच लगट करायचे आणि महिला सहकारी दुस्वास करायच्या. खरं तर मधु कुणाच्या अध्यात ना मध्यात. आपण बरं आणि आपलं काम बरं, असं तिचं वागणं होतं. बायका अंतर ठेवून वागायच्या आणि पुरुष चिकटायला यायचे. त्यात गळ्यात मंगळसूत्र नव्हतं. त्यामुळे एकटी स्त्री ज्या अनेक गोष्टींना सामोरी जाते त्यांना हिलाही जावं लागत होतं. पण बाई मात्र खमकी. कोणाच्या ताकास तूर लागू देत नव्हती.

हे सगळं होतं तरीही मधूच्या कामात मात्र काहीही चुका नसायच्या. कामाच्या बाबतीत चोख असल्याने अर्थातच मिलिंदच्या नजरेत तिची जागा जरा वरचीच होती. हल्ली हल्ली एकमेकांकडे बघून हसणं, गुड मोर्निंग वगैरे म्हणणं यातून एक गोष्ट दोघांच्याही लक्षात आलेली की ते दोघे एकमेकांना आवडू लागले होते. फक्त पुढाकार कोणी घ्यायचा? यावर घोडं अडलेलं.

आणि अचानक एक दिवस रवी धाडकन मिलिंदच्या केबिनमध्ये शिरला आणि जवळजवळ ओरडलाच, "मिल्या, मेल्या खल्लास तुझी प्रेमकहाणी!" मिलिंदला काहीच अर्थबोध झाला नाही. तरीही शांत राहत तो रवीला म्हणाला, "आता नको. बँक सुटल्यावर चहा पिताना सांग." 'हा कसा एवढा शांत राहू शकतो?' अशा अर्थाचा कटाक्ष टाकून रवी आपल्या जागेवर येऊन बसला.

संध्याकाळी चहा पिताना मिलिंद रवीला म्हणाला,"हं! आता सांग, काय म्हणत होतास दुपारी?" याच क्षणाची आतुरतेने वाट पाहणारा रवी जणू धरण फुटावं तसा फुटलाच. "च्यायला, मिल्या तुला सांगतो तुझं नशीबच वाईट साल्या. ही मधू तुला पटली आहे असं वाटत असतानाच, साला तिचा पास्ट कळला नं!" मिलिंद अजूनही शांतच होता. "नीट सांगणार आहेस का, काय ते?" मिलिंद म्हणाला. "अरे तेच तर सांगतोय, ऐक", रवीची कॉमेंटरी सुरू झाली. "तुझी डार्लिंग मधू, तिकडे लांब कुठेतरी बार्शीच्या आसपास कुठल्या तरी गावची आहे. हिच्या आईला एका जमीनदाराने 'ठेवली' आहे. म्हणजे ही बया 'ठेवलेल्या' बाईची पोरगी आहे. मग म्हणजे हीचा तरी काय भरवसा? उद्या कोणी अजून मालदार भेटला आणि गेली तर? म्हणून तुला सावध करतोय इतकंच." मिलिंद विचारात पडला आणि म्हणाला, "चल निघुया, उशीर झालाय."

रात्रभर मिलिंदला झोप नाही. शेवटी पहाटे त्याने स्वतःशी एक निर्णय घेतला आणि नेहमीप्रमाणे सगळं आवरून तो बँकेत आला. त्याने दुपारी जरा वर्दळ कमी आहे असे पाहून मधूला आपल्या केबिनमध्ये बोलावले. "मी आत येऊ का?", मधूचे मधूर स्वर कानावर येताच मिलिंद एक क्षण गोंधळला, पण एकच क्षण. "हो या ना", तो म्हणाला. "मधू, मी मुद्द्याचंच बोलतो. मला तुम्ही आवडता. तुम्हालाही मी आवडतो हे दिसतं तुमच्या नजरेत. माझी पत्नी व्हायला आवडेल का तुम्हाला?", मिलिंदने एका फटक्यात सगळं सांगून टाकलं. मधूने आधी शांतपणे त्याच्याकडे पाहिलं आणि म्हणाली, "माझा माग तुम्ही काढला असणारच. माझी एकूण पार्श्वभूमी ठाऊक असूनही तुम्ही मला लग्नाची मागणी घालताय याचा मला आनंदच आहे पण, आपण आधी काही दिवस असेच बिनलग्नाचे राहू. 'लिव्हइन' सारखे आणि मग खरंच आपल्याला वाटलं तर लग्न करू. चालेल?"

मिलिंदने अर्थातच होकार दिला आणि दुसऱ्याच दिवशी मधू मिलिंदच्या घरी राहायला गेली. शालिनीबाईंच्या सनातनी मनाला हे फारसे पटलं नाही, पण मुलाच्या सुखातच त्या सुखी होत्या. त्यामुळे त्यांनीही मिलिंद आणि मधूच्या या निर्णयाला मान्यता दिली. सोसायटीत, आजूबाजूला भजनी मंडळात होणाऱ्या कुजबुजीकडे शालिनीबाईंनी सोयीस्करपणे दुर्लक्ष केलं.

अनेकजण मिलिंदला सांगत होते, 'असल्या बायकांचा काही भरवसा नाही रे. कधी विश्वासघात करतील सांगता येत नाही.' तरी

मिलिंद आपल्या मतावर ठाम. का कोण जाणे पण मधू आपल्याला दगा देणार नाही असा त्याला मनोमन विश्वास वाटत होता. बरं आणि आता काय मिलिंद गद्धे पंचविशीत नव्हता. त्यानेही काही पावसाळे पाहिलेले होते व माणसं वाचायला तो शिकला होता.

आताशा दोन महिने झाले होते या गोष्टीला. मधूपण मिलिंदच्या घरात छान रुळली होती. एखाद्या गृहकृत्यदक्ष गृहिणी सारखी सगळी कामं तसंच नोकरी नीट सांभाळू लागली होती. आणि एक दिवस अचानक सकाळीच मधू घरातून गायब झाली. काहीही न सांगता सवरता. तिचा फोनही लागत नव्हता. शालिनीबाईं तर खूपच अस्वस्थ होत्या. "तरी मी म्हणत होते अशा मुलीसोबत संबंध नको. पण माझं ऐकशील तर ना?" त्या त्रासून म्हणाल्या. मिलिंदने कशीबशी त्यांची समजूत काढली आणि आवरून तो बँकेत गेला. पण सात आठ दिवस झाले तरी मधूचा काही पत्ता नाही म्हटल्यावर मात्र त्याच्याही मनात,"खरंच हिने फसवलंय का आपल्याला? दुसऱ्या कोणासोबत घरोबा केला की काय?" असले विचार येऊ लागले.

पण अचानक पंधरा दिवसांनी मधू परत आली. खूप थकलेली, दुःखी वाटत होती. शालिनी बाईंनी तिला घरात घेतलं. पाणी पिऊन झाल्यावर मधू सांगायला लागली, "गावाकडे आई मेली. कळलं तशी तडक गेले. माझ्या अस्तित्वाचा तो एकच धागा शिल्लक होता. तो ही तुटला. आता माझा माझ्या भूतकाळाशी काहीही संबंध नाही. नाळ तोडून आलीये मी. कायमची!", असं म्हणून मधूने आपल्या अश्रूंना वाट करून दिली. शालिनीबाईंनी पण डोळे टिपले आणि मिलिंदच्या हातात मधूचा हात देऊन दोघांना तोंडभरून आशिर्वाद दिले.

**उमा जोशी - रत्नागिरी**

## कृष्णस्तु भगवान स्वयम्

|| हरिः ॐ || प्रकृति स्वाभाविक अधोगामिनी आहे. सत्वगुण रजोगुणात, रजोगुण तमोगुणात परिवर्तित होतो. जर तिला समर्थ, बळकट पुरुषानी सांभाळली नाही तर ती बेताल अनिर्बंध होते. सर्वत्र असुरी, राक्षसी अराजक माजते. कामना, वासना, आसक्ती, चोरी, लूटमार, अत्याचार, बलात्कार, हिंसा, छलकपट वाढते. परिणामी सामान्य साधूजनांचे हाल हाल होतात. न्याय, नीती, धर्म, दान, सत्य सर्व कडीकुलपात बंद होते जनतेला वेठीस धरले जाते. 'विनाशकाले विपरित बुद्धी' डोके वर काढते. लोकांचे जगणे मुश्किल होते सर्वत्र दंगेधोपे, युद्ध, शस्त्र,अस्त्र यांचे साम्राज्य वाढते. तेव्हा अशातच कोणीतरी त्राता भक्कम आधार हवा असतो. खासकरून या दैत्यभावामुळे भगवंताप्रती विन्मुखता, भोगप्रियता आणि विषयलोलुपता वाढते. अशा कामरूप अधर्माचा नाश व्हायला हवा. कारण कामोपभोगपरायण आसुरी वृत्ती ही उत्तरोत्तर काम, क्रोध आदी षड्रिपु बलवान होऊन साधूवृत्ती संकटात येते. तेव्हा विभिन्न कल्पात भगवंताचे विभिन्न अवतार होतात. कधी नारायण, वामन, नारायण ऋषी अवतार घेतात. ब्रह्मवैवर्त पुराणानुसार, पृथ्वीदेवी या असुरांच्या अत्याचाराला कंटाळून देवतांसह सर्वलोक महेश्वर भगवान श्रीकृष्णाकडे गोलोकात जाते. देवतांच्या प्रार्थनेवरून साक्षात भगवान श्रीकृष्ण पृथ्वीतलावर अवतार धारण करायचे कबूल करतात. तितक्यात एका दिव्य रथातून शंख चक्र गदाधारी चतुर्भुज नारायण महाविष्णु महेश्वर येऊन श्रीकृष्णांच्या दिव्य शरीरात अंतर्धान पावतात. नंतर दुसऱ्या दिव्य रथातून धराधीश श्रीविष्णू येऊन राधिकेश्वर भगवंतात अंतर्धान पावतात. पण अवतारासाठी मनुष्य देहाची आवश्यकता असल्याने तेथेच असलेले नारायण ऋषी त्यांच्यात अंतर्धान पावतात. अशा प्रकारे महाविष्णु, विष्णू आणि नारायणऋषी आपल्यात सामावून स्वयं भगवान वसुदेव देवकीच्या कारागृहात प्रगट होतात.



खरेतर *'अजन्मा जन्मासी आला कारागारी अंधकारी कृष्णजन्म झाला'* असे आपण म्हणतो. पण श्रीकृष्णतत्व कोण, काय, कधी, कसे प्रगट होते हे आजपर्यंत कोणालाही उलगडले नाही.

भगवंत गीतेत म्हणतात,

*'अजोऽपि सन्नव्ययात्मा भूतानामीश्वरोऽपि सन्|*
*प्रकृतिं स्वामधिष्ठाय सम्भवाम्यात्ममायया|*
*यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम्|*
*परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् धर्मसंस्थापनार्थाय सम्भवामि युगे युगे ||' गीता ४/ ६, ७, ८*

पुढे म्हणतात; *'जन्म कर्म च मे दिव्यमेवं यो वेत्ति तत्त्वतः|' गीता ४/९*

इतकेच काय *'न मे विदुः सुरगणाः प्रभवं न महर्षयः|*
*अहमादिर्हि देवानं महर्षिणां च सर्वशः|' गीता १०/२*

असा हा दिव्य अप्राकृतिक अवतार होतो.

*'निर्गुणाचे भेटी आलो सगुणा संगे।'*

वसुदेव-देवकी, नंद-यशोदा, गोप-गोपिका, ऋषी-मुनी, तापसी यांना त्यांच्या मनोकामना पूर्ण करण्यासाठी तसेच राजे वेषातील असुर दैत्यरूपी पाप्यांना वठणीवर आणण्यासाठी आलो होतो. आधीच्या सात अवतारात उत्क्रांतीवादानुसार त्यांनी अनेक कार्य केली. पण आता राहिलेली वचनपूर्ती, आशीर्वाद, वर पूर्ण करण्यासाठी हा आठवा अवतार झाला आहे. श्रीकृष्ण योगेश्वर, आदर्श महापुरुष, उत्तम श्रेणीचे निष्काम कर्मयोगी आहेत. ते प्राणवल्लभ, सखा, मित्र, पशुपक्ष्यांचे बंधू, असुरांचे शत्रू, ज्ञानियांचे ब्रह्म, योग्यांचे परमात्मा, भक्तांचे भगवंत आहेत. ते महान संगीत शास्त्राचे आचार्य आहेत. त्यांच्या मुरलीचा सूर चौदा भुवनात ब्रम्हलोकापर्यंत जाऊन सर्वांना सम्मोहित करतो. या बासरीचे सूर ऐकून कोटी कोटी गोपिका स्वतःसह सर्व काही विसरून श्यामसुंदराकडे शरद पौर्णिमेच्या रात्री रासलीलेत समर्पित होतात. जी रासलीला आजही व्रजात प्रेमी, आर्त भक्तांना अनुभवायला मिळते. परमहंस, ज्ञानी देखील *'लोक सुकमळे। संतद्विजकुळे। सेवुनि रमले। भान हरपले रस पिता।।'* भागवत आरती. अशी ही रासक्रिडा. *'रसो वै सः।'* नारद मुनींनी राणी जांबवती व सत्यभामा यांच्याकडे दोन वर्षे संगीत शास्त्र अभ्यासले. नंतर दोन वर्ष रुक्मिणी देवीकडे संगीत शिकतात. ह्या पट्टराण्या नारदाला प्रसिद्ध संगीत विशारद करतात. अशा पट्टराण्यांचे पती श्रीकृष्ण यांचे संगीत शास्त्राचे ज्ञान किती अगाध होते. त्यांची 'नृत्यकला' तर विलक्षण आहे. शिवाचे 'तांडव', पार्वतीचे 'लास्य' प्रसिद्ध आहे पण भयानक विषधारी कालियाच्या सहस्त्र फण्यांवर थिरकत थिरकत नृत्य करणे ही पराकाष्ठेची परमावधी आहे. कालियाच्या समस्त पापांचा नाश करून प्रेमभक्ती देणे, मल्लविद्येत कंस चाणूर मर्दन करणे, धनुष्यभंग, कंसवध, घोड्यांचा खरारा, शल्य, त्यांची देखभाल करणे, अर्जुनाचे कौशल्यपूर्ण सारथ्य करुन धर्मयुद्धात पांडवाना विजयी करणे. त्यांचे वाक्चातुर्य अप्रतिम होते. कौरव सभेत त्यांचे विचार, शिष्टाई ऐकायला दूरदूरचे पंडित, ज्ञानी, श्रोते, विद्वान, ऋषी आले होते. त्यांच्या दिव्यतेच्या पुढे सर्व नतमस्तक होतात. पांडवांच्या राजसूय यज्ञात सर्वांच्या संमतीने सर्वाग्रही पूजेचा मान स्वीकारून, शिशुपालाचे सुदर्शन चक्राने मस्तक उडवून प्राणज्योत आपल्यात विलीन करून घेतली. यज्ञाच्या वेळी अतिथींचे त्यांनी पाद्यपूजन केले, तसेच उष्टी काढून सर्व प्रकारची कामे केली. अशी आदर्शांची मुहूर्तमेढ रोवली. उत्तम गृहस्थाश्रम, राजकारण, समाजकारण, प्रेम, वात्सल्य, दान, सख्यभाव आणि आत्मविश्वास निर्माण करुन जीवन, प्रेम, संगीतमय केले.

*'पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति।' गीता ९/२६*

शरीर-पत्र, सुकोमल मन - पुष्प, निरपेक्ष, अनासक्त कर्म - फल, अष्ट सात्विक भाव - तोय हेच भगवंताला मनापासून अर्पण करा. तो धावत तुमच्याकडे येतो. निर्णयक्षमता, प्रसंगावधान, निरपेक्ष कर्म, अनासक्ती सर्व अद्वितीय, अद्भुत आहे. आम्ही भाग्यवान, आम्हांस श्रीकृष्ण अभ्यासता आला. म्हणून आजच्या तरुणाईला आपले संस्कार, संस्कृती,आदर्श शिकवा. जीवनमूल्ये समजावून सांगा. त्यांना सुदृढ, सात्विक, निरोगी, आत्मनिर्भर, कणखर बनवा. संस्कारांची मुळे मातीत घट्ट रुजल्यावर थोड्याशा अपयशाने खचून आत्महत्याग्रस्त होणार नाहीत. त्यांना वेळ द्या. बालपण निरागस असते ते कुढता कामा नये. 'धर्मो रक्षति रक्षितः।'

**'To Be Or Not To Be' अश्या हॅम्लेट सारखा द्विधा मनस्थितीतील नायक आत्महत्या करतो. कारण सावरणारा कोणी नाही. पण मोहग्रस्त झालेल्या अर्जुनाला तर कृष्णाने गीतोपदेश देऊन आपल्या कर्तव्याची जाणीव करून दिल्याने तो यशस्वीपणे धर्मयुद्ध जिंकू शकला. हेच आपल्या धर्म संस्काराचे मर्म आहे.**

गीतेतील श्रीकृष्ण, भागवतातील कृष्ण म्हणजे **'जिन्ह कें रही भावना जैसी। प्रभु मूरति तिन्ह देखील तैसी।।'** वास्तविक परिपूर्णतम भगवंत एकच आहेत. अनंतलीलाविलास आणि लीलानुसार अनेक स्वरूप वैचित्र्ये दिसतात. इच्छामरणी भीष्माचार्यांनी अंत्यसमयी आपली प्राणज्योत भगवंतात विलीन केली. तसेच मीही हेच म्हणते - **'इतना तो करना स्वामी, जब प्राण तनसे निकले, गोविंद नाम लेकर फिर प्राण तन से निकले।।'**, श्रीकृष्णांवर आजपर्यंत इतका अभ्यास मनन चिंतन लेखन झाले आहे की शेवटी एवढेच म्हणावेसे वाटते.

*'कृष्णं वंदे जगद्गुरूम।*
*अधरं मधुरं वदनं मधुरं, नयनं मधुरं हसितं मधुरं मधुराधिपतेरखिलम् मधुरं। कृष्णात्परं किमपि तत्त्वमहं न जाने।।' मधुराष्टक*

हरिः ॐ तत्सत्!

**शुभदा काणे - डोंबिवली**

## श्री नटराज स्तवन

सर्वांगसुंदर असा हा नटराज
तांडव मुद्रा करुनी द्यावे
दर्शन आम्हा आज
भक्तिभावे पूजन करुनी
वंदन करितो आज....||ध्रुव||
सकल कलांचा तू तर सागर
थेंबे थेंबे भरुनी घागर
रंगमंचकी प्रसन्न वदने
शिंपण करितो आज..||१||
तूच ब्रम्हा, विष्णू तूच तू
तूच महेश, गणेश तूच तू
साक्षीने मी वसा ठेवितो
अभिनयाचा आज...||२||
रसिक जमले इथे अनामिक
स्वागत करण्या वाद्ये अनेक
नमस्कार करुनी आशीर्वाद द्याया
आवाहन करितो आज..||३||
कलासेवक आम्ही तुझेच सारे
गजर तयाचा अखंड करु रे
गंध लावूनी अर्पण करितो
सुमनांजली ही आज.....||४||

**श्रीप्रकाश सप्रे - ठाणे**

## शाप का वर

मी पाचव्या मजल्यावर पोहोचलो होतो. ५७०२च्या खोलीत मी गेलो तेव्हा आतून जास्तच आवाज येत होते. माझ्या पेशंटला उश्या लावून बसवण्यात आले होते. बाजूच्या खुर्चीत त्याची बायको बसली होती आणि दुसऱ्या खुर्चीत तिची बहीण. हे तिघेही माझेच पेशंट होते. त्याच्या पुढे कपकेक होता. बाजूला हॉस्पिटलचा स्टाफ होता. कपकेक मध्ये एक मेणबत्ती लावली होती. माझ्या लक्षात आले. आज ह्याचा वाढदिवस दिसतो आहे. आज ह्याचा शंभरावा वाढदिवस होता. आयुष्याची सेंचुरी ह्याने पुरी केली. सर्वांनी गायला सुरुवात केली. हॅपी बर्थ डे टू यू - मी जॉईन झालो. मार्टिनला न्यूमोनिया झाल्यामुळे हॉस्पिटलमध्ये आणले होते. वयामुळे थकवा होता आणि रिकव्हरी स्लो होती. वयामुळे ह्याला गिळायचा त्रास असणार आणि त्यामुळे aspiration झाले, असा माझा अंदाज. त्यामुळे मी स्पीच थेरपीला 'गिळणे' चेक करायला सांगितले. ताप नव्हता - ऑक्सिजनची जरुरी कमी झाली होती. बरे चालले होते. मी वाढदिवसाच्या शुभेच्छा देऊन बाहेर पडलो.

५७३२ मध्ये गेलो. ९३ वर्षाची बाई. ६ महिन्यापूर्वी छान चालले होते. थोडा खोकला होता आणि Sleep Apnea होता. सहा महिन्यांपूर्वी ती ऑफिसमध्ये आली. 'माझे मशीन बिघडले' तिची तक्रार. रात्री मशीन लावून छान झोपायची. पण आता रात्री धाप लागायची आणि उठायची आणि त्यामुळे तिला वाटले कि मशीन काम करत नाहीये. तिच्या मशीन मध्ये काहीच प्रॉब्लेम नव्हता. मी तिला तपासून म्हणालो कि मशीनमध्ये प्रॉब्लेम नाही. प्रॉब्लेम हार्ट मध्ये आहे. हृदयातला एक व्हाल्व काम करत नव्हता. मी तिला तसे सांगितले. मुलगी म्हणाली हृदय तज्ञ म्हणाला - हृदय normal आहे, मी X-RAY आणि ECHO केला आणि माझा अंदाज खरा होता. तिचा फुफ्फुसात थोडे पाणी झाले होते आणि अल्ट्रासाऊंड मध्ये तिच्या हृदयातली एक झडप उघडत नव्हती. मी तिला कार्डिओलॉजिस्टकडे जायला सांगितले. त्याने टेस्ट्स पाहिल्या आणि तिला ऑपरेशन करायला सांगितले. तिने नकार दिला. ती परत आली. मी तिला diuretic सुरु केले होते - ज्याने जास्त युरीन होऊन शरीरातले पाणी कमी होते. तिचा दम कमी झाला. ४ महिने छान गेले आणि एक दिवस ती पडली आणि हॉस्पिटलमध्ये आली. ब्रेन मध्ये रक्तस्त्राव होता, पण ती बरी होती. ब्रेन स्कॅन झाले आणि तिला घरी पाठवले, महिना गेला आणि ती परत आली. ह्यावेळी तिच्या पोटात दुखत होते. स्कॅन केले पित्ताशयावर सूज आली होती. म्हणजे सर्जरीची जरुरी - ती तर करायची नव्हती. मग रेडिओलॉजिस्टला सांगून कॅथेटर पित्ताशयात टाकला आणि त्याने थोडा उतारा पडला. पण आता फुफ्फुसांवर जास्त पाणी झाले होते. छातीत सुई घालून काढायचे कि नाही हा प्रश्न. मी त्यांना म्हणालो, तिला दम लागत नाहीये आणि ताप पण नाहीये त्यामुळे आपण वाट पाहू आणि मग ठरवू या. मी ultrasound tech. शी पण बोललो. ती म्हणाली होती की ही साधे बसू पण शकत नाही आणि असे प्रोसिजर करणे

कठीण होईल. मी काही औषधे बदलली आणि उद्या पाहू म्हणून बाहेर आलो.

**दिवस २**

मार्टिन. त्याला ऑक्सिजन चालू होता, swallow टेस्टचा रिपोर्ट आला. ह्याला Aspiration होते. म्हणजे खाल्लेले अन्न गिळताना ते अन्न नलिकेत न जाता ते फुफ्फुसात जात होते. त्यामुळे त्याला न्यूमोनिया झाला. प्रश्न होता कि ह्याला जेवण द्यायचे का पोटात ट्यूब टाकून त्यातून त्याला पाणी, औषधे आणि अन्न द्यायचे. ट्यूब टाकायची म्हणजे एक छोटीशी सर्जरी. त्याने नकार दिला. कॉफी पिताना त्यात 'थिक इट' नावाचा स्टार्च टाकून ती घट्ट करून पिणे आले. म्हणजे कॉफी चे पुड्डिन्ग म्हणा, त्याला कॉफीची मजा कशी येणार? पण दुसरा काही इलाज नव्हता. मार्टिन तयार झाला. पण मला म्हणाला "डॉक आता ह्या वयात माझी एन्जॉयमेन्ट अशी काय राहिली आहे, ऐकू कमी येते - दृष्टी अधू आहे आणि आता तुम्ही खाण्याची मजा पण हिरावून घेतली". मी काय बोलणार?

५७३२, ताप नव्हता, व्हाईट सेल काउंट खाली आला होता. मी एक्सरे केला होता त्यात पाणी कमी होते. मुली तेथेच होत्या. छातीतून पाणी काढायची जरुरी नाही, असे सांगताच त्यांना आनंद झाला. मागे मी हिच्याशी बोललो असता तिने 'मला मशीन्स वर टाकू नका' असे सांगितले होते. आता पण मी ते कन्फर्म केले. औषधे चालू ठेऊ आणि पाहू असे सांगून निघालो.

**दिवस ३**

मार्टिनला दोन दिवसात डिस्चार्ज द्यायचा असा विचार होता. १०० वर्षाच्या माणसाला ९७ वर्षाच्या बायको बरोबर घरी पाठवणे शक्य नव्हते. म्हणजे २-३ आठवडे रिहॅब मध्य पाठवणे भाग होते. मी ते तसे सूतोवाच केलेलं होते आणि त्या दोघांना ते मान्य होते. मार्टिन ची एकच तक्रार - मला नॉर्मल केव्हा खाता येईल? मी खोटे बोललो. तुला रिहॅब मध्ये पाठवू आणि मग एक ६ आठवडयांनी पुन्हा swallow टेस्ट करू आणि जर सुधारणा झाली असेल तर मग खाऊ शकतोस. माझ्या उत्तराने त्याचे समाधान झाले कि नाही माहित नाही.

५७३२ च्या खोलीत मी गेलो. ती एकटीच होती मुली नव्हत्या. वीक वाटली. ताप नव्हता, दम लागत नव्हता - काउंट बरा होता. पण ती बरी दिसत नव्हती. आणि मग मला कळले कि तिने जेवायला आणि औषधे घेण्यास नकार दिला होता. म्हणतात ना सर्जरी सक्सेसफुल आणि रोगी दगावला - तसाच काहीसा प्रकार, माझ्या मनात विचार आला. मी तिला समजावून सांगितले कि खाणे बंद करू नकोस, औषध घे.

मुलींना फोन लावला. टेस्ट रिपोर्ट सांगितले, आणि माझी चिंता पण सांगितली. मी त्यांना विचारले - 'हॉस्पिस बद्दल तुमचं काय मत आहे'? उत्तराने मलाच धक्का बसला 'थँक गॉड, तुम्ही विचारले - आम्हाला भीती होती कि - कि we are giving up on our Mom, पण तुम्ही तिच्याशी बोलाल का?' मी म्हणालो ती तयार आहे - आपण हॉस्पिसला बोलावू आणि उद्या तुमच्या बरोबर आणि तिच्याबरोबर एकत्र येऊन निर्णय घेऊ'.

**दिवस ४**

हॉस्पिटलमध्ये जायला मला उशीर झाला. मी एलिव्हेटरमध्ये असताना मला ऑपरेटरची अनाउन्समेंट ऐकू आली. कोड ब्लु रूम ५७०२. मी धावत गेलो मार्टिनला कार्डियाक अरेस्ट झाली होती. बायको होतीच, तिला हा सर्व प्रकार नको होता - मी ते थांबवले. एकदम काय झाले, मी बायकोला विचारले. मला जेवायचे आहे असा लटका ह्याने बायकोकडे लावला होता, तिने त्याची इच्छा पुरी केली. तो अन्नाच्या घासावर चोक झाला आणि गेला.

५७३२ कडे जायला जरा उशीर झाला होता. मी गेलो तेव्हा दोन्ही मुली होत्या. हॉस्पिसची नर्स त्यांना २० मिनिटात भेटणार होती. मी आत गेलो. खुर्ची वर बसलो, खुर्ची बेड जवळ ओढली. मी म्हणालो तू खाणे बंद केले ते बरोबर केले नाहीस. हॉस्पिसला बोलावले आहे. खाणे बंद करू नकोस. आपल्या मरण्याची वेळ आपण ठरवू शकत नाही. जेव्हा आपली केलेल्या कर्माची फळे संपतात तेव्हा आपण जातो. 'हॉस्पिसने तिला पहिले. त्यांच्या फॅसिलिटीत पाठवले.

काही दिवसानंतरची गोष्ट. माझे ऑफिस - मार्टिन ची बायको आणि बहीण आले होते, बरोबर केअरगिव्हर होती. तिचा बर्थ डे जवळ आला होता - ती ९८ वर्षाची होणार होती. बहीण तिच्या मागे १ वर्ष. तिला डिमेंशिया झालेला होता. काहीही करायला मदत लागत असे. खाण्यापासून इतर सर्व काही. मी मार्टिन बद्दल बोललो. मी सहज तिला म्हणालो 'You have ग्रेट जिन्स '.

तिने माझ्याकडे पहिले - मला म्हणाली -'Good genes? माझा नवरा गेला, बहीण माझ्याशी बोलू शकत नाही. काहीही

करायला मदत लागते - साधा चेक लिहायचा तर  हाताला कंप. मी जेमतेम सही करते. गुड जीन्स चा काय उपयोग ?'

माझ्याकडे उत्तर नव्हते.

**डॉ. शिरीष कीर्तने - लाँगवूड, फ्लोरिडा**

## फुलपाखरू....

कसं अलगद अवतरलं
सहज भिरभिरलं
ते चंचल फुलपाखरू,
वाऱ्यावर डोलणाऱ्या गवतपात्यावर
पापण्यांवर स्वप्न उतरावं तसं

हळदुल्या उन्हाने न्हाऊमाखू घातलेल्या
हिरवळीला वसंत आल्याची
खात्रीच पटली जणू.
सांदीकोपऱ्यात साचलेल्या आशा-आकांक्षांनी
मोकळा श्वास घेतला आणि
वळचणीला आलेल्या स्वप्नपाखरांना
भरारीचे वेध लागले

शुभ्र विरागी बर्फाला सरावलेल्या
माझ्या नजरेला नुकतीच कुठे
हिरव्या पोपटी नवलाईची सवय होत होती...
पिवळे धम्म इवले इवले सूर्यच जणू
तशी तेजस्वी रानफुलं
बहरून आली रातोरात

गोठून काळवंडलेल्या रोपट्यांना
वठलेल्या झुडुपांना
इवली इवली लडिवाळ पालवी लगटली,
आजीच्या कुशीत नातवंडांनी पहूडावं तशी

खळखळावं उत्फुल्ल हसू
तशी बहरून येतील झाड अंगभर
कळ्या पाकळ्यांनी,
हर्षाचा जल्लोष करत.
सौंदर्य उधळत
निसर्ग साजरा करत राहील उत्सव
उधळत राहील रंग, गंध

आपल्या सहस्त्र हातांनी
सौंदर्योत्सव साजरा करत,
मग हळू हळू भरगच्च ताटव्यातले
जणू वेलबुट्टीच्या गालिच्यावरचे
नाजूक साजूक रंग विरून जातील

गर्द हिरवाईतून
अचानक वणवा पेटावा
असा भास होईल
रान पेटवून उठतील,
ज्वाळांसारखी सळसळतील
अस्तंगत होण्यापूर्वी पानं
अन हळूहळू
जळत, विझत, गळून पडतील,
निष्कलंक शुभ्र गारव्यामध्ये विलीन होऊन जातील..
उन्हात चमचमणारे,
गोठलेले लोलक अंगभर लेऊन
साजऱ्या करतील झाडं बहरांच्या आठवणी

निसर्गाचं अविरत असं चक्रच हे
अनादी काळापासून चालत आलेलं,
अगणितवेळा घडून गेलेलं
पक्कं ठाऊकाय
तरीही... अजून सुद्धा
उन्हाचा सोनेरी वर्ख ल्यालेल्या

हिरवळीचं, पिवळ्याधम्म रानफुलाचं,
आणि माझ्या अंगणात
अलगद अवतरलेल्या
कोमल भिरभिरत्या पंखरवाने
वसंताची चाहूल देणाऱ्या
इवल्याशा फुलपाखरांचं
मला केवढं हे कौतुक?
किती हे अप्रूप?

**श्रद्धा भट - लाईल, इलिनॉय**



## 'काळ' आला होता पण 'वेळ' आली नव्हती

काळ, वेळ कोणालाच सांगून येत नाही असे म्हणतात... आणि आपल्या आयुष्यात क्वचितच असा प्रसंग येतो की काळ आणि वेळ ह्यातल्या अत्यंत नाजुक रेषेवरून आपली कसरत होते आणि त्या प्रसंगांकडे मागे वळून बघितल्यावर, 'काळ' तिथेच थिजलेला दिसतो पण आपण कालचक्राबरोबर पुढे निघून गेलेलो असतो.

'वेळे' प्रमाणेच 'स्थळ' पण अजून एक अशी मिती आहे, जी जुळून यायला लागते. ह्याचा सुयोग/कुयोग असेल तरच 'काळा'चा घाला बसतो. 'स्थळ' आणि 'वेळ' ह्यात थोडं उन्नीस-बीस झालं की मग माझ्या सारखा माणूस स्वत:चा थरारक अनुभव इतरांना, स्वत: सांगू शकतो.

माझी मोठी मुलगी, रेवा आणि धाकटी, नोवा ह्यांना summer vacation मधे कुठेतरी फिरायला घेऊन जायची योजना आखत होतो. रेवाला adventure rides आवडत असल्यामुळे शिकागोला Six Flags ला जायचं ठरलं. मग तिथेच college मधल्या मित्राकडे २-४ दिवस राहून धमाल करायचा बेत केला. शिकागोचा Morning Rush hour टाळायला सकाळी लवकर आवरून आम्ही चौघे डेट्रॉईटहून निघालो. गाणी, गप्पा गोष्टी करत करत शिकागोला कधी पोचलो कळलंच नाही. आजचा दिवस माझ्या मित्राकडे, सिद्धेश कुलकर्णीकडे आराम करून उद्या Six Flags ला जाण्यासाठी सगळेच excited होते.

दुसऱ्या दिवशी, सिद्धेश, त्याची बायको ऋचा, मुलगी अस्मि, आणि आम्ही चौघे, असे Six Flags ला adventurous rides वर झेंडे गाडायला पोचलो. DC Comics characters आणि Roller Coasters, Splash Rides बघून तर मुलांना काय करू काय नको असं झालं होतं. तिथल्या Max Force, X-Men, Raging Bull, Superman rides बघून आम्हाला पण धडकी भरत होती पण पहिल्या एक-दोन rides सर्वात भन्नाट करायच्या असं ठरवलं. Raging Bull मधे २०० फुटावरून ७० मैल प्रतितास वेगानी खाली येताना 'भान हरपणं' काय असतं ह्याची प्रचिती आली. Max Force आणि Raging Bull अशा पहिल्याच rides केल्यावर आमचं Adrenaline पण roller coaster वर आहे असं वाटत होतं.




(डावीकडून) सिद्धेश, ऋचा आणि मी, Raging Bull मधे घसा फोडून ओरडताना

Final Exam मधे पहिले दोन पेपर Algebra आणि Geometry चे झाल्यावर इतर Papers जसे क्षुल्लक वाटतात तसं पुढच्या rides ना वाटायला लागलं होतं.

तरीही प्रत्येक ride ला रांगेमध्ये थांबलेलं असताना, ride मधे बसताना एक काय अनेक विचार- Roller Coaster चा 'एखादा' Bolt पडला, तुटला तर?, Ride एकदम वर असताना नेमका आपलाच seatbelt च निघाला तर? Ride संपताना break नाही लागला तर?.. काही rides तर एवढ्या खतरनाक होत्या की एकदा माझ्या शेजारच्या गोऱ्याला चक्क मी रामरक्षा म्हणताना ऐकलं. 🙂 असो, तर roller coaster सुरू झाला की सर्वांचा विसर पडत होता आणि सरते शेवटी रोमांचकारी अनुभवाची सरशी होत होती. Max Force Ride ला तर front seat मिळाली होती. ती ride करताना सारखं मनात येत होतं एखाद्या Engine fail झालेल्या पायलटला, cockpit मधून विमान खाली येताना कसं दिसत असेल?.. नुसत्या कल्पनेने पोटात गोळा येत होता.


माझ्या बायकोनी, पूनमनी मुलांच्या rides ची जबाबदारी घेतल्यामुळे, मी, सिद्धेश आणि ऋचा ह्या सगळ्या rides चा मनसोक्त आनंद घेत होतो. दिवसभर rides करून दमून जायला झालं होतं. मेंदूपण म्हणत होता आता Adrenaline चा पुरवठा संपलाय, उदया भेटू!

त्यामुळे आता एखाद्या restaurant मधे मस्त जेवण करून घरी जाऊ असं ठरवलं. वाटेवर Libertyville गावामध्ये एक Mexican restaurant पसंतीस पडलं. रुचकर Mexican dishes, बरोबर Sangria-Mojito आणि Six Flags मधे केलेली धमाल आठवत, डिनर प्लॅन एकदम फक्कड झाला. गप्पांच्या ओघात सिद्धेश, ऋचा आणि मला जरा जास्त झाली होती असं वाटत होतं नव्हे झालीच होती. माझी बायको, पूनम, designated driver असल्यामुळे, तिनी steering हाती घेतलं. मी आणि सिद्धेश सर्वात मागे, मधल्या row मधे ३ लहान मुली आणि पुढे ऋचा आणि पूनम. गाडी भरली आणि मुलांची मस्ती चालू झाली म्हणून पूनम त्यांना झापत होती. गाडी निघायची 'वेळ' झाली आणि आम्ही

घराच्या दिशेने कूच केली. थोड्या वेळात मुलं झोपून गेली. रात्रीचे १०-१०:१५ वाजले होते आणि रात्रीच्या नीरव शांततेत, Vernon Hillsच्या अंधाऱ्या फ्री-वे वरुन, ओसाड माळरानं, शेतं मागे टाकत गाडीनी आता चांगला 'मौसम' पकडला होता.

एवढ्यात... गाडीच्या मागे धडाम-थडथड असा मोठा आवाज आला आणि मुलं पण खडबडून जागी होऊन "काय झालं? काय झालं?" विचारायला लागली. मला वाटलं एखादा Semi Truck कुठल्या तरी गाडीला धडकलेला दिसतोय. काय घडलंय बघायला म्हणून गाडीच्या मागच्या काचेतून डोकावून बघितलं तर... एक Aircraft रस्त्यावरून घसरत घसरत आमच्या दिशेने येत होतं. मी जोरात ओरडलो 'विमान! विमान येतंय!'. आम्हाला जरा जास्त झालीये असंच पूनमला वाटत असल्यामुळे तिचा विश्वास बसत नव्हता. ह्या गडबडीमध्ये गाडीचा वेग मंदावला आणि सभोवताल पण मंदावून गेलाय असा भास झाला.


आरडाओरडा करून परत मागे बघितलं तर ते विमान कशाला तरी (बहुदा खांबाला) धडकलं होतं आणि गिरकी घेत, घसरत आमच्या गाडी कडे सरकत येत होतं. पूनम rear view mirror मधे त्या काळोख्या आंधारात मागचा अंदाज घेत होती आणि तिला ते पांढरं धूड सरपटताना दिसलं, तशी तीनी आमची गाडी पुढे दामटली. गाडी पुढे जाता जाता, त्या गिरकी घेणाऱ्या विमानाचा उजवा पंख आमच्या गाडीच्या rear



window च्या अगदी जवळून गेलेला मला दिसला. जेमतेम 4-6 इंचाचे अंतर राहिले असेल. 'काळ' हा आपण चित्रांमध्ये नेहमी काळा बघतो पण इथे आम्ही पांढऱ्या विमानाच्या रूपात काळाला बघत होतो... आणि तो आमच्या पासून अगदी पावला दोन पावलावर थयथयाट करत होता आणि 'वेळ' साधायचा प्रयत्न करत होता. शेवटी ते विमानाचं धूड road divider वर जाऊन धडकलं आणि अजून एक गिरकी घेऊन शांत झालं. एव्हाना आमची गाडी पण सुखरूप रस्त्याच्या कडेला घेतली होती आणि आम्ही विमानाच्या परिस्थितीचा अंदाज घेत होतो. सर्व शांत होतं पण आमची विमानाजवळ जायची काही धडगत होत नव्हती. लगेच 911 ला फोन केला. आमची तंतरली असल्यामुळे तिला आमचा ठाव-ठिकाणा सांगायला जरा कष्टच पडले. त्या First Correspondent नी पण आम्हाला पुन्हा पुन्हा विचारलं, "Repeat, It's an airplane crash on the road??", "Repeat.." Emergency System ची कमाल आणि तिथे पुढच्या 2 मिनिटांमधे Ambulance, 2-3 Fire Trucks, Police cars घोंघावत पोहचल्या पण. आम्ही सुटकेचा निश्वास टाकला आणि त्या विमानातील प्रवासी, वैमानिकांसाठी प्रार्थना करत आम्ही तिथून घराकडे निघालो.

धक्क्यातून अजून पूर्ण सावरलो नसल्यामुळे, पूनम ट्रॅफिक लाइटवर ऋचाला घाईघाईत विचारात होती, Red light ला थांबायचं असतं का वळलेलं चालतं? आणि ऋचापण तिला म्हणत होती, "मला काहीच कळत नाहीये!, बहुतेक वळलेलं चालतं.." Cocktails आणि विमानाच्या Tailspin मुळे सगळ्यांचंच डोकं Spin झालं होतं. कसेबसे सावरत शेवटी आम्ही 11:30-12 ला घरी पोचलो. Roller Coaster चा Adrenaline rush, cocktails ची झिंग, सगळं काही क्षणामध्ये खाडकन उतरलं होतं. मला परत परत Max Force वरच्या ride मधलाच विचार आठवत होता, *'Engine fail झालेल्या पायलटला, cockpit मधून विमान खाली येताना कसं दिसत असेल?'*

घरी जाऊन Internet, TV वर accident चे काही details मिळतायेत का ह्याचा शोध घेत होतो. काही वेळानी local Newspaper ला online बातमी आली, 'Engine failure मुळे एका private विमानाचं Milwaukee Av. वर Emergency Landing!'. थोडा अजून



शोध घेतल्यावर कळलं, ह्या Piper Cherokee विमानाच्या इंजिनात Michigan lake वर उडत असताना बिघाड झाला आणि pilot float करत करत Libertyville पर्यन्त आला होता. Emergency Landing च्या चक्कर मधे आमच्या मागे land झाला होता.

आम्ही 'स्थळावर' आलो होतो, failed engine च्या रूपात 'काळ' पण आला होता मात्र आमची 'वेळ' आली नव्हती. आता timeline वर मागे वळून बघितलं की ते 'स्थळ', 'काळ' तिथेच थिजून गेलेला दिसतो आणि आम्ही मात्र पूनमनी मुलींना ओरडण्यात जास्त वेळ न घालवल्यामुळे, मोक्याच्या क्षणी गाडी

accelerate केल्या मुळे आज तुम्हाला थरारक अनुभव स्वत: सांगू शकतोय.

**अभिजित जोगदेव - डेट्रॉईट, मिशीगन**

## पैठणी

"फडताळात एक गाठोडे आहे
त्याच्या तळाशी अगदी खाली
जपून ठेवलेली एक पैठणी
नारळी पदर जरी चौकडी
रंग तिचा सुंदर धानी........"

शांताबाई शेळक्यांची 'पैठणी' कविता दृष्टीस पडली. पैठणी पिढ्यान पिढ्यांची जवळीक सांगणारी, आजीची ऊब देणारी, तलम - मोराची नक्षी असणारी, नातं दृढ करणारी, पैठणी मनात रुंजी घालत होती.......। पण आज पैठणीचं एक वेगळं रूप मांडणार आहे....बघा कसं वाटतेय....

सकाळची गडबडीची वेळ नाश्ता, स्वयंपाक, स्वच्छता, डबे रोजचा दिनक्रम अगदी ठरलेला 'अष्टभुजा' होऊन सकाळची कामे आटोपली. मुलांना महत्वाच्या गोष्टींची आठवण केली. अन् रोजच्याप्रमाणे हॉस्पिटल गाठले. नवीन ॲडमिशन, किती पेशंट्स, कुणाची लॅब, कुणाचा एक्स-रे, सवयीने सारं सुरूच होतं. नवीन पैशंटची फाईल चाळण्यास सुरुवात केली अन् History पाहूनच हसू आलं. चला राउंड घ्यायची वेळ झाली, गळ्यात स्टेथो अडकवून राउंडला सुरुवात केली.

ती एक नवीन पेशंट - विस्कटलेले केस, करारी मुद्रा, कपाळावर रुपया एवढ भलंमोठं कुंकु, इरकली साडी पण ठिगळ लावलेली. राउंडला जुजबी प्रश्न विचारले, Pulse, BP पाहून औषधे लिहून दिली OP- poisoning ची केस होती नवर्याने साडी घेऊन दिली नाही म्हणून रागाच्या भरात विषारी औषध प्राशन केले. 'सावित्री' तिचं नाव, सावित्रीशी निवांत बोलायचं ठरवलं. "किती छान नाव आहे तुझं, सावित्री! आपण साऱ्याजणी त्या सावित्रीच्या लेकी, माहित आहे नं? त्या सावित्रीबाई फुल्यांनी शिक्षणाची दारे उघडली म्हणून आज मी तुझ्यासमोर उभी आहे डॉक्टर म्हणून, तुला औषध देणार आहे. आता मोकळेपणाने सारं सांग, अजिबात घाबरू नको. तू नक्की बरी होणार. माझ्यावर विश्वास ठेव." मी तिचा हात हातात घेतला त्या स्पर्शाने किमया केली. ती उठून बसली....आपली कहाणी सांगू लागली.

"काय आणि कसं सांगू? गरिबी पाचवीला पूजलीय. १०व्या वर्षी आई-बानं लगीन लावलं." आता थोडी मोकळी झाली - "मॅडम २० वर्ष झाली बगा लग्नाला. मोलमजुरी करून पोटाची खळगी भरायची, थोडं पैक बाजूला ठेवल, की या दिवाळीला नवीन साडी घेऊ. मला लई हौस बगा नवीन साडीची! पण नवऱ्यानं दारुसाठी समदं पैकं नेलं अन् मला बी मार-मार मारलं. मी तरी किती म्हणून सहन करु? आता उसन पैकं आणून बिल भरतोय, त्या परिस माझं ऐकलं असतं तर? तुम्हीच सांगा, माझं काय चुकलं? कशाला वाचवले मला ? असल्या जगण्याचा काय उपयोग?"

तिची हृदय पिळवटून टाकणारी कहाणी ऐकून मन सुन्न झालं. स्त्रीचे अंतरंग कधी व कोण समजून घेणार ? माझ्यासमोर एक गरीब, अशिक्षित स्त्री होती जिचं मन कुणी समजून घ्यायचा प्रयत्नच केला नव्हता. वर्षानुवर्षे मन मारुन जगणं असह्य झालं. याने तिला जीवनच नकोसे झाले व औषध प्राशन करण्याचा पर्याय स्वीकारला. नकारात्मक भावना इतकी प्रबळ झाली की जीवाची किंवा मुलांचीही फिकीर नव्हती.

यात आपल्याला काहीतरी करायला हवं अशी माझ्या मनाने उचल खाल्ली, तिच्या नवर्याला बोलावलं. तिची अवस्था पाहून तो ही भेदरलेलाच होता. त्याला बोलतं केलं. त्याला दारूचे दुष्परिणाम, संसारावर होणारे परिणाम याची जाणीव करून दिली संसाराचा गाडा ओढण्यासाठी दोन्ही चाके महत्वाची आहेत असे समजावून सांगितलं मग थोडा बदल झालेला दिसला. संसाराकडे लक्ष दे, मुले व बायको हीच खरी संपत्ती त्यांना जप ....असा सल्ला दिला.

जाता जाता त्याला म्हटल - "अरे, हॉस्पिटलच्या उपचाराच्या खर्चात बायकोला नवीन पैठणी आली असती की!" या वाक्याने सारा तणाव निवळला. तो ही खळखळून हसला त्याचे डोळे लकाकले म्हणाला, "मॅडम, देवासारख्या धावून आलात तुम्ही, माझे डोळे उघडलेत. आजपासून दारू सोडली. पुढच्या दिवाळीला मालकिणीला पैठणी घेणार, अन् येणार तुमच्याकडं, ते बी ज़ो ...डी....नं !"

त्याच्या चेहऱ्यावरचा प्रसन्न भाव माझ्यावरचा विश्वास हेच आम्हा डॉक्टरांचे संचित. दोन जीवांचा संसार मार्गी लागला, व्यसनापासून मुक्तता केली हेच खरे समाधान!

सकाळी शांताबाईंची पैठणी कविता व आता हॉस्पिटलमधील पैठणीची कथा दोन्ही संदर्भ खूप वेगळे होत दोन्ही

पैठण्या मनाच्या खूप खूप जवळ होत्या अशी ही पैठणीची साठा उत्तराची कहाणी, पाचा उत्तरी सुफळ संपूर्ण .....

**डॉ. अस्मिता देशपांडे - पंढरपूर**

## युद्ध

दुःखाच्या कळपान  दाबला होता हुंदका
युद्धातल्या पाहिल्या त्यानं बॉम्ब आणि बंदुका ।
बॉम्ब आणि बंदुका त्या धरणारे जे हात
हातावरन वाटत होती ती माणसाची जात ।
नव्हतं नुसतं काळीज हुदय , मन नुसतं राख
मेलेल्यांचे ढीग नुसत्या डोळ्यांनी पहात ।
माणसे मारण्याचा कारखानाच झाला या युद्धापोटी
बॉम्ब वरून आग ओकतात  माझ्या तुझ्यासाठी  ?
आज आम्ही मारतोय आणि पहातोय तुमचं मरण
उद्या इथेच आमचं मरण याचं झालय विस्मरण ।
ह्या त्या भूमीसाठी माणसाची ही करणी
माणसाच्या आयुष्याची हकनाक  देणी घेणी
आणि म्हणूनच ........
दुःखाच्याच डोळ्यातून घळघळा वाहतय पाणी .
युद्धाच्या भूमीन नंदनवन व्हाव--
न्यूट्रॉन अणुबॉम्ब शक्तीन खत पाणी घालावं-
बंदुक तोफा गोळ्यांनी बी आणून पेरावं -
बॉम्ब फेकी विमानाने राखण छान करावी-
हिरवा शालू नेसून पृथ्वीनं हसावं डुलाव-
युद्धाच्या भूमीन नंदनवन व्हाव ।
चांगल्या साऱ्या शक्तीने एकत्रित यावं-
नवग्रहांना ही आपल्या  वेठीस धराव-
चांगल्या परग्रहांवर वस्ती करून राहावं-
आपल्या एका पृथ्वीने अनेक पृथ्वींना जन्म द्यावा-
आणि माणूस ह्या बुद्धिवानान असा विजय मिळवावा.

**मीना दीक्षित - क्लिव्हलंड, ओहायो**

## अखेरचा श्वास

नुकताच वसंताच्या आगमनाने सगळीकडे झाडांना हिरवीगार कोवळी पालवी फुटली होती. नित्यनेमाने दरवर्षी प्रमाणे आम्ही आमच्या बागेत भाज्या आणि फळ झाडे लावायला घेतली होती. इटुकले पिटुकले ते ससोबा सारखे इकडून तिकडून उड्या मारून नुसते त्रास देत होते. त्यांचा बंदोबस्त करायचा म्हणून आम्ही गार्डन बेडच्या आजूबाजूला जाळी लावायचा निर्णय घेतला. दुसऱ्या दिवशी पहाटे सूर्यनारायणाच्या आगमनाबरोबरच थंडगार हवेच्या झुळकेबरोबर  छान आलं आणि गवती चहा घातलेल्या चहाचा आस्वाद घेत असतानाच माझे लक्ष त्या गार्डन बेडच्या जाळी कडे गेले आणि बघते तर काय एक छोटेसे चिमणीचे पिल्लू आणि चिमणी आपले पंख फडफडताना मला दिसले आणि तिथून सुरू झाला तो पिल्लाचा आणि माझ्या मनाचा प्रवास..

सुरुवातीला वाटले की, त्या पिल्लाचे पंख अलगद त्या जाळीत अडकले असतील परंतु मी त्या पिल्लाला उडवायला गेले असता ते तिथून उडू शकत नव्हते कारण त्याच्या पंखाला खोलवर जखम झालेली दिसत होती. आता काय करायचे या विचारात असतानाच पराग ऑफिस मधून आला आणि आम्ही कशीबशी त्या जाळीतून त्या पिल्लाची सुटका केली. पिल्लाला अलगद हाताने उचलून हिरव्यागार गवतावर ठेवले आणि पुन्हा काही वेळाने त्याच्याकडे नजर टाकली असता ते तिथेच बसून होते.आता मात्र आमची खात्री पक्की झाली की हे पिल्लू आता कधीच उडू शकत नाही. त्या पिल्लाला घेऊन आमची वरात म्हणजेच पराग, माझी मुलं आमच्या फ्रंट पोर्च पर्यंत पोहोचली. त्या पिल्लाला पुन्हा जीवदान देण्यासाठी आमची धावपळ सुरू झाली. एका छोट्या वाटीमध्ये पाणी घेऊन आम्ही त्याला ते पाजण्याचा प्रयत्न करू लागलो तेवढ्यात प्रथमने म्हणजेच माझ्या लहान मुलाने सुचवले की आपण त्याला इंजेक्शनच्या सिरींजने पाणी पाजू शकतो. थोडीशी प्रोटीन पावडर व साखर घालून आम्ही ते पाणी तयार केले आणि ते पाजण्याचा त्या पिल्लाला बराच प्रयत्न केला..  पण ते बिचारे पिल्लू चिव चिव करीत आपला जीव वाचवण्याचे प्रयत्न



कसोशीने करत होते. ही सगळी तारेवरची कसरत करत करत रात्र झाली आणि आता पिल्लाला नेमके ठेवायचे कुठे असा प्रश्न आमच्यासमोर पडला. एक छोटासा रिकामा बॉक्स आणून आम्ही त्या पिल्लाला त्यात ठेवायचा विचार केला परंतु रात्रीच्या वेळी कोणी प्राण्याने हल्ला केला तर बिचाऱ्या पिल्लाचा जीव जाऊ शकतो हा विचार करत तो बॉक्स आम्ही झाडाच्या एका ढोली मध्ये ठेवला. त्या रात्री आमच्या कोणाच्याही डोळ्याला डोळा लागला नाही. मन सारखे खिडकीच्या बाहेर डोकावून पाहत होते. असंख्य विचारांनी मनाचा ताबा घेतला होता. कधी वाटे एखाद्या दुसऱ्या पक्ष्याने येऊन या पिल्लावर हल्ला केला तर किंवा वाटे की पिल्लाची आई येऊन पिल्लाला घेऊन गेली तर किंवा इकडून तिकडून उड्या मारणारे ते ससोबा यांनी उत्सुकतेपोटी हळूच बॉक्समध्ये डोकावून पाहिले तर.. मनात सारखी चलबिचल चालूच होती. शरीर मात्र घरात आणि मन सारखे काळ्या कुट्ट अंधारात खिडकीतून बाहेर डोकावून पाहत होते.. आता फक्त आमच्या डोळ्यासमोर प्रश्न होता तो पिल्लू आणि त्याच्या पंखाचा.

कधी एकदा सकाळ होते आणि पुन्हा एकदा त्या झाडाच्या ढोलीमध्ये डोकावून बघतो असे आम्हाला झाले होते. सूर्यनारायण उगवताच पुन्हा एकदा आमची पावले फिरकली ती त्या झाडाकडे आणि ज्याची भीती होती तेच झाले. अखेर पिल्लाने निसर्गाच्या अन्नसाखळीपुढे हात टेकत आपला जीव गमावला होता आणि त्याची आई चिमणाबाई सारखी येरझाऱ्या घालून चिव चिव चिव चिव करीत या झाडावरून त्या झाडावर फेऱ्या मारत होती. या प्रसंगाने मन अगदी खिन्न झाले. पण एक गोष्ट मात्र नक्की की, कधी कधी आपल्या पंखात बळ असले तरी आपण कोणत्यातरी संकटात सापडतो आणि ते संकट आपले पंख छाटून टाकते असे झाले तरी त्या संकटावर आपण शेवटपर्यंत मात करत राहायची आणि शेवटी जे घडेल त्याला सामोरे जायचे असते. प्राणिमात्रांवर दया करणे, त्यांना देखील आपल्या माणसासारख्याच अन्न पाण्याच्या गरजा असतात हे या गोष्टीतून मुलांना समजले आणि त्या दिवसापासून प्रथमने मनाशी पक्के ठरवले, की एक दिवस तो नक्की प्राण्यांचा/पक्ष्यांचा डॉक्टर होणार.

**रसिका नेरकर - नॅशव्हिल, टेनेसी**

## गोष्ट ब्लॅक फॉरेस्ट केकची...

युरोप ट्रिपच्या प्रवासी योजनेमध्ये ब्लॅक फॉरेस्टसाठी टूरने एक दिवस राखून ठेवला होता. तो दिवस उजाडताच उत्सुकता वाढली. टुरिस्ट बसने प्रवास करीत आमचा B500 महामार्गावर, २३० किलोमीटर्सचा निसर्गरम्य ड्राईव्ह, ब्लॅक फॉरेस्ट मार्गे, जर्मनीतील बाडेन-बाडेन ते स्वित्झर्लंड मार्गे सुरु झाला.

पर्यटक मार्गदर्शकाने माहिती दिली, आजच्या प्रवासात, ब्लॅक फॉरेस्ट प्रदेशातून निसर्गरम्य ड्राईव्हवर दक्षिणेकडे बघा, अतुलनीय नैसर्गिक सौंदर्याचा प्रदेश ज्यामध्ये घनदाट पाइन वृक्ष आहेत जंगलात वसलेले. तुम्हाला काही आकर्षक पारंपारिक घरे त्यांच्या लांब उतार असलेल्या छतांसह दिसतील. मार्गात, प्रसिद्ध ब्लॅक फॉरेस्ट लाकडापासून बनवलेल्या क्लिष्ट पणे कोरलेली कोकीळ घड्याळे असलेल्या स्थानिक स्टोअर मध्ये आपण थांबणार आहोत. त्यानंतर द्राक्षांच्या बागांनी वेढलेल्या शॅफहॉसेनकडे जाण्यासाठी निघू. येथे, तुम्हाला गडगडाट करणारे राईन धबधबे दिसतील; युरोपमधील सर्वात मोठ्या आणि शक्तिशाली पैकी एक! त्यानंतर, सुंदर ल्युसर्नकडे, त्याच्या मूळ लेकसाइड सेटिंग आणि भव्य पर्वतीय पॅनोरामासह, स्विस आल्प्सच्या मध्यभागी, दोन निवांत रात्री घालवा! आणि हो जगप्रसिद्ध असलेला ब्लॅक फॉरेस्ट केकचा हा प्रदेश जनक आहे, तेव्हा केकचा आस्वाद घेण्यास विसरू नका!! जर्मन साहित्यात, जंगल हे अनेकदा आनंदाचे आणि समाधानाचे ठिकाण म्हणून चित्रित केले गेले आहे, जेथे लोकांना सामाजिक दबाव आणि दैनंदिन जीवनातील गोंधळापासून संरक्षण वाटते.



ब्रिसिगावी किंवा ब्रिस्गावी हे एक इसवी सनाच्या पाचव्या शतकात दक्षिण जर्मनीतील ब्लॅक फॉरेस्ट च्या दक्षिणेकडील प्रदेशात राहणारी जर्मन जमात.

ब्लॅक फॉरेस्ट हा फ्रान्सच्या सीमेला लागून असलेल्या नैऋत्य जर्मनीतील एक पर्वतीय प्रदेश आहे. घनदाट, सदाहरित जंगले आणि नयनरम्य गावांसाठी ओळखले जाणारे, हे बऱ्याचदा ब्रदर्स ग्रिम परीकथांशी संबंधित आहे. १७०० च्या दशकापासून या प्रदेशात तयार केलेल्या स्पा आणि कोकीळ घड्याळांसाठी हे प्रसिद्ध आहे. या

प्रदेशातील सर्वात मोठे शहर, फ्रीबर्ग, गॉथिक इमारतींनी भरलेले आहे आणि द्राक्ष बागांनी वेढलेले आहे.

स्थानिक आणि शहराबाहेरचे लोक जर्मनीच्या नैऋत्य कोपऱ्यात जातात - खनिज स्पा, स्वच्छ हवा, हायकिंग ट्रेल्स, आनंदी गावे... आणि कोकीळ घड्याळांसाठी प्रसिद्ध. या प्रदेशातील गडद घनदाट जंगले प्राचीन रोमन लोकांसाठी भयानक होती आणि नापीक शेतजमिनीमुळे मध्ययुगीन स्थानिकांना वनपाल, ग्लास ब्लोईंग आणि घड्याळ बनवणारे बनले. आज, ब्लॅक फॉरेस्ट हे प्रामुख्याने जास्त काम करणाऱ्या जर्मन लोकांसाठी आरामदायी सुटकेचे ठिकाण आहे. या प्रदेशातील दोन प्रमुख शहरे म्हणजे बाडेन-बाडेन - जर्मनीचे १९व्या शतकातील सर्वात भव्य स्पा रिसॉर्ट आणि फ्रिबर्ग - ब्लॅक फॉरेस्टची वास्तविक राजधानी आणि आवडण्यायोग्य विद्यापीठ शहर.

तो नेत्रदीपक अनुभव डोळ्यात साठवत, पर्यटक मार्गदर्शकने संIगितलेला इतिहास ऐकत, आम्ही कोकीळ घड्याळांच्या आकारात असलेल्या घड्याळांच्या भव्य दालनात प्रवेश केला. दालनाच्या प्रवेश भिंतीत अनेक विविध आकाराची घड्याळे होती, प्रत्येक घड्याळात,दर तीस मिनिटांनी कोकीळा सरकत घरट्यातून बाहेर येऊन घड्याळाचे ठोके वाजवीत असे. तो ठोक्याचा नाद दैवी, निर्मळ जाणवला. दालनाची आजूबाजू विविधरंगी फुलांनी सुशोभित केली होती. विशिंग वेल्स छान सजवली होती. तेथील कॅफेटेरियात कॉफी, विविध प्रकारच्या बेकरी प्रॉडक्ट्स मध्ये छोट्या प्लेटस मध्ये चेरी टॉप, खवलेले डार्क चॉकलेटने नटलेला ब्लॅक फॉरेस्ट केकच्या कापाचा आस्वाद घेत, वाफाळलेल्या डार्क कॉफी चे घोट घेत आम्ही सारे बसलो असता, आमच्या पर्यटक मार्गदर्शकाने केकची माहिती सांगितली.

काही इतिहासकार म्हणतात की हा केक १५००च्या दशकातील आहे, जेव्हा चॉकलेट पहिल्यांदा युरोपमध्ये उपलब्ध झाले. अधिक विशेषतः त्याचे जन्मस्थान जर्मनीचे ब्लॅक फॉरेस्ट प्रदेश असेल, जे त्याच्या आंबट चेरी आणि किरसीचवासेरसाठी ओळखले जाते. केकचे जर्मन नाव - Schwarzwälder Kirschtorte

ब्लॅक फॉरेस्ट केक मध्ये चॉकलेट स्पंज केक, चेरी आणि व्हीप्ड क्रीमचे अनेक (सामान्यतः ४) थर असतात. हे व्हीप्ड क्रीम फ्रॉस्ट केलेले आहे आणि सजावटीसाठी चॉकलेट शेव्हिंग्ज आणि काही चेरींनी झाकलेले आहे. किर्शवासर (चेरी स्नॅप्स)चा वापर व्हीप्ड क्रीमला चव देण्यासाठी केला जातो. स्पंज केक च्या खालच्या थरांना किर्शवॉसर (चेरी स्नॅप्स) ने देखील ओलावा आणि थोडासा अतिरिक्त स्वाद प्रदान केला जातो.

केकचे रसभरीत वर्णन ऐकत असता, प्लेट मधील केक कधी संपला कळले नाही खरे...

जेव्हा नाटककार विल्यम शेक्सपियर ने प्रश्न विचारला, "नावात काय आहे?" रोमिओ आणि ज्युलिएटमध्ये, तो या कल्पनेचा संदर्भ देत होता की नावे स्वतःच गोष्टी किंवा लोकांमध्ये फरक करण्यासाठी एक परंपरा आहेत, परंतु स्वतःला काही मूल्य किंवा अर्थ नाही.

ब्लॅक फॉरेस्ट केक याला अपवाद आहे का?

**अश्विनी चौथाई - एडिसन, न्यू जर्सी**

## एक प्रार्थना

वाहू दे तुझ्या भक्तीचा झरा
नेहमी माझ्या मनी अंतरा
माणसाला दे स्नेहाचा वारा

जन्माष्टमीचा रूप साजरा
निळा सावळा कान्हा बावरा
हात दे हाती जीवनाच्या या

संध्या समयी हसून जगू या
मैत्रीचे नभी रंग उधळू या

कार्तिक मासे एकादशीला
तुळशी लग्न पंढरपुरा ला

मज दे देवा प्रसाद असा
ध्यान प्रार्थना जोडून ह्या करा

देऊ शुभेच्छा शुभ दिवाळीच्या
समाधानाचे दीप उजळ प्रकाशाच्या

**रेखा मुळे - मनालपम, न्यू जर्सी**

## आज वाऱ्याला लागलंय हो वेड!

बट केसांची गालावरुनी
अलगद सरवी मागे जो राम
सैरावैर धावतो आहे
भोकांड पसरुनि आज भयाण!

उद्ध्वस्त केलय सगळं खेडं
आज वाऱ्याला म्हटलंच पाहिजे वेडं!

हळुवार फुंकर निढळावर मारून
पुसत असे जो श्रमजन्य घाम
भितीने त्याच्या थरथरून अंग
दरदरून आज सुटलाय घाम!

उगाच आज हा काढतोय छेड
आज वाऱ्याला लागलंय हो वेड!

झुळकन् येऊन मिठी मारुनि
तन-मन प्रसन्न करी हा सांब
वायुदेव म्हणती जन त्याला
अन् प्रेमें करितीहि प्रणाम!

तोच सोज्वळ शीतल वायु
वागतोय तृणावर्ता समान?

थय थय नाचतोय, गिरक्या घेतोय
करतोय घातक कथक महान!
करतां करतां त-थय् ता-थय्
बुद्धी ठेविली काय गहाण?
कुणाला उचल, कुणाला आपट
आज वारा झाला आहे वेडपट!

श्री कृष्णाचा वध हो कराया
मातुल कंसें होता धाडीला
बालकृष्णाने जीवें मारीला
तृणावर्त तो केव्हांचा मेला!

परि भूत तयाचें असेल का हें? ?
अन् वाऱ्यावरती येतोय आळ?

आज वाऱ्याला लागलंय कां वेड?
आज वाऱ्याला लागलंय हो वेड!

नोंद: *: तृणावर्त: कंसाने पाठवलेला मारेकरी!
तो राक्षस एका चक्रीवादळा सारखं बाळाला
उचलून आपटतो, पण कृष्ण वाचतो, अन् राक्षस मरतो!

**अनिला रागाडे - लुइवील, केंटकी**

## Inflation Reduction Act (IRA)?


The last few months, there's barely a corner of the planet that hasn't been touched by some form of climate-change related disaster. From Hawaii to North China, we are seeing a litany of impacts: stronger storms, destructive floods, deeper and longer droughts, wildfires, spreading tropical diseases, melting ice and the consequent sea level rise, acidification of the oceans, loss of living species, are leaving a trail of devastation. The consequences are all around us. In India, Devastating monsoon rainfalls lash down over many homes and destroy once viable farmland. Icy flood water from melting Himalayas with a magnitude and intensity has never been experienced before.

The UN Secretary-General António Guterres has emphasized the need for global actions to address climate change, warning that "**The era of global warming has ended; the era of global boiling has arrived.**" Despite the uptick in natural disasters and


climate migration, the world continues to subsidize fossil fuels (oil, gas, coal) by **over $16 million per minute**. It's clear. We need to ditch fossil fuels fast.

Young people say that they are "**extremely worried**" **about climate change**, leading them to believe that humanity has no future. Survey shows youth expressing climate anxiety.

If you are experiencing climate anxiety, **you are not alone**; read a book that discusses these issues, such as How to Live in a Chaotic Climate, Not Too Late: Changing the Climate Story from Despair to Possibility, A Field Guide to Climate Anxiety, or Saving Us.





**We can find hope in** Actions. Do something, anything, even if you think it's small – but don't stop there; tell people about it! Encourage your workplace, school, local communities to make changes. After-survey, shows people feel **motivated, empowered, and ready to go...**




Climate action doesn't have to be only National. Towns, cities, and counties can act too. The challenges we face are significant, yet they are not insurmountable. By recognizing our power to work together, we can change the behavior and systems that got us to this point. We have the solutions to change the future. And the more we do, the better off we will all be. Science says: Every additional degree of warming matters, so every action and every choice matters, too. Companies are transitioning to green energy, governments are making progress, voters are fighting for climate actions. Yes, there are harrowing headlines, but there is also good climate news all around us. This is why we need to be directing our energy towards climate solutions that lead to a more just and equitable world.

**What role does the U.S. Government play in combating Climate Change?**
**What is the Inflation Reduction Act (IRA)?**
**What does it mean for American families?**



**U.S. President Joe Biden signs Inflation Reduction Act into law Aug, 2022**

As millions of Americans suffered through record heatwaves and devastating floods this Summer, U.S. Congress finally

responded to the climate crisis with a major investment in the solutions. On August 16, 2022, President Joe Biden signed the Inflation Reduction Act (IRA) into law, the most extraordinary climate legislative achievement of any head of state and any country in history. Government will spend $370 billion over 10 years' clean energy economy, reducing costs for consumers and addressing historic inequities and pollution that impact disadvantaged communities across the nation by providing a number of Tax Credits and Rebates for home efficiency.

### IRA's First Anniversary!! What's Happened Since and What's Next?



**One Year Later: President Joe Biden celebrates his victory**

One year, since the landmark Inflation Reduction Act (IRA) was signed into law, the U.S. is already seeing a massive return on investment. It is already doing what it was designed to do. They are delivering benefits to Americans and communities across the nation. Over 70,000 new jobs have been created, 270 big clean energy projects have been funded, including Solar and Wind installations, new factories to make the parts for solar panels, batteries, and electric vehicles and to recycle what's no longer needed. More is coming, with huge new solar farms being planned everywhere from old coal mines to Cold War bomb development sites. This remarkable boost in clean energy is expected to save the average American family $1,000/year through tax credits and rebates programs and get us on track to lower emissions.



Professor Leah Stokes explains in the video how AMERICANS can use IRA tax credits and rebates to save money and energy through a range of efficiency measures.

Rewiring America has a **treasure trove of resources** on their website. Starting with their IRA calculator, the steps you can take toward electrification by **upgrading the ways we heat, cool, and power our homes, cooking our food, and getting around and saving money**. Use the link to enter your household information and find out how much money you can get with the Inflation Reduction Act. https://www.rewiringamerica.org/app/ira-calculator

The Climate Reality Project has created resources to cut **Carbon pollution and save money** to make your home or business more energy efficient. This page is dedicated to energy efficiency starting with an energy audit (IRA pays) and comprehensive guide to different IRA incentives. If you are not looking for energy efficiency improvements, learn about some other options for embarking on your electrification journey, including going solar, exploring zero-emission vehicles.

The White House Fact Sheet: One Year In, President Biden's Inflation Reduction Act is Driving Historic Climate Action and Investing in America to Create Good Paying Jobs and Reduce Costs.

**References:**

1. The White House: https://www.whitehouse.gov/cleanenergy/inflation-reduction-act-guidebook/
2. Climate Reality Project: http://www.climaterealityproject.org
3. Rewiring America: https://www.rewiringamerica.com
4. Katharine Hayhoe: http://www.katharinehayhoe.com

I hope I have given you enough motivation and resources to do your part, electrify your daily lives to save the Earth.

**Darshana Gupte - San Antonio, Texas**

CONNECT
Bruhan Maharashtra Mandal

## Youth Section

## Know the Notes: Saxophones

Saxophones are one of the most versatile and powerful instruments in terms of sound. The sound is similar to a human voice and has an enormous range of notes and textures. These unique instruments are used in a range of genres such as jazz, classical, military, marching bands, and rock & roll.

**The Origination of Saxophones**




Saxophones were invented in 1846 by Adolphe Sax. Saxophones are woodwind instruments made out of brass. Adolphe played the flute and clarinet (both woodwinds) and he was surrounded by instrument-making. Thanks to his father's job, he had the privilege of having the materials and work space, to experiment with his own ideas. At the music conservatory he learned at, he studied the balance of brass and woodwind instruments together. In brass instruments, the sound is created through a quick vibration through the player's lips. According to BBC Teach, "When placed against the mouthpiece of the instrument the air inside begins to vibrate too, forming sound waves. To make different notes the amount of air vibrating inside the instrument has to be changed." Woodwind instruments are played by blowing air across the reed, which is a

thin sheet of wood attached to the mouthpiece of the instrument. The air blown vibrates down the instrument creating noise. Not all woodwinds use reeds, such as the flute which uses just air blown out of your mouth. Adolphe felt that there was a missing range that a hybrid of a woodwind and brass could complete. Adolphe tested with a bass clarinet, which led to the birth of the saxophone. He made 8 types of saxophones, the subcontrabass, the contrabass, the bass, the baritone, the tenor, the alto, the soprano, and the sopranino.

**The Controversy Around Saxophones**

89-year-old saxophonist Sonny Rollins said that the saxophone has always divided people. It became an extremely controversial instrument in two ways, first in 1842, even as far as developing the name “demonic instrument” for it. Saxophones are capable of being as delicate as a flute, but can also create the thunderous noise of a trumpet. An established instrument-making company disliked the saxophone because of its ability to have a diverse sound. Competitors that didn’t have saxophones to sell became jealous of Adolphe and maybe even were afraid of their business being overtaken by a new and unique instrument that would catch people's attention. When Adolphe moved to France, people threatened to steal his designs and demolish them. There were even people out to kill him. This affected him in many ways, even causing him to go bankrupt twice. The first time, the opponents of the saxophones sought revenge on Adolphe, but the second time, the controversy targeted directly towards the saxophones. When the Nazis took over Germany, they created the “Entartete Kunst'', which banned many forms of art, including saxophones. They banned anything and everything related to African American culture. Saxophones were a symbol of jazz music and connected to African-American culture, so they got banned. Even though they were banned and confiscated in Germany, they became a way for African Americans to express themselves in the US. Sonny Rollins, a famous saxophonist that I mentioned above, was born in a family of slaves in 1830. His grandmother was an activist for black civil rights. Jazz music became a way for black musicians to further explore their own exclusive style of music. Saxophones became a focal point in all-black bands that were emerging between 1913 and 1916. This alluring instrument has a lot more than meets the eye. Its human-like sound and exceptional range provides a distinctive noise that’s effortless to detect and pleases everyone.

**Sargum Godbole (Age 13) - New Jersey**




**Anjalika Khare (Age 14) - Foster City, CA**

## NAMASKAR 🙏

Charity giving to any entity in India is now easy with Foundation for Small Charities India, Inc. (FSCI) Granted by IRS A (501 (C)(3) Tax Exempt Status. An affiliate 'Foundation for Small Charity' (FSC) has the 80-G and FCRA required Registration in India, allowing you to give at will, without any red tape. India recipients of your giving need not be a registered charity. Your school or college never attempted to obtain tax exemption in India, which is very
expensive.

We welcome repatriation of after-tax sales proceeds of realty by US Citizens of Indian origin. We will honor remittance of tuition fees by parents to colleges in the USA for their children from India.

**FSC is the answer.**
**Visit our Website "WWW.SmallCharity.Org", for more detail.**

**Or email to Admin@SmallCharity.Org .**

You will hear from Ramesh Sarva, CPA, 183 Broadway, #210, Hicksville NY 11801

## Join Donor List:

JAGDISH & SHUBHANGI THAKUR
RAVI & NILIMA BHIRUD
RAHUL & PUNAM MUTHA
KOTESWARA RAO KUNDA, MD
KIRAN& NNDINI JOAG
KISHOR DANDEKAR
SUBHASH & VASANTI PURANIK
SUHASINI JOSHI
KAMLAKAR &ARUNA PENDSE
PRAMILA SARVA
VIJAY NARINGREKAR
MUKUND & SHAILA DIDOLAKE
GOVIND & BHAKTI NADKARNI

SHARAD PANJAPE
KAMALAKAR PENDSE
SUHASINI JOSHI

SWAROOP YOG & OTHER CHARITIES
M. KARVE FONDN 16 NEW GIRLS EDU
ANAND RISHI Hosp. C T SCAN
EDUCATIONAL FOUNDATION, A.P.
V.T. PATIL FOUNDATION
AMPTE FOUNDATIO
CASP, V.S. SAMITHI, PUNE, PATHAK RST
KOSMIC BEATS
ATHASHREE
ADHAR
EDUCTION
AKKA DHOPESWAR MAHILA MANDAL
SHANTA DUEGA TEMPLE, KAVLEM, GOA
LD ENGG COLLEGE, LIBRARY REDEVALOPMENT
ATHASHREE, IMROVE FACILITIES FOR SENIORS
ATHASHREE
COSMIC BEATS


Diwali Delight
FREE*
GOLD
COIN
or
GIFT ON JEWELRY
PURCHASE ABOVE $500
PNG
JEWELERS
PASS ON HAPPINESS
SPECIAL HOURS FOR DIWALI
NOVEMBER 10 (DHANTERAS): 10 AM TO 10 PM
NOVEMBER 12 (DIWALI): 11 AM TO 5 PM
NOVEMBER 11, 13, 14 & 15 : 11 AM TO 8 PM
Now Purchase Your Jewelry
From Anywhere In USA
On Facetime / Videocall,
Contact us : 408-245-6764
PNG Jewelers, 791 E El Camino Real, Sunnyvale CA 94087 | http://www.pngjewelers.com
*T&C APPLY